# फ्री अ‍ॅट लास्ट : द सडबरी व्हॅली स्कूल

मूळ लेखक : डॅनियन ग्रीनबर्ग

मराठी अनुवाद : नीलांबरी जोशी

१८६२

शाळेत शिकवलं जातं त्यात लुडबूड न करणं म्हणजे काय ? (तर ते म्हणजे) मुलांना शिक्षणातून जे काय मिळवायचं, ज्याची त्यांना गरज वाटतेय तितकंच शिकू देण्याची मुभा द्यावी. त्यांना ज्याची गरज नाही आणि जे त्यांना नको आहे ते त्यांच्यावर लादू नये.

मी म्हणतोय तशा शाळा अजून शंभर वर्षानंतर तरी असतील का याची मला शंका आहे. विद्यार्थ्यांना मुक्तपणे निर्णय घेऊ देणारी शिक्षणपध्दत पुढच्या शंभर वर्षांतही सुरु होईल असं मला वाटत नाही.

-काऊंट लिओ टॉलस्टॉय – एज्युकेशन अँड कल्चर यांचं विधान

१९६८

मुलांनी स्वयंप्रेरणा, स्वयंशिस्त आणि स्वतःचं मूल्यमापन स्वतः करुन शिक्षण घेतलं तर शिकणं नीट जोपासलं जातं या तत्वावर एक शाळा चालवावी म्हणून आम्ही ही संस्था स्थापन केली आहे.

–सडबरी व्हॅली स्कूलच्या कायद्यातील एक विधान

# अनुक्रमणिका

ओळख

प्रस्तावना

नो वन नीड अप्लाय

**भाग १ लारनिन**

१. अँड रिथमेटिक

२. वर्ग

३. सातत्य

४. द सॉर्सरर्स अँप्रेंटिस

५. बाकीचे आर

६. मासेमारी

७. नोहाज आर्क

८. रसायनशास्त्र

९. शिकार

१०. विशिष्ट खर्च

११. फॅडस् आणि फॅशन्स

१२. शाळेच्या कॉर्पोरेशन्स

१३. डिस्क्रिशनरी अकाऊंटस्

१४. स्वयंपाक

१५. एज मिक्सिंग

१६. खेळ

१७. ग्रंथालय

१८. टाईम इनफ

१९. अध्ययन

२०. मूल्यांकन

२१. द लाईटिंग रॉड

**भाग २ : शाळेतलं आयुष्य**

२२. शाळेतल्या मीटिंग

२३. अडथळे

२४. सत्काराची पध्दत

२५. खेळाच्या वेळचं दृश्य

२६. कँपिंग

२७. कमिटिज आणि क्लार्कस्

२८. स्वच्छता

२९. द मिरॅकल बजेट

३१. लहान मुलं

३२. चांगली मुलं आणि व्रात्य मुलं

३३. पालक

३४. व्हिजिटर्स

३५. सर्वांसाठी न्याय आणि स्वातंत्र्य

३६. गाभा

शेवटचे शब्द

द प्रूफ ऑफ द पुडिंग

**ओळख**

विचार करणारा प्रत्येक शिक्षणतज्ज्ञ हा शिक्षणक्षेत्राला पछाडणाऱ्या मूलभूत प्रश्नांना कधी ना कधी भिडलेला असतोच. ते मूलभूत प्रश्न म्हणजे, शिकवायचा किंवा शिकायचा सर्वश्रेष्ठ मार्ग कोणता ? मुलांनी कोणते विषय शिकावेत ? मुलं किती जबाबदारी घेतात ? ती जे काही करतात त्यात त्यांचा स्वतःचा विचार किती प्रमाणात असावा ? लोकशाही पध्दतीत शाळा कशी चालवावी ? आपल्यातल्या बऱ्याचजणांसाठी मनात हे प्रश्न आणि त्यांची उत्तरं फक्त थिअरी म्हणून असतात. पण आपण परंपरेनं चालत आलेली शिक्षणपध्दत स्वीकारतो आणि स्वतःच्या मनातल्या शिक्षणाविषयीच्या कल्पना वास्तवात आणायचा विचारही करु शकत नाही. खरं तर शिक्षणाविषयी आपल्या चांगल्या कल्पना आपण जपून ठेवायला हव्या आणि प्रचलित पध्दतींना (गरज असेल तर) धक्का द्यायला हवा.

कधी कधी मात्र, परंपरेची बांधिलकी न मानणारे काही लोक हे प्रश्न विचारुन थांबत नाहीत तर संपूर्ण हॉटहाऊसिंग करुन त्या प्रश्नांनी वेगळी उत्तरं मांडतात. मात्र आपण सर्वजण ती उत्तरं, त्यातून निर्माण झालेल्या गोष्टी लांबून पहात असतो. समाजात असे प्रयोग फार महत्वाचे असतात. ते आपल्याला प्रचलित सिध्दांतांकडे नव्यानं पहाण्याचा एक दृष्टिकोन देतात आणि नवीन प्रयोग करायला उद्युक्त करतात.

फ्रेमिंगहॅम, मॅसॅच्युसेटस्‌मधे १९६८ साली अशीच एक आगळ्यावेगळ्या पध्दतीची शाळा वय वर्ष ४ ते १९ च्या मुलांसाठी सुरु झाली, सडबरी व्हॅली स्कूल..! या शाळेत शिक्षणातले अनेक वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग केले गेले. शाळेला भरपूर प्रसिध्दी मिळाली आणि या पध्दतीची ती पहिलीच मान्यताप्राप्त शाळा ठरली.

सडबरी स्कूलचं सर्वात महत्वाची बाजू म्हणजे म्हणजे तिथली शिकवायची पध्दत..! ॲरिस्टॉटलनं २००० वर्षांपूर्वी त्याच्या मेटॅफिजिक्समधे एक तत्व मांडलंय - "माणसं नैसर्गिकरीत्याच जिज्ञासू असतात." त्याच तत्वावर आम्ही शाळा चालू केली. या तत्वानुसार माणसं सतत शिकत असतात. शिकणं हे त्यांच्या जगण्याचाच एक भाग असतं. म्हणजेच दिवसभर सतत त्यांना जे करावंसं वाटतं ते करत असताना लहान मुलं देखील त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार शिकतच असतात. कोणत्याही वयाचा मुलगा एकदा आमच्या शाळेच्या दारातून आत आला की तो स्वतःच्या आयुष्याला स्वतः जबाबदार असतो. त्याच्या आयुष्याची दिशा ठरवणारे सर्व महत्वाचे निर्णय देखील त्याला स्वतःलाच घ्यायला या शाळेत भाग पाडलं जातं. शाळा, त्यातले शिक्षक, इमारत, साधनसामुग्री आणि लायब्ररी हे त्याला एक साधन म्हणून उपलब्ध असतात. आणि त्याला या गोष्टींची गरज नसेल तेव्हा त्या तिथे फक्त असतात. यामागची संकल्पना साधी आहे. त्या मुलाच्या आत दडलेलं, माणसाच्या अस्तित्वाला अर्थ देणारं कुतूहल वापरुन ते मूल त्याच्या भोवतालचं जग धुंडाळेल आणि त्या जगावर स्वार होईल अशी आमची धारणा आहे.

एकूणच शिक्षणाच्या बाबतीत प्रत्यक्षात काय घडतं ? तर प्रत्येकजण मूलभूत शिक्षण घेतोच – पण ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे, त्याला लागेल त्या वेळात आणि त्याच्या पध्दतीत शिकतो. काही मुलं वयाच्या ५व्या वर्षी वाचायला शिकतात, तर काही वयाच्या १०व्या वर्षी ! काही मुलं शिक्षक आणि इतर विद्यार्थ्यांकडून छान शिकतात, तर काही स्वतःचं स्वतः शिकतात. आमच्या शाळेत कोणत्याही दिवशी पाहिलं तर सर्व वयाची मुलं एकत्र शिकताना, बोलताना, खेळताना, वाढताना दिसतील. जसजशी ती मोठी होतात तसतसं त्यांना स्वचं भान येतं आणि भविष्यात

काय करायचं याच्या त्यांच्या योजना तयार होतात. मग शाळा सोडून बाहेर पडल्यावर ते अतिशय वेगवेगळ्या कामात गढून जातात. व्यवसाय, उद्योगधंदे, पुढचं कॉलेज शिक्षण यासाठी देशभरात ते कुठेही जातात. एकूणच मुलं पुढे कुठे जाणार, आयुष्यात काय करणार हे त्यांची शाळा कशा प्रकारची आहे यावर ठरतं असं आम्हाला वाटतं. मुलांना आपण काय करायला हवंय याचं भान येणं आणि त्या दिशेनं त्यांनी स्वतःची प्रगती करणं हे शाळेच्या वातावरणातून घडत जातं.

शिक्षणाची दुसरी महत्वाची बाजू म्हणजे शिक्षणसंस्थेची रचना असते. आमची शाळा पूर्णपणे लोकशाही तंत्रानं चालवली जाते. शाळेच्या मीटींगमधे प्रत्येक विद्यार्थ्याला आणि शाळेत काम करणाऱ्या प्रत्येक माणसाला मतदानाचा अधिकार असतो. शाळेतले नियम, बजेट, व्यवस्थापन, लोकांना कामावर ठेवणं आणि काढणं आणि शिस्त काय असावी हे सर्व निर्णय याच पध्दतीत घेतले जातात. याचा परिणाम म्हणजे शाळेत कधीही मोडतोड होत नाही. तिथल्या भिंती अचकट विचकट चित्रांनी रंगत नाहीत. मुख्य म्हणजे वातावरण खुलं आणि विश्वासार्ह असतं, जे इतर शाळांमधे शोधूनही सापडणार नाही. सरकारी किंवा कोणत्याही खाजगी संस्थेच्या अनुदानाशिवायच ही शाळा चालते आणि इतर खाजगी शाळांपेक्षा आमची फीसुध्दा निम्मीच आहे.

ही शाळा काय आहे हे तुम्हाला सांगण्याचा सोपा मार्ग म्हणजे आम्ही सगळेजण एक शैक्षणिक संस्था म्हणल्यावर त्यात काय पहात होतो हे सांगायला हवं. आम्ही खरंतर अनेक वेगवेगळ्या, भन्नाट गोष्टी करु पहात होतो आणि त्या सगळ्या आम्ही या शाळेच्या निमित्तानं एकत्र आणल्या, त्यात त्या चपखलपणे बसल्या.

शिकणं आणि शिकवणं याचा विचार केला तर आम्ही मुलांना जे शिकायचं आहे तेच त्यांना शिकायला मिळावं यासाठी फारच दक्ष होतो. स्वतः पुढाकार घेऊन मुलांना काय शिकावंसं वाटतं, काय शिकण्याचा त्यांना ध्यास आहे आणि काय शिकण्यासाठी ते मेहनत घ्यायला तयार आहेत तेच त्यांना शिकू द्यावं. त्यांना त्यांची पुस्तकं, साधनं, शिक्षक निवडण्याचं स्वातंत्र्य असावं. कोणत्याही दबावाखाली, मनधरणी वगैरे न करता मुलांनी फक्त स्वतःला हव्या त्या विषयात झोकून देऊन घेतलेलं शिक्षण महत्वाचं ठरतं. तसंच अशा शिकायला उत्सुक, सातत्यानं परिश्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवताना शिक्षकांना सुध्दा एक आगळंच समाधान लाभतं. असं वातावरण शिक्षक आणि विद्यार्थ्यांना नंदनवनासारखं भासेल अशी आम्हाला शाळा सुरु करताना आशा होती.

स्वतःच्या विचारांशी प्रामाणिक रहाण्यासाठी आम्हाला ठरावीक अभ्यासक्रम किंवा इतर शाळांतल्या नेहमीच्या इतर गोष्टी सोडून ्देणं भाग होतं. शाळा सुरु केल्यावर आम्ही मुलंच त्यांना हवं ते शिकण्यासाठी पुढाकार घेतील अशी आम्ही वाट पाहिली. एखाद्या माणसानं त्याच्या कोणत्याही कृतीची जबाबदारी घ्यायला हवी त्याच्या वरच्या माणसानं नव्हे! या आमच्या मतामुळे आम्ही मुलांना आयुष्यात काय करायचं आहे ते शोधून त्यांनी तेच शिक्षण घ्यावं यासाठी त्यांना उद्युक्त केलं. त्यांना आम्ही विशिष्ट पाठ्यक्रमाच्या बंधनात अडकवलं नाही.

आम्हाला मुलांच्या व्यक्तिमत्वात जे रुजवावंसं वाटत होतं ते यामुळे रुजलं. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा लोकांना जबाबदारीचा खरा अर्थ कळणं गरजेचं आहे असं आम्हाला वाटत होतं. फक्त पुस्तकं वाचायला लावून किंवा लेक्चर्स ऐकवून त्यांना जबाबदारीचा अर्थ न कळता रोजच्या अनुभवातून तो कळावा अशी आम्हाला कळकळ होती.

तसं पाहिलं तर जबाबदारीचं ओझं फक्त तुम्हाला एकट्यालाच बाळगावं लागतं. तुम्ही आणि फक्त तुम्हीच तुमचे निर्णय घ्यायला हवेत आणि त्या निर्णयांच्या परिणामांना तोंड द्यायला हवं. तुमच्या कृत्यांच्या परिणामाला फक्त तुम्ही जबाबदार असणार आहात, कोणीच येऊन तुम्हाला वाचवावं अशी कोणीच अपेक्षा बाळगू नये. स्वतंत्र, स्वतःची दिशा ठरवणारे आणि तुमच्या भविष्याचे तुम्ही स्वतःच शिल्पकार असण्यासाठी हे सगळं अत्यंत गरजेचं आहे असं मला वाटतं.

वैयक्तिक जबाबदारीची जाणीव लोकांमधे समानता रुजवते. ज्या कोणाला अधिकार मिळाला असेल तो सगळ्यांच्या मान्यतेनंच मिळालेला असतो. अर्थात हे तत्व आपल्या सर्वांना फार नवीन नाही. कारण आपला देश (अमेरिका) याच तत्वावर उभा आहे. शाळेतल्या रोजच्या कृतींसाठी हेच आमचं मार्गदर्शक तत्व होतं.

जबाबदार व्यक्ती या संकल्पनेत अनेक गोष्टी सामावलेल्या आहेत आणि त्या सर्व मुक्त आणि स्वतंत्र माणूस असण्याशी निगडित आहेत. आमच्या मनात असलेल्या शाळेचा डोलारा जबाबदारी पेलण्याच्या या मुळांवर पोसलेला असायला आम्हाला हवा होता. वय, ज्ञान, अॅचिव्हमेंट काहीही असली तरी स्वतःची आणि स्वतः केलेल्या कृत्यांची संपूर्ण जबाबदारी घेणारी मुलं आमच्या शाळेत असावी असं आमचं ठाम मत होतं. या मार्गानं गेल्यावर मुलं चुका करणार – आणि त्या चुका त्यांच्या स्वतःच्या असल्यामुळे ते चुकांमधून शिकणार हे आम्हाला माहिती होतं. मानसिक पातळीवर संतुलित असलेले लोकच स्वतःच्या अपयशाचा आणि यशाचाही फायदा करुन घेतात हे आम्हाला कळत होतं. लोकांना काय वाटतं ते करु द्यावं , त्यात त्यांना यश मिळो अथवा न मिळो. कदाचित याच मार्गानं त्यांना एखादी अनपेक्षित अडचण येईल, ज्यावर ते मात करतील; न दिसलेली एखादी संधीही मिळेल; काय सांगावं ? असा आमचा विचार होता.

शाळेच्या वातावरणात खुलेपणा, विश्वास आणि भयमुक्तता जोपासली जावी असा आमचा मानस होता. आमच्या शाळेत कमीतकमी आमच्या एखाद्या कृतीमुळे तरी कोणीही घाबरुन राहू नये असं आम्हाला सतत वाटायचं.

तसंच आम्हाला अधिकारशाहीबद्दलची भीती शाळेतून हद्दपार व्हायला हवी होती. अधिकार असलेल्या व्यक्ती ही आमची समस्या नव्हती. कधीकधी काही लोकांना अधिकार द्यावाही लागतो. लोक त्या अधिकाराचा वापर कसा करतात ? हा मूळ मुद्दा होता. अधिकाराच्या स्थानावर असलेले लोक तिथे का आहेत हे तुम्हाला माहिती असेल, तुम्हीच त्यांना निवडून दिलेलं असेल आणि ते जे काय करतात त्यावर तुम्हाला लक्ष ठेवता येत असेल अशी पारदर्शी व्यवस्था असेल तर तुम्हाला त्या लोकांची भीती वाटत नाही.

तुम्हाला अशा अधिकारांची भीती वाटते, ज्यात तुमचा सहभाग नाही, तुमचं नियंत्रण नाही. आमच्या शाळेत विद्यार्थी, पालक, पाहुणे, इतर स्टाफ यापैकी कोणालाच कशाची भीती वाटू नये हा आमचा कटाक्ष होता. एका माणसानं वय, लिंग, अधिकार, माहिती आणि एखाद्या व्यक्तीची कोणतीही (आर्थिक, सामाजिक इ.) पार्श्वभूमी, या कशाचीही पर्वा न करता दुसऱ्या माणसाच्या नजरेला नजर भिडवून बोलणं हे याच गोष्टीतून शक्य होतं.

आमच्या मते लोकशाही ही व्यवस्थापनाची उत्कृष्ट पध्दत आहे. स्वतंत्रपणे आणि गरज पडल्यास संघटितपणे असं दोन्ही प्रकारानं काम करणं या पध्दतीतून शक्य होतं. दोन्ही प्रकारात सर्व निर्णयांमध्ये लोकांचा सहभाग असतोच. न्यू इंग्लंडच्या टाऊन मीटींगमध्ये गेली ३०० वर्षं ज्या प्रकारची लोकशाही पध्दत अस्तित्वात आहे तशीच पध्दत

वापरावी असं आम्हाला वाटत होतं. आमची शाळा तंतोतंत त्याच पध्दतीत चालणार होती. कोणालाच वगळण्यात येणार नव्हतं.

ज्या देशात (अमेरिकेत) सरकारमधे सर्व प्रकारे लोकशाही प्रचलित आहे तिथे शाळा त्याच तत्वावर चालवणं योग्य ठरणार होतं. अगदी छोटं खेडं ते फेडरलपर्यंत आमच्या सर्व संस्था या ना त्या प्रकारे पण लोकशाहीवरच चालतात. शाळा याच तत्वावर का चालवू नये ? असा जितका विचार आम्ही करत गेलो तितकं ते आम्हाला पटत गेलं. आमच्या शाळेतले शिक्षक आणि इतर स्टाफ बाहेरच्या विश्वात नागरिक म्हणून ज्या गोष्टी करतात त्याच या शाळेतही करू शकले असते. आणि मुलं बाहेर जाऊन ज्या जगात वावरणार होती त्या जगात वावरायचे नियम शाळेत शिकली असती. जबाबदार प्रौढ नागरिक बनेपर्यंत लोकशाहीची सवय होऊन त्यांना समाजात मिसळणं सोपं झालं असतं अशी आमची संकल्पना होती.

अशा आमच्या वेगवेगळ्या संकल्पना एकत्र केल्या तरी त्यांचा मूळ गाभा एकच असल्यामुळे त्या शाळेच्या माध्यमातून आपोआप पूर्ण होतील असं आमच्या लक्षात आलं. लोकांनी कोणत्याही बाहेरच्या मदतीशिवाय स्वतःच स्वतःच्या संस्थेचं व्यवस्थापन करावं अशी आमची यामागे मूळ संकल्पना होती.

आम्हाला सगळं इतकं सोपं वाटत होतं. त्या वाटण्यातूनच आम्हाला हवं तसं शिकवणं घडलं, आम्हाला हवे असलेले व्यक्तिमत्वाचे पैलू मुलांमध्ये दिसले, आम्हाला हवं असलेलं खुलं वातावरण तिथे तयार झालं आणि आम्हाला अभिप्रेत असणारी व्यवस्था तिथे तयार झाली.

१९६८ मधे शाळा सुरु व्हायच्या आधी अनेकजणांना ते एक स्वप्न वाटत होतं. आम्ही रामराज्य घडवू पहात आहोत असं वाटत होतं. पण आता ते प्रत्यक्षात उतरलंय, सगळेजण ते बघू शकतायत.

सडबरी व्हॅलीला भेट देऊन आल्यावर कसं वाटतं ? तर आमची मुख्य इमारत १०० वर्षांपूर्वी ग्रॅनाइटच्या दगडांनी बनलेली आहे. त्याभोवती सुमारे दहा एकर लॉन, झाडंझुडपं आणि फुलांच्या बागा आहेत. एका बाजूला शांत, हवेशीर जागा आहे जी शाळेसाठी तयार केलीय. दुसऱ्या बाजूला छोटंसं तळं, त्यावर लाकडी पूल आहे. आणि या आवाराभोवती नजर पोचेल तिथपर्यंत वृक्ष, शेतं, डोंगर, मळे आहेत. वर्षभर निरनिराळ्या ऋतूंमधे त्यांचे रंग अतिशय मोहक दिसतात.

ही जागा शाळेसारखी दिसतच नाही. सर्वसाधारण शाळेसारख्या इमारती इथे दिसत नाहीत. खरं तर आमची जागा घरासारखी आहे. तिथे अनेक माणसं स्वतःला हवं ते करायचं ठरवून पण मोकळेपणानं काम करत असतात. येणारे व्हिजिटर्स शाळा बघण्याच्या अपेक्षेनं येतात आणि बिचारे भांबावूनच जातात.

सडबरी व्हॅली कशी आहे त्याचं चित्र सगळ्यांच्या डोळ्यासमोर उभं रहावं या हेतूनं हे पुस्तक लिहिलं आहे. शाळेच्या पहिल्या २० वर्षातल्या समृध्द अनुभवांचा हा खजिना आहे. शिक्षणाचं तत्वज्ञान किंवा शाळेचा इतिहास सांगायचा हा प्रयत्न नाही तर शिक्षणाच्या क्षेत्रातला एकमेव असा प्रयोग कसा आकाराला आला त्याची ही कथा आहे!

द सडबरी व्हॅली स्कूल प्रेस.

सडबरी व्हॅली स्कूलच्या सर्व प्रकाशनांची यादी मिळवण्यासाठी सडबरी व्हॅली स्कूल प्रेस, २ विंच स्ट्रीट, फ्रेमिंगहॅम, एमए ०१७०१ या पत्यावर लिहा अथवा (५०८) ८७७-३०३० या नंबरवर फोन करा.

चार शब्द

**नो वन नीड अप्लाय**

एकही अपॉइंटमेंट शिल्लक नव्हती.

मिडलटाऊन, कनेक्टिकट मधल्या वेलस्लीयन विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी डिसेंबर पर्यंत इच्छुक उमेदवारांनी आपापले प्रवेशअर्ज पाठवून प्रवेशाची तरतूद केली होती. खरं तर डिसेंबर मधे प्रवेशाचा अर्ज म्हणजे फार उशीर झालेला होता. पण लिसाला त्यामुळे काही फरक पडला नव्हता. रोज सकाळी ९च्या सुमाराला ती फोनवर वेलस्लीयन विद्यापीठात फोन लावायची. रोज तिथली सेक्रेटरी ॲडमिशन संपल्या असं सांगायची. लिसाचा आवाज तिथल्या लोकांना हळूहळू ओळखता यायला लागला होता. ती त्यांच्यासोबत गप्पा मारायची, हास्यविनोद चालायचे. असं कित्येक आठवडे चाललं होतं. "तिनं वेळेत का बरं अर्ज केला नाही ? " ते विचारायचे. "केला होता" ती सांगायची. पण दुसऱ्या विद्यापीठात केला होता. मग मैत्रिणीनं सांगितलं "तिला हवे तसे शिक्षक वेलस्लीयन विद्यापीठात आहेत. तेच तिच्यासाठी योग्य आहे. " यावरुन मग तिनं वेलस्लीयनचा कॅंपस पाहिला आणि ती हरखूनच गेली. आपल्याला हवं ते हेच कॉलेज याची तिला खात्री पटली आणि प्रवेशअर्जाला कितीही उशीर झालेला असला तरी ती तिथेच प्रवेश घेणार असं तिथल्या स्टाफच्या नीट लक्षात यावं असं तिला वाटत होतं. यासाठी रोज ही फोनाफोनी चालली होती.

तिला एका इंटरव्ह्यूसाठी वेळ मिळणं गरजेचं होतं. तिला प्रवेश देताना वेलस्लीयन विद्यापीठाच्या लोकांनी थेट तिच्या नजरेला नजर भिडवून ती काय चीज आहे हे पारखणं गरजेचं होतं. तिनं नेहमीची प्रश्नोत्तरं प्रवेशअर्जावर नीट भरली होती. पण एका बाबतीत मात्र तिचा अर्ज भयंकरच वेगळा होता. त्या अर्जासोबत तिचे शाळेतले मार्कशीट, प्रगतीपुस्तकं वगैरे काहीच जोडलेलं नव्हतं.

लिसा सडबरी व्हॅली स्कूलमधे ज्या अनेक गोष्टी शिकली होती त्यात सर्वात महत्वाचं म्हणजे ती सर्व कामं स्वतःची स्वतः करायला शिकली होती. त्यानुसार प्रवेशासाठी ती कोणाचीच मदत न घेता स्वतःच खटपट करत होती.

मग लिसाला वेलस्लीयन विद्यापीठातून एक फोन आला. "८ जानेवारीला दुसऱ्या एका मुलाचा ठरलेला इंटरव्ह्यू रद्द झालाय.. ! तू त्या दिवशी म्हणजे पुढच्या मंगळवारी सकाळी ९ ला इंटरव्ह्यूसाठी येऊ शकशील का? ॲडमिशन विभागाचे प्रमुख (डीन) तुला स्वतःच भेटू इच्छितात." इकडे लिसाच्या स्वरात प्रचंड उत्कंठा होती. त्याच भरात ती म्हणाली "अर्थातच हो ! " ती कधीही इंटरव्ह्यूला जायला तयारच होती.

मग ठरल्यानुसार लिसा वेलस्लीयन विद्यापीठाच्या ऑफिसमधे आली. तिला बघायला अनेक नजरा गर्रकन वळल्या. हीच ती मुलगी, जी सतत फोन करत होती, जिनं कधीच प्रयत्न सोडले नाहीत - असा अर्थ त्या नजरांमध्ये सामावलेला होता. तिच्या या चिकाटीमुळे सगळ्यांनी तिचं स्वागत केलं.

मग लिसा इंटरव्ह्यूसाठी डीनसोबत त्यांच्या ऑफिसमधे अदृश्य झाली. बाकीचे उमेदवार बाहेर त्यांची वेळ येईपर्यंत थांबले होते. पंधरा मिनिटं गेली, अर्धा तास गेला.. पाऊण तास संपला.. लिसा डीनसोबतच होती. "काय चाललंय तरी काय ? " असं इतरांना वाटत होतं. अखेर तासाभरानं लिसा डीनसोबत हसतहसत बाहेर आली. डीन बाहेर वाट पहात असलेल्या तिच्या आईला म्हणाले "लिसानं इथेच प्रवेश घ्यावा असं मला वाटतं. तिच्यासाठी हे योग्य विद्यापीठ आहे."

प्रवेशअर्ज, इंटरव्ह्यू, वाट पहाणं या सगळ्याचा लिसाला अखेरीस फायदा झाला होता. तिचं सडबरीत व्हॅलीतलं १२ वर्षांचं शिक्षण कामाला आलं होतं, त्या शिक्षणातून तिला हवं ते निष्पन्न झालं होतं. थोडक्यात तिला वेलस्लीयन विद्यापीठात प्रवेश घ्यायचं आमंत्रण मिळालं आणि तिनं ते अत्यानंदानं स्वीकारलं.

सडबरी व्हॅली स्कूलमधून शिकून बाहेर पडलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याची अशीच एक कथा आहे. सडबरी व्हॅलीतल्या मुलांना हव्या असलेल्या कॉलेजमधे कायमच प्रवेश मिळाला. कित्येकांना तर निरनिराळ्या विद्यापीठांकडून आमंत्रणं आली होती. विशेष म्हणजे कोणाकडेच आधीच्या शिक्षणाच्या मार्कलिस्टस्, प्रशस्तीपत्रकं वगैरे नव्हती.

पण त्यांच्याकडे याहून जास्त काहीतरी होतं. त्यांची आतला उर्जा, स्वत:बद्दलची प्रखर जाणीच, त्यांचं निश्चित ध्येय हे सर्वकाही होतं. त्यांनी ज्या कोणत्या कॉलेजमधे प्रवेश घेतला तिथल्या सर्व लोकांना या सगळ्याचं आश्चर्य वाटायचं. अशी स्वतंत्र, जबाबदार आणि आगळीवेगळी मुलं निर्माण करणारी कोणती शाळा आहे ? सडबरी व्हॅली, कुठं आहे ? असे प्रश्न सतत आमच्याकडे यायचे.

हे पुस्तक म्हणजे त्या शाळेचीच कथा आहे. जी शाळा इतरांपेक्षा फार फार वेगळी आहे; तिथे जुनं आणि आधुनिकता यांचा संगम आहे; या सगळ्याचा मुलांवर विलक्षण गहिरा परिणाम होतो. स्वातंत्र्य, व्यक्तिवाद, लोकशाही सडबरी व्हॅलीत एकवटलंय!

**भाग १**

लार्निन

१. अँड रिथमेटिक

माझ्यासमोर ९ ते १२ वयोगटातली डझनभर मुलं बसली होती. एका आठवड्यापूर्वी त्यांनी मला त्यांना गणित शिकवायला सांगितलं होतं. त्यांना बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार आणि इतर तशा गोष्टी शिकायच्या होत्या.

"तुम्हाला हे सगळं शिकायचंय असं मला वाटत नाही" मी गणित शिकवावं म्हणून ती मुलं पहिल्यांदा माझ्याकडे आल्यावर मी त्यांना म्हणालो.

"आम्हाला शिकायचंय.. नक्की" हे त्यांचं उत्तर होतं.

“तुम्हाला शिकायचं नाहीये.. !” मी परत म्हणालो. “तुमच्या घराजवळचे मित्र, तुमचे पालक, तुमचे नातेवाईक यांना कदाचित तुम्ही गणित शिकावं असं वाटत असेल. पण तुम्हाला नक्कीच खेळावंसं किंवा दुसरं काहीतरी करावंसं वाटत असेल.”

“आम्हाला काय हवंय ते आम्हाला माहिती आहे. आम्हाला गणित शिकायचंय. ते शिकवल्यावर आम्ही गृहपाठ करु, खूप मेहनत घेऊ म्हणजे तुम्हाला कळेल.”

मग मी तयार झालो पण मनात जरा साशंकता होतीच. इतर शाळांमधे गणित शिकवायला ६ वर्षं लागतात हे मला माहिती होतं. आणि या मुलांचा गणितातला रस सहा महिन्यातच संपेल असं मला वाटत होतं. अर्थात मला आता पर्यायच नव्हता. मुलांनी खूपच आग्रह केला होता.

नंतर प्रत्यक्ष शिकवताना मात्र मला आश्चर्याचा सुखद धक्का बसला.

माझा सर्वात मोठा प्रॉब्लेम म्हणजे पाठ्यपुस्तक वापरणं. एकेकाळी मी ‘न्यू मॅथ’ हे पुस्तक लिहिणाऱ्या समितीचा एक सभासद होतो. पण मला तो प्रकार अजिबात आवडला नव्हता. आम्ही - म्हणजे पोस्ट स्पुटनिक केनेडी शिक्षणतज्ज्ञ (१९५७ मधे स्पुटनिक हा उपग्रह लाँच झाल्यापासून १९७८ पर्यंत अमेरिकेत शिक्षणक्रमात बरेच बदल झाले. त्यामुळे त्या काळाला पोस्ट स्पुटनिक म्हणलं जातं) त्या पाठ्यपुस्तकावर काम करत असताना आमच्या मनात काही शंका होत्या. लॉजिक, सेट थिअरी, नंबर थिअरी या थिअरिज आणि गणितज्ञ जे काही गणिताबरोबर खेळ करतात या दोन्हींतल्या सौंदर्यानं आम्ही भारावून गेलो होतो. ते सगळं ज्याला आवड असेल त्यानं नीट शिकावं असं आम्हाला वाटत होतं. सगळ्यांसाठी सरसकट एकच पाठ्यपुस्तक हे आम्हाला योग्य वाटत नव्हतं. उदाहरणार्थ शेतकऱ्यांसाठी जर शिक्षणक्रम बनवायचा असेल तर त्यांना प्रथम ऑर्गेनिक केमिस्ट्री, जेनेटिक्स आणि मायक्रोबॉयॉलॉजी शिकवावी लागेल असं मला वाटत होतं. अर्थात या सगळ्या शिक्षणाला लागणारा वेळ पहाता शेतकऱ्यांचा अभ्यासक्रम बनवायला आम्हाला आमंत्रित केलं नाही हे जगातल्या तमाम भुकेल्या लोकांचं नशीबच म्हणावं लागेल..!

नवीन गणितातली दुर्बोधता आणि किचकटपणा याचा मला तिरस्कारच वाटत होता. गणिताच्या १०० शिक्षकांपैकी एकालाही आणि १००० सामान्य माणसांतल्या एकालाही तो काय प्रकार आहे हे माहिती नव्हतं. खरं तर लोक जगात वावरताना गणित हे रोजच्या हिशेबासाठी वापरतात. त्यांनी शाळेत असताना ते हिशोबासाठी कसं वापरायचं हे माहिती करुन घ्यायला हवं. नेमकं तेच आत्ता माझ्या विद्यार्थ्यांना शिकायचं होतं.

मग मला आमच्या लायब्ररीत एक पुस्तक सापडलं. अगदी मला तेव्हा हवं होतं तसंच ते पुस्तक होतं. १८९८ मधे लिहिलेलं ते गणिताचं प्रायमर होतं. लहान मुलांना गणितं हातोहात, सोप्या पध्दतीनं यावीत यासाठी त्यात हजारो एक्सरसाईज होते.

मग आमचा गणिताचा वर्ग सुरु झाला – वेळेत..! वेळ पाळणं हा आमच्यातल्या कराराचा एक भाग होता. “तुम्ही म्हणालात ना तुम्हाला नक्की शिकायचंय ?” मी त्यांना सांगितलं होतं. “मग वर्गात वेळेवर या. दर मंगळवारी आणि गुरुवारी सकाळी ठीक ११ वाजता यावं लागेल. पाच मिनिटं उशीर झाला तरी तास होणार नाही. आणि ओळीत दोन तास बुडले तर वर्ग बंद होईल. हा करार आहे.” त्यांनी तो करार हसतमुखानं मान्य केला होता.

वर्ग सुरु झाल्यावर साधी बेरीज शिकायला दोन तास गेले. त्यानंतर त्यांना सगळ्या बेरजा यायला लागल्या. त्यांनी अनेक एक्सरसाईजही केले. वजाबाकीला अजून दोन तास गेले. खरं तर ती एका तासात संपली असती. पण उसनं घेणं म्हणजे काय ते समजावून सांगायला जरा जास्त वेळ गेला.

मग आले गुणाकार आणि पाढे. सगळ्यांना पाढे पाठ करायला लागले. सगळ्यांना कोडी घातली. मग नियम आणि मग सराव असं चाललं होतं.

सगळे भयंकर आनंदात होते. त्यांचा गणित शिकण्याचा प्रवास मजेत चालला होता. सगळ्यांना गणितातलं तंत्र आणि अल्गॉरिदम्स जमायला लागले होते. त्यांच्या नसानसात गणित भिनतंय असं त्यांना जाणवत होतं. शेकडो एक्सरसाईजेस, कोडी, तोंडीगणितं यामुळे त्यांच्या डोक्यात गणित शिरत होतं.

पण महत्वाचा भाग म्हणजे गणितं करता यायला लागल्यावरसुध्दा सगळेजण वर्गात येत होते. एकमेकांना मदत करत होते. १२ आणि ९ वर्षांची मुलंमुली वर्गात एकमेकांची उणीदुणी न काढता गुण्यागोविंदानं नांदत होते. सहकारानं काम चालल्याचं ते एक उत्तम उदाहरण होतं.

मग मी भागाकार, ताळा, दशांश, टक्केवारी, वर्गमूळ वगैरे शिकवलं.

सगळी मुलं अकराच्या ठोक्याला हजर रहात होती. अर्धा तास जास्त थांबून गृहपाठ घेऊन जात होती. दुसऱ्या दिवशी त्यातल्या प्रत्येकाचा – अगदी प्रत्येकाचा - गृहपाठ झालेला असायचा.

२० आठवड्यात त्यांनी सगळा अभ्यासक्रम पुरा केला. इतर शाळेत तो सहा वर्षात शिकवला जायचा. सगळ्यांना त्यातलं सगळं काही माहिती होतं आणि सगळं कळलं होतं.

मग आम्ही गणित शिकवणं संपल्याच्या उत्साहात एक पार्टी केली. माझे स्वतःचे सिध्दांत शाळेत चालतायत असं कळण्याची अर्थातच ती पहिली वेळ नक्कीच नव्हती आणि शेवटचीही नव्हती. पण माझे सगळे सिध्दांत पराकाष्ठेचे प्रयत्न करुन सिध्द झाले होते हे नक्कीच. त्याचाच तो आनंद होता.

गणिताचा वर्ग असा संपल्यावर मला जे अद्भुत आश्चर्य वाटत होतं ते तसं वाटणारच आहे याची मला सुरुवातीलाच खरंतर खात्री वाटायला हवी होती. गणिताचा वर्ग संपल्यावर एका आठवड्यानंतर मी ॲलन व्हाईल याच्याशी बोललो. तो प्रख्यात गणितज्ज्ञ होता आणि त्यावेळच्या गणित शिकवायच्या सर्व आधुनिक पध्दती त्याला माहिती होत्या.

त्याला मी माझ्या गणिताच्या वर्गाची कथा ऐकवली.

त्याला बिलकुल आश्चर्य वाटलं नाही. “का बरं?” मी विचारलं. आणि त्याच्या उत्तरानं आश्चर्यचकित झालो. माझी डर्टी डझन मुलं ज्या वेगानं गणित शिकली होती त्या हादऱ्यातून मी अजून बाहेर आलो नव्हतो.

“कारण सगळ्यांना माहिती आहे.” तो म्हणाला. “ हा विषय तितकासा अवघड नाही. अवघड काय आहे तर गणित सोडवण्याची प्रत्येक स्टेप लहानग्यांच्या डोक्यात घुसवणं. त्यांना त्याचा तिटकारा असतो. मग आमच्यासारख्यांसाठी

एकच मार्ग उरतो. तो म्हणजे दरवर्षी त्यांच्यावर या सगळ्याचा अक्षरशः मारा करायचा. पण तरीही ते शिकणं घडत नाहीच. सहावीत पोचूनही बरीचशी मुलं गणितात अडाणीच रहातात. पण ज्या मुलाला खरोखर गणित *शिकायचंय* असा एक मुलगा मला दिलास तर २० तास नक्कीच पुरेसे आहेत."

मग माझ्या लक्षात आलं तो सांगतोय ते बरोबर आहे. माझ्या मुलांना खरोखर गणित शिकायचं होतं हे यामागचं महत्वाचं कारण होतं. आज मला सांगायला आनंद वाटतो की त्यानंतर आजतागायत आमच्या शाळेत मुलांना गणित शिकायला कधीच त्यापेक्षा जास्त तास लागलेले नाहीत!

२. वर्ग

शब्द वापरताना फार जपून वापरावे लागतात. दोन माणसांनी एकाच शब्दाचा अर्थ सारखा घेतला तर ते एक अद्भुत आश्चर्यच ठरावं. कारण बऱ्याचदा तसं होत नाही. प्रेम, शांती, विश्वास, लोकशाही हे शब्द आयुष्यभर आपण बोलतो. पण वास्तवात या सगळ्याला धरुन तसं कितीवेळा वागतो ?

वर्ग (क्लास) हाच शब्द घ्या. शाळा नसलेल्या संस्कृतींमधे या शब्दाचा काय अर्थ होतो ते मला माहिती नाही. त्यांच्यात कदाचित तो शब्दच नसेल. हा शब्द वाचणाऱ्या अनेकांच्या डोळ्यासमोर हजारो चित्रं तरळून जातील. विद्यार्थी आणि शिक्षक असलेली एक खोली... त्यात बाकावर विद्यार्थी बसलेत आणि शिक्षकांनी सांगितलेलं वहीत लिहून घेतायत, जो शिक्षक त्यांच्यासमोर उभा आहे किंवा बसलेला आहे. वर्ग या शब्दातून अजूनही काही प्रतीत होतं. वर्गातला एक तास.. जो ठरावीक वेळेत भरतो. गृहपाठ, पाठ्यपुस्तक, ज्यातला विषय काळजीपूर्वक सर्व विद्यार्थ्यांना शिकवला जातोय.

आणि त्यातून अजूनही काही मनात तरळून जातं, कंटाळा, वैताग, अपमान, यश, अपयश, स्पर्धा इ...!

पण सडबरी व्हॅली स्कूलमधे त्या शब्दाचा अर्थ निराळा होता.

सडबरी व्हॅली मधे वर्ग म्हणजे दोन पार्टींमधली व्यवस्था. ती व्यवस्था एकापासून किंवा अनेकांपासून सुरु होते. मुलं त्यांना काहीतरी शिकायचंय असं ठरवतात. उदाहरणार्थ - बीजगणित किंवा फ्रेंच किंवा भौतिकशास्त्र, स्पेलिंग किंवा मडकी बनवणं. अनेकदा त्यांना शिकायचंय ते कसं करायचं ते ते स्वतःच शोधून काढतात. एखादं पुस्तक, कॅम्प्युटर प्रोग्रॅम किंवा कोणाचंतरी पाहून ते त्यांना हवं ते शोधतात आणि शिकतात. असं ज्या शाळेत घडतं तेव्हा मग रुढ अर्थाने तो वर्ग रहात नाही. फक्त शिकणं उरतं. आम्हाला तेच साध्य करायचं होतं.

मग कधी कधी मुलांना एकट्याला शिकणं जमत नाही. काहीतरी अडतं. त्यानंतर त्यांना मदत मिळतीय का हे ते बघतात. जो शिक्षक त्यांना तो ठरावीक विषय शिकण्यासाठी जे हवंय तेच नेमकं देईल असाच शिक्षक ते शोधतात. तसं कोणी भेटलं तर ते एक करार करतात, आम्ही हे हे करु आणि तू ते करशील, ठीक आहे? असं त्या कराराचं स्वरुप असतं. ते दोन्ही पार्ट्यांना मान्य असेल तर एक वर्ग तयार होतो.

हा करार करावा असं वाटणारे म्हणजे तो विषय शिकायला उत्सुक असणारे विद्यार्थीच या वर्गात येतात. म्हणजे त्यांनी सुरु केला नाही तर वर्ग भरतच नाही. खरं तर अनेकवेळा आमच्या शाळेतली मुलं त्यांना काय आणि कसं शिकायचंय ते स्वतःच ठरवतात. त्यांना वर्गाची गरजही भासत नाही.

मग ज्याच्याबरोबर करार केला जातो तो शिक्षक बनतो. शिक्षक म्हणजे कधीकधी शाळेतलेच इतर विद्यार्थीही असू शकतात. पण साधारणपणे शाळेनं शिकवण्यासाठी पैसे देऊन ठेवलेली मंडळी शिक्षक बनतात.

त्यामुळे सडबरी व्हॅली स्कूलमध्ये शिक्षक निवडताना असे करार करायला तयार असणारेच शिक्षक निवडावे लागतात. हे करार विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे असतात. आमच्याकडे शिक्षक म्हणून काम करायला उत्सुक असणाऱ्या लोकांचे अनेक अर्ज येतात. त्यातले अनेकजण संधी मिळाली तर ते मुलांना शिक्षणाद्वारे काय काय आणि किती देऊ शकतील याची यादीच वाचून दाखवतात. पण खरं सांगायचं तर असे लोक आमच्या शाळेत फार योगदान देऊ शकत नाहीत. मुलं काय घेऊ शकतात हे आमच्यासाठी महत्वाचं आहे, शिक्षक काय देऊ शकतात ते नव्हे ! अनेक शिक्षकांना हे सत्य पचवणं जड जातं.

वर्ग चालवण्याच्या करारात सर्व प्रकारच्या अटी असतात – विषय, वर्गाच्या वेळा, दोन्ही पार्टीकडून असलेले मतभेद असं सर्व काही त्यात खुलेपणानं मांडलं जातं. उदाहरणार्थ, काही करारात शिक्षकाने मुलांना हवं त्या वेळी भेटायला हवं असं ठरतं. अशा प्रकारच्या करारात एकतर प्रत्येक मंगळवारी सकाळी ११ वाजता अर्ध्या तासासाठी भेटायचं असं ठरतं किंवा मुलांना शंका असेल तेव्हा सोमवारी सकाळी १० ला भेटायचं असं ठरतं. मुलांना काहीच शंका किंवा प्रश्न नसतील तर ते एखाद्या आठवड्यात भेटणारही नाहीत असंही करारात नमूद केलं जातं. कधी कधी शिकण्यासाठी एखादं पुस्तक संदर्भ म्हणून निवडलं जातं. एकूण कराराच्या अटी विद्यार्थी ठरवतात हे मात्र नक्की!

दोन्ही पार्ट्यांपैकी एकीकडून करार पाळला गेला नाही तर तो करार संपतो. शिक्षकांना जर वाटलं ते मुलांना हवं ते देऊ शकत नाहीत तर ते माघार घेऊ शकतात. मग तरीही मुलांना वर्ग घ्यायची गरज वाटत असेल तर त्यांना नवीन शिक्षक शोधावे लागतात. आणि तसंच जर शिक्षणाच्या मध्येच मुलांना वाटलं शिक्षण पुरे झालं तर शिक्षकांना त्या वर्गाच्या ठरलेल्या वेळात दुसरं काय करायचं ते ठरवावं लागतं.

शाळेत इतर प्रकारानेही वर्गही चालतात. याचं उदाहरण म्हणजे शिक्षकांना पुस्तकाबाहेरचं काहीतरी चांगलं आणि सर्वांसाठी गरजेचं वाटलं तर ते नोटीस लावतात : “क्ष विषयात रस असेल तर सेमिनार रुममधे मला सकाळी १०.३० वाजता भेटा.” त्यावेळी जर कोणी आलं तर ते शिकवतात. नाही आलं तरीही त्यांचं काही बिघडत नाही. कधी कधी अशी नोटीस पाहून पहिल्या वेळेला लोक येतात, मग दुसऱ्या वेळेलाही यायचं का नाही ते या पहिल्या वेळेच्या अनुभवावरुन ठरवतात.

मी स्वतःही असं बऱ्याचवेळेला केलंय. मी नोटीस लावल्यावर पहिल्या वेळेला काय असेल? या उत्सुकतेपोटी पुष्कळ लोक येतात. दुसऱ्या वेळेला जरा कमी येतात. शेवटी ज्यांना त्या विषयात मनापासून रस आहे तेच रहातात. त्यांना ते शिक्षण नसून करमणूकच वाटते. असं झालं की मी (आणि माझ्या शाळेतले इतर लोक) शिक्षणपध्दतीबाबत काय विचार करतो ते बाहेरच्या लोकांना कळण्याचं एक उदाहरण तयार होतं.

३. सातत्य

मी आधी लिहिल्याप्रमाणे परत एकदा शब्दांचा अर्थ कोण कसा घेतं हीच आमच्यालेखी एक समस्या होती. बऱ्याचदा मी जसं वर लिहिलंय तसं शिकणं म्हणजे लोकांना अनौपचारिक, सहज, सोपं वाटतं. त्यांच्या दृष्टीनं त्यात काय आहे ? आमच्या पध्दतीत शिकण्यात लोकांना बेशिस्त, गोंधळ, रँडमनेस आहे असं वाटतं.

यावर अनेकदा मला वाटतं आमच्याकडचं शिकणं खरंच तसं असायला हवं होतं.

पण ते नक्कीच तसं नाही. उदाहरण म्हणजे आमची शाळा सुरु झाल्यावर सुरुवातीच्या दिवसात रिचर्ड नावाच्या १३ वर्षांच्या मुलानं प्रवेश घेतला आणि त्याला ट्रंपेट आणि एकूणच संगीतात प्रचंड रस आहे असं लक्षात आलं. आपल्या आयुष्याचं हेच ध्येय आहे हे त्याला थोड्याच काळात कळून चुकलं. जॅन नावाच्या ट्रॉंबोनिस्टसोबत तो संगीताच्या अभ्यासात गर्क झाला.

रिचर्ड रोज चार तास ट्रंपेटचा रियाज करत असे. आम्हाला त्याचं फार आश्चर्य वाटे. रिचर्ड जे काही दिवसभर करत असे, त्या सगळ्यातून ट्रंपेट वाजवायला कसंही करुन चार तास वेळ काढत असे. त्याचा दिनक्रम पाहिला तर थक्क व्हायला व्हायचं. तो रोज सकाळी बोस्टनहून बसनं १ तासाचा प्रवास करुन आणि नंतर फ्रेमिंगहॅम बस स्टेशनपासून चालत शाळेत यायचा. पाऊस, थंडी, वारा कशाचीही पर्वा न करता तो नित्यनियमानं शाळेत हजेरी लावायचा आणि रोज चार तास रियाजही करायचा.

रिचर्डची तळमळ पहाता म्युझिक हाऊस म्हणून तळ्याशेजारचं एक पडकं मिलहाऊस आमच्या दृष्टोत्पत्तीस यायला मग फार वेळ लागला नाही. ग्रॅनाईटनं बांधलेलं, उतरत्या छपराचं, दुर्लक्षित असं ते मिलहाऊस होतं. आम्हाला त्यातलं सौंदर्य अचानक जाणवलं. मग अतिशय कमी कालावधीतच तो रिचर्डचा म्युझिक स्टुडिओ बनला. तिथे तो इतरांना त्रास न देता हवा तितका वेळ सराव करु शकत होता.

रिचर्डनं तिथे चार वर्षं रोज चार किंवा कधी कधी चारापेक्षा जास्त तास सुध्दा सराव केला.

आमच्या शाळेतलं शिक्षण पूर्ण झाल्यावर अजून एका विद्यापीठातून शिक्षण घेऊन रिचर्ड एका ऑर्केस्ट्रात दाखल झाला. रिचर्डच्या पाठोपाठ फ्रेड आला. त्याला ड्रम वाजवायची प्रचंड आवड होती. रात्रंदिवस तो फक्त ड्रम वाजवत असायचा. त्याच्यासाठी आम्ही बेसमेंटमधे एक ड्रम रुम तयार केली आणि शाळेची एक किल्ली त्याच्या सुपूर्त केली. त्याला हवं तेव्हा भल्या पहाटे किंवा सुट्टीच्या दिवशी वगैरे येऊनही मग तो ड्रम वाजवू शकायचा.

मात्र ड्रम रुम आम्हाला वाटली होती तितकी काही साऊंडप्रूफ नव्हती असं आमच्या लक्षात आलं. याचं कारण म्हणजे जोरजोरात वाजणारा ड्रमचं पार्श्वसंगीत! ते संगीत त्यानंतर दोन वर्षं म्हणजे फ्रेड १८ वर्षांचा होऊन शाळेतून जाईपर्यंत आमच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला होता.

फक्त संगीतातच चिकाटी आणि सातत्य दाखवून प्रावीण्य मिळवणारी मुलं आमच्या शाळेत होती असं नव्हे तर प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकच मुलाला आमच्याकडे आल्यावर हळूहळू त्याचं कार्यक्षेत्र सापडत गेलं.

एक उदाहरण म्हणजे, ज्या मोठ्या मुलांना पुढे उच्च शिक्षणासाठी कॉलेजमध्ये जायचं असेल त्यांची नजर मग एस.ए.टी. (स्कॉलॅस्टिक ॲप्टिट्यूड टेस्ट) कडे लागायची. माझ्या दृष्टीनं एस.ए.टी. या अमेरिकेतल्या कुप्रसिध्द चाचण्या होत्या. पण अनेक कॉलेजमध्ये प्रवेशासाठी एस.ए.टी. पास असणं गरजेचं होतं. मुलांना या परीक्षेतल्या अभ्यासक्रमात जे अवघड वाटेल त्यासाठी मग ते एखादा शिक्षक निवडायचे. पण मुलं अभ्यास मात्र स्वतःच करायची. त्या परीक्षेच्या दरम्यान  जाडजूड पुस्तकं या खोलीतून त्या वर्गात ओढत नेली जायची. तिथे ती पुस्तकं पिशवीतून ओतून मुलं पान न पान वाचून खूप अभ्यास करत. ही सगळी प्रक्रिया फारच गंभीरपणे चालायची. यातली अनेक मुलं त्या परीक्षेसाठीची पुस्तकं प्रथमच पहात असली तरी या सगळ्या अभ्यासाला चार-पाच महिन्यांपेक्षा जास्त वेळ लागल्याचं क्वचितच घडलं.

काहींना लिहायला आवडायचं. ते तासनतास लिहित बसत. काही चित्रकार होते ते चित्रं काढत बसायचे तर काही मातीची मडकी बनवायचे, काहींना स्वयंपाकात रस होता तर काहीजणांना खेळात..! काही मुलांना साध्यासुध्या गोष्टीत रस असायचा. तर काहींना वेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टीत रस असायचा.

तसा ल्यूक या मुलाला शवविच्छेदनात रस होता. खरं तर १५ वर्षांच्या मुलासाठी ही जरा वेगळीच महत्वाकांक्षा होती. पण समाजाला उपयोगी पडेल असं काहीतरी तो शोधत होता आणि त्याच्या दृष्टीने समाजाला उपयोगी पडणारं म्हणजे शवविच्छेदन हेच होतं. जिवलग व्यक्ती मृत्यू पावल्यावर नातेवाईकांचं सांत्वन करताना जे समाधान मिळतं ते भ़विष्यात मिळवताना तो स्वतःला पहात होता.

ल्यूकनं स्वतःला अभ्यासात झोकून दिलं होतं. विज्ञान, रसायन, जीवशास्त्र, प्राणिशास्त्र या विषयांचा तो सतत अभ्यास करत होता. अशा रीतीने सोळाव्या वर्षी तो त्याला हवं असलेलं काम करायला तरबेज झाला होता. मग आम्ही त्याला बाहेरच्या खऱ्या जगात घेऊन गेलो. जवळच्या एका हॉस्पिटलमधल्या एका पॅथॉलॉजिस्टनं या तरुण, उत्साही मुलाचं आनंदानं स्वागत केलं. ल्यूकनं तिथल्या पध्दती लवकरच आत्मसात केल्या, त्यांच्यात प्रावीण्य मिळवलं, बॉसची मर्जी संपादन केली. एका वर्षाच्या आत तो हॉस्पिटलमध्ये कोणाच्याही मदतीशिवाय, फक्त देखरेखीखाली शवविच्छेदन करताना दिसायला लागला. हॉस्पिटलसाठी अशा प्रकारचं अर्थातच हे पहिलंच (आणि भलतंच!) प्रकरण होतं.

पाच वर्षातच ल्यूक शवविच्छेदन तज्ज्ञ बनला होता. स्वतःचं शवागार असण्याची त्याची कल्पना सत्यात उतरली.

हे झालं ल्यूकचं, असाच एक बॉब होता.

एक दिवस बॉब माझ्याकडे येऊन म्हणाला "तुम्ही मला भौतिकशास्त्र शिकवाल का?" बॉबनं त्या विषयाचा आधीच इतका अभ्यास केला होता की मला नाही म्हणायचं काही कारणच नव्हतं. बॉबला अनेक गोष्टींचं सखोल ज्ञान आहे असं सगळ्यांनाच ठाऊक होतं. तो शाळेतला छापखाना चालवत होता. ्त्यानं शाळेच्या कायद्यांच्या संबंधित भरपूर संशोधन करुन एक पुस्तक लिहिलं होतं. पियानो शिकण्यातही कित्येक तास घालवले होते.

यामुळे मी त्याला भौतिकशास्त्र शिकवायला सहज तयार झालो. मी त्याला कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी असलेलं एक जाडजूड, जड, भौतिकशास्त्राची तोंडओळख करुन देणारं एक पाठ्यपुस्तक दिलं. मी त्यावरुन पूर्वी शिकवलं होतं.

स्वतःही त्यावरुन शिकलो होतो. मला त्यातले खाचखळगे माहिती होते. मी बॉबला सांगितलं "पुस्तकाचं पान न पान वाच.. प्रत्येक एक्सरसाईज सोडव. आणि किंचितही अडखळलास तर माझ्याकडे ये. शंका लहान असतानाच सोडवून घे .वेळीच कळलं नाही तर नंतर मोठी समस्या होऊ शकते." बॉब कुठे अडखळेल ते मला माहिती आहे अशी माझी कल्पना होती.

आठवडे गेले.. महिने गेले.. बॉब पठ्ठ्या काही उगवला नाही.

कुठलीही गोष्ट मधेच सोडणं त्याच्या स्वभावात नव्हतं. प्रयत्न करुन वेगात किंवा वेगात जमत नसेल तर सावकाश पण कसंही करुन तो गोष्टीच्या मुळाशी जायचाच. खरं तर मला हे माहिती होतं. तो भौतिकशास्त्राचाही अभ्यास असाच मुळाशी जाऊन करत असावा असं मला एकीकडे वाटत होतं. दुसरीकडे त्याचा भौतिकशास्त्रातला रस संपला असेल असंही मला वाटत होतंच. मी गप्प राहून वाट बघत बसलो होतो.

शिकायला सुरुवात केल्यानंतर पाच महिन्यानंतर बॉब मला भेटायला आला. "मला पान नं. २५२ वर एक प्रॉब्लेम आलाय." तो म्हणाला. तेव्हा मला वाटत असलेलं आश्चर्य त्याला कळू नये याचा मी आटोकाट प्रयत्न करत होतो. तो इतका छोटा प्रॉब्लेम होता की पाच मिनिटात सुटला.

बॉब यानंतर भौतिकशास्त्रातली समस्या घेऊन माझ्याकडे कधीही आला नाही. ते पुस्तक त्याचं त्यानं संपवलं. मग त्यानं "बीजगणित आणि भूमिती सोडवताना तर माझी मदत मिळेल का ? "असंही विचारलं नाही. तेही तो स्वतः शिकला. अर्थात, मी मदत लागल्यास ती करेनच अशी त्याला खात्री असणार.

बॉब आज एक उत्तम गणितज्ञ आहे.

४. द् सॉर्सरर्स अॅप्रेंटिस

हॉस्पिटलमधे पॅथॉलॉजिस्ट म्हणून गेल्यावर ल्यूक हा सडबरी व्हॅली स्कूलचा बाहेरच्या जगातला पहिला अॅप्रेंटिस ठरला. शाळेतल्या सुविधा कितीही चांगल्या असल्या तरी शवविच्छेदन शिकायला अपुऱ्या होत्या. शाळेत मानवी प्रेतं सांभाळण्याचा विभाग असणं निव्वळ अशक्य होतं. त्यामुळे ल्यूकला बाहेर जावं लागलं. पंधराव्या वर्षी ल्यूकसमोर दोन मार्ग होते. सहा-सात वर्षं थांबून शिक्षण संपवून मग हवं ते करिअर करायचं किंवा लगेच बाहेरच्या जगात जाऊन हवं ते करिअर करायचं.

त्यानं कॉलेजमधे अडकून पडावं असं आम्हाला अजिबातच वाटत नव्हतं. मग आम्ही काही स्थानिक डॉक्टरांकडे गेलो. आमच्यासारखाच विचार करणारा एक डॉक्टर सापडल्यावर त्याच्यासमोर ल्यूकची केस मांडली. आम्ही शाळेत जसा करायचो तसाच एक करार त्याच्याबरोबरही केला. तो करार असा : एक तर तुम्हाला एकही पैसा मोजावा न लागता एक मदतगार मिळेल. कारण तो ल्यूकच्या शिक्षणाचा एक भाग आहे. त्या बदल्यात तुम्ही त्याला शवविच्छेदनातलं विशिष्ट शिक्षण द्याल.

ते शिक्षण काय असेल हे आम्ही करारात विस्तारपूर्वक लिहिलं. सगळ्यांनाच त्यातल्या अटी मान्य झाल्या. आणि शाळेचा पहिला अॅप्रेंटिसशिप कार्यक्रम सुरु झाला.

शाळेत ही अँप्रेंटिसशिपची कल्पना रुजली. जिलला थिएटरमध्ये रुची निर्माण झाल्यावर ती शाळेच्या वातावरणाबाहेर जायला तयार झाली. तिला थिएटर प्रॉडक्शन मधल्या मेकअप, कपडेपट, नेपथ्य, प्रकाशयोजना अशा कामांची आवड होती. त्यामुळे ती केंब्रिजमधल्या लोएब थिएटर मधे मदतगार म्हणून रवाना झाली. लवकरच देशभरातल्या व्यावसायिक रंगभूमींवर तिची सहाय्यक म्हणून निवड व्हायला लागली. थिएटर या विषयात तिनं नंतर पदवीही मिळवली आणि त्यात छानसं करिअर केलं.

शाळेच्या कँपसवर किती काळ रहायचं ? कधी बाहेर पडायचं ? हे अनेकदा मुलांसाठी अवघड प्रश्न असतात. सॉल नावाचा एक चौदा वर्षाचा मुलगा फोटोग्राफीत पार बुडून गेला होता. त्याआधी तो कॉलेजची डार्करुम वापरुन फोटोग्राफीतलं गमभन अनेक वर्षं गिरवत होता. पण शाळेतल्या सुविधा त्याला अपुऱ्या पडायला लागल्या. सॉलनं मात्र शाळेबाहेर पडण्यापेक्षा आहे त्या सामुग्रीतच सुधारणा करायचं त्यानं ठरवलं. त्यासाठी अत्यंत परिश्रम करुन तो सुतारकाम शिकला. फोटोग्राफितल्या तांत्रिक माहितीसाठी भरपूर मासिकं वाचली. सुमारे वर्षभरात त्यानं फोटोलॅब उभी केली. त्या फोटोलॅबसाठी काही उपकरणं जुन्या बाजारातून लागतील तशी विकत आणली. फोटोग्राफीत रस असलेला आमच्या शाळेतला तो चौथा विद्यार्थी असल्यामुळे तशी आवड असलेल्या इतरांच्या सोबत त्यानं बांधलेली लॅब अगदी झकास दिसत होती.

सॉल सोळा वर्षाचा झाल्यावर त्याला चांगल्या शिक्षकाकडून अनुभव हवा होता. मग महिनोनमहिने तो बोस्टनच्या रस्त्यांवर भटकत त्याला मदतनीस म्हणून ठेवून घेणारा एखादा व्यावसायिक फोटोग्राफर शोधत फिरत होता. मात्र त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. “आधी कॉलेजमध्ये शिक किंवा मास प्रोसेसिंग लॅब मध्ये काम कर, नंतर आमच्याकडे ये” असे सल्लेच फक्त त्याला मिळत होते.

या सगळ्यामुळे जो या फोटोग्राफरला भेटेपर्यंत सॉलला आपली बाजू कशी मांडायची ते नीटच ठाऊक झालं होतं. त्यामुळे जोनं सॉलला नाकारण्यासाठी मांडलेले मुद्दे एकामागून एक खोडले गेले. एकूण जोला एका लहान मुलाला शिकवायचा धोका पत्करायचा नव्हता. मुलं फार बेजबाबदार असतात, वेळेवर येत नाहीत. सगळा पसारा करुन ठेवतात अशी त्याची मतं होती. पण सॉलला कॉलेजनंही पाठिंबा दिला. स्वतः सॉलनंही जोला अनेक वायदे केले. अखेरीस आठवड्यातून दोन दिवस बोस्टनची बस पकडून सॉल जोला मदत करायला जाऊ लागला.

सॉलनं अगदी मुळापासून फोटोग्राफी शिकायला सुरुवात केली. वर्षभरात त्याचं मदतनीस म्हणून काम पूर्ण झालं. जोची लॅब चालवायचं जोनं त्याला नंतर आमंत्रणही दिलं.

आज सॉल हा आर्ट फोटोग्राफर आहे आणि त्यातल्या तंत्रज्ञानात तो प्रचंड निष्णात म्हणून नावाजला जातो!

अशी अनेक उदाहरणं आहेत. मात्र आजपर्यंत ॲप्रेंटिसचं काम पूर्ण झालं नाही याला शिकवणाराच जबाबदार होता असंच नेहमी घडत आलंय. शिकवणाऱ्यानं केलेले करार त्यानं पाळलं नाहीत त्यामुळे काम अपुरं राहिलं आणि त्या विद्यार्थ्यानं कंटाळून दुसरीकडे संधी शोधली असंही काही वेळा घडलं.

एका माणसानं मात्र आजपर्यंत कोणीही शिकवलं नसेल इतकं आमच्या विद्यार्थ्यांना शिकवलं.

त्याचं नाव ॲलन व्हाईट. तो जनरल काँट्रॅक्टर होता. आमची शाळा सुरु होण्याच्या सुमारास तो एका दुसऱ्या पब्लिक स्कूलमध्ये व्यवस्थापक म्हणून काम सुरु करुन पायऱ्या चढत चढत तिथला प्रिन्सिपल झाला. त्याच्यात मुळातच एक उत्तम व्यवस्थापकाचे सर्व गुण होते. तो प्रचंड हुशार असला तरी तसं त्याच्या वागण्यात अजिबात दिसत नसे. मुख्य म्हणजे तो अतिशय शांतपणे गोष्टी हाताळत असे. तो प्रचंड व्यवस्थित आणि नीटनेटका होता.

आमची शाळा सुरु झाली तेव्हा अख्ख्या बोस्टनमधल्या पब्लिक स्कूल्समधून आम्ही काय करतोय ते बघायला येणारा ॲलन हा एकमेव माणूस होता. त्याला आमच्याबद्दल खूप कुतूहल होतं. त्यामुळेच तो आमच्या शाळेचा एक सदस्य झाला आणि अल्पावधीतच आमच्या शाळेचा सुपरिंटेंडंट झाला. सडबरी व्हॅली स्कूल हा त्याचा छंदच बनला. सडबरी शाळेत तो जितका रस घ्यायचा तितके त्याला बरेवाईट बदल सुचायचे. पण पब्लिक स्कूलमध्ये मात्र तसे बदल त्यानं कधीच सुचवले नाहीत. मुळात तिथे त्याचा फारसा जीव नव्हताच.

त्याच्या पब्लिक स्कूलमध्ये त्याला बराच विरोध सहन करावा लागला होता. शाळा आणि तिथली शिक्षणपध्दत पारंपारिक पध्दतीनं न चालवता वेगळ्या पध्दतीनं चालवल्याबद्दल शाळेतले लोक त्याच्यावर नाराज होते. पंधरा वर्षं ती शाळा चालवल्यावर त्यानं ती सोडली. निवृत्तीनंतरचे सगळे फायदे सोडून तो सरळ त्याच्या सुतारकामाकडे वळला आणि जनरल काँट्रॅक्टर झाला.

या सगळ्या काळात त्यानं आमची साथ कधीच सोडली नाही. मदत करायला, सल्ले द्यायला तो सतत उपलब्ध होता. शाळेच्या कॉर्पोरेशनमध्ये दरवर्षी तो अध्यक्ष म्हणून निवडून येत असे.

त्यामुळे शाळेत कोणालाही सुतारकाम किंवा बांधकामात रुची असेल तर त्याला ॲलनकडे पाठवण्यात येत असे. असे चार विद्यार्थी ॲलनच्या हाताखाली तरबेज झाले, व्यवसाय कसा करायचा ते शिकून व्यावसायिकही बनले.

तसंच आमच्या मुलांना शिकवण्यामुळेच ॲलनला त्याच्या आवडीच्या शिक्षणक्षेत्रात काम करायला मिळत होतं हा त्यालाही फायदाच होता!

५. द आदर 'आर'स

सुमारे दोन दशकं सडबरीमध्ये डिसलेक्सियाची केस नव्हती. डिसलेक्सियाची कारणं, लक्षणं, वैशिष्ट्यं यावद्दल तज्ज्ञांमध्येही बरेच वाद होते. काही मंडळींच्या म्हणण्यानुसार २०% मुलं या मनोविकाराचे बळी असतात.

पण आमच्या शाळेत ही केस दिसली नाही हे मात्र खरं..! अर्थात आम्ही कोणालाच कसं वाचावं हे शिकवलं नाही हेही त्याचं कारण असू शकतं.

मात्र 'वाचन' या प्रकारानं आमची परीक्षाच घेतली. वाचनाच्याही बाबतीत आम्ही मुलांनी पुढाकार घेण्याची वाट पहात असू. आम्ही कोणालाच वाचन शिकण्यासाठी सुचवत नसू. कोणीच मुलांना "आता वाचायला शिक" वगैरे म्हणायच्या फंदात पडत नसे. तसंच "आता तुला कसं वाचावं ते शिकायला आवडेल का? " असे प्रश्नही विचारत नसे. किंवा "वाचण्यात किती मजा आहे असं तुला वाटत नाही का? " असंही खोट्या खोट्या उत्साहात विचारत नसे. मुलांनी कोणत्याही शिकण्याच्या दिशेनं पहिलं पाऊल स्वतः उचलायची आपण वाट पहावी ! असं आमचं ध्येयवाक्य होतं.

गोष्टी त्यांच्या त्यांच्या वेळेनुसार, दुसऱ्याला हवं असेल तेव्हा घडल्या तर आयुष्य सोपं होतं. आमच्याच कुटुंबाचं उदाहरण बघा ना..! माझ्या सर्वात मोठ्या मुलाला वाचनात पाचव्या वर्षी रस निर्माण झाला. सहाव्या वर्षी तो स्वतःचा स्वतः सराव करुन उत्कृष्ट वाचक बनला होता. सगळं अगदी सुरळीत झालं.

मग माझ्या मुलीचा नंबर होता. ती भावापेक्षा अडीच वर्षांनी लहान होती. तिला स्वतःहूनच वाचावंसं वाटेल अशी इतर मुलांची पहायचो तशी आम्ही  तिच्याबाबतही वाट पहात होतो. मग आम्ही वाट पाहिली.. पाहिली..! अगदी ती सहा वर्षांची होईपर्यंत वाचत नव्हती. तोपर्यंत तरी जगाच्या दृष्टीनं ठीक होतं. सातव्या वर्षीही ती वाचत नव्हती हेही लोकांना फारसं खटकलं नाही. पण आजी-आजोबा, ओळखीपाळखीचे लोक जरा अस्वस्थ झाले. आम्हाला सांकेतिक इशारे मिळायला लागले.

पण मग वयाच्या आठव्या वर्षीदेखील ती वाचत नव्हती हे मात्र लोकांना भयंकरच वाटलं. आम्ही बेजबाबदार पालकांत गणले गेलो. आणि आमची शाळा ? आठ वर्षाच्या अशिक्षित मुलीवर तिला वाचन शिकवण्यासाठी काहीच उपाय न करणारी ती कसली शाळा, असंच सगळ्यांना वाटत होतं.

मजा म्हणजे खुद्द शाळेत मात्र कोणाला काही वेगळं जाणवतसुध्दा नव्हतं. तिच्याबरोबरचे आठ वर्षांचे बहुतेक सगळे मित्रमैत्रिणी वाचत होते. त्यातले काही वाचत नव्हते. माझ्या मुलीला मात्र कसलीच फिकीर नव्हती. तिचे शाळेतले दिवस आनंदात, मजेत चालले होते.

नवव्या वर्षी मात्र तिनं वाचायला शिकायचं ठरवलं. तिनं तो निर्णय कसा घेतला मला माहिती नाही आणि आज तिलाही ते आठवत नाही. मात्र साडेनऊ वर्षांची होईपर्यंत ती नीट वाचायला लागली होती. मग तिला काही प्रॉब्लेम आहे असं लोकांना वाटेनासं झाले. पण तिला स्वतःला तो कधीच प्रॉब्लेम वाटला नव्हता हे महत्वाचं!

यात मला तरी काहीच वेगळं वाटलं नाही. शाळेत काही मुलं वाचायला लवकर शिकतात, तर काही उशीरा शिकतात. आपण आता वाचावं अशी त्यांच्या मनाची तयारी झाली की मात्र ते सगळे वाचायला शिकतात. अशी मनाची तयारी व्हायच्या एक मिनिटदेखील आधी ते वाचायला शिकत नाहीत. पण आमच्याकडचे सगळेजण अखेरीस वाचायला शिकतात एवढं खरं..!

तसंच एक गंमतीशीर विरोधाभास म्हणजे, उशीरा वाचायला शिकणारे काहीजण अगदी पुस्तकातला किडा होतात. खूप वाचतात. लवकर वाचायला शिकणारे वाचन शिकून झाल्यानंतर मात्र अनेकदा पुस्तकाला हातही लावत नाहीत.

आमच्या शाळेत एकही पाठ्यपुस्तक नव्हतं. पहिली, दुसरी, तिसरी अशी कोणत्याच इयत्तेप्रमाणे वगैरे पुस्तकं नव्हती. खरं तर शिक्षक सोडून इतर किती मोठी माणसं ती पुस्तक पहात असतील याचं मला नेहमीच कुतूहल वाटत आलं आहे.  ती पाठ्यपुस्तकं कंटाळवाणी असतात आणि त्यातल्या विषयांशी त्यांचा खरा संबंधही नसतो.

त्यातलं एखादं पाठ्यपुस्तक एखाद्या लहान मुलानं आनंदानं वाचायला घेतलंय असं दृश्य साहजिकच मी कधीच पाहिलेलं नाही.

खरं तर आमच्या शाळेत वाचनावर कोणीच फारसं लक्ष देत नाही. काही मोजक्या मुलांनाच त्यांनी वाचायला शिकल्याचं ठरवल्यावर मदत लागते. नाहीतर प्रत्येक मुलाची वाचन शिकायची एक  स्वतंत्र पध्दत असते. काहीजण कथा पाठ करतात आणि अखेरीस त्या वाचायला शिकतात. काही जण त्यांच्या बिस्किटांच्या पुड्यावर लिहिलेलं वाचून, तर काही जण खेळ खेळताना त्यातल्या नियमांच्या सूचना वाचून, तर काहीजण रस्त्यावरच्या पाट्या वाचून शिकतात. काहीजण अक्षर न अक्षर वाचतात तर काहींना एकदम पूर्ण शब्दांचं आकलन होतं. प्रामाणिकपणे सांगायचं तर मुलांना वाचन कसं जमायला लागतं ते आपल्याला फारसं माहिती नाही. आणि मुलंही आपल्याला ते फार कमी वेळा सांगतात. नुकतंच वाचायला शिकलेल्या एका लहान मुलाला  तू वाचायला कसा शिकलास असं मी एकदा विचारलं. “ते एकदम सोपं होतं. मी सुरुवात केली आणि वाचत गेलो आणि मग मला कळलं कसं वाचायचं ते..!” असं त्यानं उत्तर दिलं होतं.

मुलांना वाचणं हे बोलण्यासारखंच वाटतं. समाज मुलांना बोलावं कसं या क्लासला  घालत नाही. (अर्थात याचं कारण म्हणजे शाळेनं मुलांचा ताबा घेण्याआधी बहुतेक मुलं बोलायला शिकलेली असतात हेच असू शकतं..! एक वर्षांची झाल्यावर मुलं शाळेत जायला लागली तर बोलण्याचेही क्लासेस निघतील. आणि मग स्पीकिंग डिसऑर्डर असा नवीन विकारही चालू होईल.)  काही दुर्दैवी मुलांना बोलताना अडखळायला होतं आणि उपचारांची गरज भासते. मात्र एकूण सगळेजण कसं कोण जाणे पण स्वतःला बोलायला शिकवतात.

मुलं बोलायला का शिकतात? अर्भकांभोवती सगळी मोठी माणसं एकमेकांशी बोलून संवाद साधत असतात. मुलांना त्या बोलणाऱ्यांच्या जगावर हुकमत गाजवायची इच्छा असते. त्यामुळे अतिशय तन्मयतेनं ते बोलायला शिकतात.

आमच्या सडबरी व्हॅलीमध्ये वाचायला शिकण्याच्या बाबतीत हेच घडतं. मुलांना त्यांच्या स्वतःच्या भरवशावर सोडल्यावर त्यांना जगात स्वतःचं एक स्थान मिळवण्याची गरज भासते. त्या स्थानाकडे वाटचाल करण्याच्या दरवाजाचं कुलूप उघडण्याची ‘लिहिलेले शब्द’ ही किल्ली असते. मग कुतूहल वाटून ते त्या किल्लीचा पाठपुरावा करतात.

मुलांना बोलायला शिकण्यापेक्षा वाचायला शिकणं सोपंही असतं. कारण तोपर्यंत ते वयानं वाढलेले असतात आणि नवीन काहीतरी शिकण्याचा त्यांचा अनुभवही वाढलेला असतो. त्यांना भाषा म्हणजे काय, ती कशी वापरतात, शब्द म्हणजे काय हे कळलेलं असतं. बोलायला शिकायला जेवढा वेळ लागतो त्याच्यापेक्षा फार कमी वेळात मुलं वाचायला शिकतात.

लिहिणं यातही वेगवेगळे प्रकार आहेत. बऱ्याच मुलांना नुसतं लिहायचं नसतं, तर सुंदर काहीतरी (कॅलिग्राफी) लिहायचं असतं. मग ते सुंदर कसं लिहायचं ते शिकायला कोणाकडेतरी जातात. चांगलं लिहिता येणं हे अशा मुलांना भरतकाम किंवा चित्रकलेसारखं वाटतं.

पण असं सुंदर लिहिण्यात कधी तरी मजेदार अडथळे येतात. लहान मुलं अतिशय कोरीव, वळणदारपणे काहीतरी लिहिण्याचा प्रयत्न करत असतात पण तेव्हा त्यांना वाचता येत नसतं असं विचित्र दृश्य दिसू शकतं.

“तुम्हाला वाचता येत नाहीये तर तुम्ही कॅलिग्राफी का शिकताय ?” आमच्या शाळेतल्या मुलांना हा प्रश्न मी बऱ्याचदा विचारतो.

“कारण ते सुरेख दिसतंय.” असं मुलांकडून उत्तर येतं.

काही मुलं चांगलं हस्ताक्षर ही एक कला आहे असं समजून शिकतात. पुढे त्यांना दुसऱ्या कशाचा तरी मोह पडतो आणि हस्ताक्षर वगैरे मागे पडतं.

मला वाटतं वाचायला, लिहायला मुलांनी स्वतःहून शिकणं गरजेचं आहे. सडबरी व्हॅलीमध्ये आमच्याकडे आम्ही वाचायला शिकण्यासाठी एकाही मुलाला धाक दाखवला नाही, जबरदस्ती केली नाही, लालूच दाखवली नाही. त्यामुळेच कदाचित आमच्याकडे डिसलेक्सिया प्रकार नव्हता.

आमच्याकडचे कोणीच विद्यार्थी शाळा सोडून जाताना अशिक्षित रहात नसत. भले ते आठव्या वर्षी शाळा सोडू देत, दहाव्या वर्षी नाहीतर बाराव्या वर्षी..! मुलं स्वतःचं काहीतरी वैशिष्ट्य शिकून घेऊनच शाळा सोडत असत. आमच्याकडच्या मोठ्या विद्यार्थ्यांना पहिल्यांदा भेटणाऱ्या व्यक्तीला तो विद्यार्थी कोणत्या वयात लिहायला किंवा वाचायला शिकला याचा अंदाजही बांधता येत नसे इतकी ती मुलं कधीही लिहा-वाचायला शिकली तरी वाचण्यात निष्णात झालेली असत.

६. फिशिंग

दरवर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात जॉन माझ्याकडे त्याच्या मुलाच्या संदर्भात गप्पा मारायला यायचा. जॉन म्हणजे आमच्याकडे शिकणाऱ्या डॅनचे वडिल! जॉऩ हा एक हुशार सदगृहस्थ होता. पण त्याला डॅनची जरा काळजी वाटायची. मग तो वर्षातून एकदाच येऊन माझ्याशी गप्पा मारुन खात्री करुन घेत असे.

आमच्यातल्या संवादाचं हे एक उदाहरण :

जॉनः “मला तुमच्या शाळेची कार्यपध्दत माहिती आहे, मला ती नीट समजते. पण मला जरा काळजी वाटते. याबद्दल तुमच्याशी थोडं बोलायचं होतं. ”

मीः “काय प्रॉब्लेम आहे. ” (अर्थात मला तो प्रॉब्लेम माहिती असायचा. त्यालाही माहिती असायचा. कारण सलग पाच वर्षं आम्ही एकमेकांशी हेच बोलत होतो.)

जॉनः “ डॅन दिवसभर शाळेत फक्त फिशिंग करतो. ”

मीः “मग त्यात काय प्रॉब्लेम आहे.”

जॉनः “रोज, नेहमी, हिवाळा, पावसाळा, उन्हाळा काहीही असू दे. तो फक्त फिशिंग करतो. ”

मी त्याच्याकडे पाहून त्याच्या पुढच्या वाक्याची वाट पहातो. कारण त्यातून कदाचित मला पुढे बोलता येणार असतं.

जॉनः “तो काहीच शिकणार नाही याची मला काळजी वाटते. तो मोठा होईल आणि त्याला काहीच माहिती नसेल. ”

या मुद्यावर माझं पुढचं छोटंसं भाषण सुरु व्हायचं, जे ऐकायलाच जॉन आलेला असायचा.

“ते ठीक आहे. ” मी सुरुवात करायचो. “डॅन बरंच काही शिकलाय. पहिलं म्हणजे, तो फिशिंगमध्ये निष्णात झालाय. मासे, त्यांच्या जाती, त्यांचं रहाणं, वागणं, त्यांची जीवशास्त्रीय माहिती, त्यांच्या आवडीनिवडी यातलं त्याला खूप माहिती आहे. माशांचं इतकं ज्ञान माझ्या पाहण्यात तरी त्याच्या वयाच्या इतर कोणालाच नाही. तो एक उत्कृष्ट मासेतज्ज्ञ होईल. न जाणो, तो मोठा झाल्यावर पुढचं ‘कंप्लीट अँगलर’ (इझाक वॉल्टन यानं हे मासे या विषयावर लिहिलेलं बायबल समजलं जातं असं पुस्तक) लिहिल.”

मी माझ्या भाषणात इथवर पोचल्यानंतर जॉन जरा अस्वस्थ व्हायचा. सामाजिक प्रतिष्ठेला अवाजवी महत्व देणारा तो नव्हता. पण आपला मुलगा फिशिंग विषयातला तज्ज्ञ असणं हेही त्याला काही फार रम्य चित्र वाटत नव्हतं. मी पुढे सुरु करायचो. “डॅन अजूनही बऱ्याच गोष्टी शिकलाय. एखादा विषय पकडून त्यावर चिकाटीनं अभ्यास करायला शिकलाय. स्वतःला हवं ते शिकण्यातलं महत्व त्याला कळतंय. यासाठी त्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा त्याला आदर वाटतो. आणि तो आनंदी कसं रहावं ते शिकलाय.”

खरंच डॅन हा शाळेतला सर्वात आनंदी मुलगा होता. त्याच्या चेहऱ्यावर सतत स्मितहास्य असे. लहानथोर, मुलंमुली सर्वांना डॅन प्रिय होता.

मग मी शेवटची काही वाक्यं बोलायचो. “या सर्व गोष्टी त्याच्यापासून कोणीच हिरावून घेऊ शकत नाही. पुढे कधीतरी त्याला जर फिशिंगमध्ये रस राहिला नाही तर तो दुसऱ्या कोणत्यातरी विषयात मन लावून काम करु शकेल.”

मग जॉन उठून माझे आभार मानून निघून जायचा. पुढच्या वर्षीपर्यंत तो यायचा नाही. त्याची बायको कधीच त्याच्यासोबत यायची नाही. ती सडबरी व्हॅलीवर खुष होती. कारण तिचा पोरगा खुष होता.

मग एके वर्षी जॉन माझ्याशी बोलायला आलाच नाही. डॅननं फिशिंग सोडलं. वयाच्या १५व्या वर्षी तो कॅम्प्युटर्सच्या प्रेमात पडला. एका जवळच्याच दुकानात तो कॅम्प्युटर दुरुस्तीचं काम करायला लागला. १७व्या वर्षी तो आणि त्याच्या दोस्तांनी मिळून कॅम्प्युटरची विक्री आणि दुरुस्ती करणारी स्वतःची कंपनी सुरु केली. १८व्या वर्षी आमच्या शाळेतून बाहेर पडून तो कॉलेजमध्ये कॅम्प्युटर शिकायला गेला. तोपर्यंत त्यानं त्याच्या शिक्षणासाठी आणि उदरनिर्वाहासाठी पैसे जमवले होते. कॉलेजमध्ये असतानाच एकीकडे हनीवेल या प्रख्यात कंपनीत एक संगणकतज्ज्ञ म्हणून तो कामाला होता.

मात्र फिशिंगमध्ये शिकलेलं ज्ञान जॉन नंतरच्या आयुष्यात कधीही विसरला नाही.

फिशिंगच्या अद्भुत दुनियेबद्दल अनेकांनी लिहिलं आहे. आम्हीही आमच्या डोळ्यांनी शाळेत ते पाहिलंय. मुलांना फिशिंग आवडतं. ते त्यांना आव्हानात्मक आणि मजेदार वाटतं. ऊन असो वा पाऊस शाळेच्या तळ्याजवळ हिरव्या घनदाट वृक्षांच्या सान्निध्यात, ग्रॅनाईटच्या काळसर इमारतीच्या पार्श्वभूमीवर, संथ वाहणाऱ्या पांढऱ्याशुभ्र प्रवाहाकडे पहात फिशिंग करताना मुलं सौंदर्य टिपत असायची. सर्वांना ते सौंदर्य जाणवायचं.

फिशिंग ही एक सगळ्यांनी मिळून करायची गोष्ट आहे. आमच्या शाळेतली मुलं त्यांच्या मित्रांसोबत किंवा मोठ्या माणसांसोबत फिशिंग करत. आपापले गळ, त्यांचे दोर वगैरे शिकणारी पाच-सहा वर्षांची नवीन मुलं दरवर्षी शाळा सुरु झाल्यावर दिसायची.

पण कधीकधी एकटा माणूसही फिशिंग करु शकतो. तिथे कोणीच तुम्हाला त्रास द्यायला नसतं. कधीकधी गळ घेऊन आमच्याकडचा एखादा मुलगा एकटाच फिशिंगला निघायचा. तळ्याकाठी शांतपणे स्वतःशी संवाद साधायला, ध्यान लावून बसायला तो एकटा जायचा.

एका प्रकारे, फिशिंग हा आमच्याकडे शालेय जीवनातला महत्वाचा भाग होता. त्या दृष्टीकोनातून पाहिलं तर, तळं असलेला शाळेचा परिसर लाभणं हे किती भाग्याचं होतं असा मी अनेकदा विचार करत असे.

डॅन आणि जॉऩ यांच्यासोबतचा अनुभव शाळेच्या सुरुवातीच्या वर्षांमधला होता. त्या अनुभवामुळे शाळा म्हणजे काय याबद्दल मी विचार करायचो. मग माझं शेंडेफळ दिवसभर नुसतं फिशिंग करायला लागलं तेव्हा मी अगदी निश्चिंत होतो. या अनुभवात मला वेगळेपण जाणवलं नाही.

मुख्य म्हणजे तो काय करतोय हे त्याला माहिती आहे, हे मला माहिती होतं!

७. नोहाज आर्क

आम्ही शाळेसाठी विकत घेतलेल्या आवारात घोड्यांच्या पागेसाठी जागा होती याचा आम्हाला आनंदच होता. अर्थात त्याची सुरुवात वेगळ्याच प्रकारे झाली. मॉली नावाची एक घोडेस्वार त्या भागात प्रसिध्द होती. आमच्याकडच्या मुलांना ती घोडेस्वारी शिकवू शकेल का? असं तिनं विचारल्यावर बऱ्याच वादचर्चा होऊन अखेरीस आम्ही होकार दिला. मग १ जुलै १९६८ रोजी आमची शाळा सुरु झाल्यावर किंचित जास्त फी घेऊन आम्ही मुलांना घोडेस्वारीदेखील शिकवू शकतो असं आमच्या लक्षात आलं.

पण २ जुलैलाच आम्हाला कळलं की तिचा लवाजमा घेऊन मॉली आमच्या शिक्षकांच्या रुममध्ये रहायलाच आलीय. तिला रहायला जागाच नव्हती. शिक्षकांच्या रुमजवळ बाथरुम किंवा स्वयंपाकघर नसल्यामुळे आम्हाला ती कशी रहाणार हे सगळंच शंकास्पद वाटत होतं.

तिचे घोडे आमच्या पागेत राहिले. घोड्यांच्या स्वच्छतेच्या मॉलीच्या स्वतःच्या काहीच योजना नव्हत्या. दिवसेंदिवस घोड्यांची लीद आणि तिचा ढीग वाढत होता. ते आरोग्याला घातक होतंच पण हेल्थ आणि फायरच्या कायद्याविरुध्दही होतं.

सुरुवातीच्या दिवसांमधल्या आमच्या चिंतापैकी घोडे, त्यांची स्वच्छता ही एक महत्वाची चिंता होती. पण मॉलीलाही आमच्याकडे फार कमाई होईना. मग ती गाशा गुंडाळून निघून गेली.

पण मॉली गेली तरी तिनं चालू केलेला प्राणी पाळायचा उपक्रम गेला नाही.

त्याचं असं झालं. एक दिवस "आम्हाला त्या जागेत मेंढ्या पाळायच्या आहेत" अशी विल्सन नावाच्या मुलाची मागणी आली. शाळेच्या मीटींगमध्ये विल्सन आणि कंपनी त्यांची बाजू जोरात मांडत होते. आम्ही आमच्याकडून आमच्या त्यातल्या सर्व अडचणी मांडत होतो.

"तुम्हाला शनिवार-रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी देखील त्यांची देखभाल करावी लागेल."

"नो प्रॉब्लेम.. " हेच अपेक्षित उत्तर आलं. ते एकूण चौघं होते. तीन मुलं आणि एक मुलगी. आणि त्यांच्या सांगण्यानुसार ते मेंढ्यांची कामं वाटून घेणार होते.

"तुम्हाला मेंढ्या पाळण्याबद्दल काहीच माहिती नाहीये." आम्ही म्हणालो.

"हे खरं नाहीये. आम्ही पुस्तकात माहिती वाचलीय आणि दुसऱ्यांच्या मेंढ्या पाळायला मदतही केलीय. आता आम्हाला स्वतःच्या मेंढ्या पाळायला शिकायच्या आहेत. आमची आई मदत करेल." मुलांची उत्तरं तयार होती. त्यांच्यातल्या एकाची आई आमच्या शाळेतच शिकवत होती. "ठीक आहे" असा आम्ही विचार केला. ही शिक्षणातलीच एक मागणी आहे. अर्थात, मग मुलांचं मेंढ्या पाळण्याचं शिक्षण नीटच झालं आणि या शिक्षणासोबत इतरही बरंच ज्ञान सर्वांना झालं. एकतर आमचं मैदान खेळायला वापरता येणं मुष्किल झालं कारण मेंढ्या जिथेतिथे लेंड्या टाकतात. आणि रोज त्या चौघांपैकी एकालातरी त्या मेंढ्यांना मैदानात फिरायला न्यायची हुक्की यायचीच. मग त्या लेंड्यांचा एक रस्ताच तयार व्हायचा. म्हणजे वास वगैरे यायचा नाही. पण कोणाला त्या हिरवळीवर बसून गप्पा मारणं ़शक्य व्हायचं नाही.

दुसरं म्हणजे त्या मेंढ्या मधूनमधून मोकाट सुटायच्या. तशा त्या सुटल्यावर संपूर्ण शाळेत कोलाहल माजायचा. सगळेजण त्यांना पकडून आणायला धावत सुटायचे. गडबड, गोंधळ, आरडाओरडा असं करत त्यांना पकडून आणायचं काम पूर्ण व्हायचं. कधीकधी त्या शेजारच्या एका जागेतही घुसायच्या. आमची लोकांमधली जी काय 'थोर' प्रतिमा होती ती प्रतिमा यामुळे अजूनच बिघडायची.

अखेरीस आम्ही सगळे मेंढ्यांना कंटाळल्यावर अनेक दिवसांनी त्या चौघांना मेंढ्यांचा कंटाळा आला.

मग ससे आले.

"व्यावसायिकरीत्या ससे कसे पाळायचे ते आम्हाला शिकायचंय." ते म्हणाले. यावेळीही तीच चौघांची टीम होती. ते स्वतःला विल्सन गँग म्हणवत.

याहीवेळी आम्ही क्षीण आवाजात आमचा निषेध नोंदवला. त्याचा काही उपयोग नव्हता. आमचा पराभव होणार हे आम्हाला ठाऊकच होतं.

ते प्राण्यांची नीट काळजी घेतील असं त्यांनी मान्य केलं होतं. ससे पिंजऱ्यात ठेवले जाणार होते. ते सुटणार नव्हते. हे आम्हाला माहिती होतं. ससा पळून गेला तर परत पकडून आणणं अशक्य असतं हे त्यांना माहिती होतं.

मग आमचा तबेला सशांची फॅक्टरीच बनला. म्हणजे अर्थात विल्सन गँगला त्यांचा कंटाळा येईपर्यंत..!

मुलांचं प्राण्यावरचं प्रेम कधीकधी धाडसी रुप धारण करायचं. जसा ७५ सालच्या हिमवादळाचा एक दिवस होता. त्या दिवशी बर्फामुळे रस्ते बंद होते. उद्योगधंदे, शाळा सगळंच बंद होतं. ख्रिस आणि ॲमी या आमच्या शाळेतल्या मुलांना शाळेत ठेवलेल्या प्राण्यांची फार काळजी वाटत होती. ते घरी होते आणि शाळेच्या तबेल्यापर्यंत पोहोचणं शक्यच नव्हतं. त्यांचे प्राणी उपाशी होते.

“आई, प्लीज.. मेंढ्यांना खायलाप्यायला द्यायलाच हवं..! ” ते आईला म्हणाले.

“गाडी चालवणं शक्यच नाहीये. रस्त्यावर गाड्या न्यायलाच मनाई आहे. ” त्यांची आई म्हणाली.

हे संभाषण पुढे अजिबात न वाढवता क्षणार्धात ती जोडगोळी शाळेच्या दिशेने ७ मैलांच्या सफरीवर चालत निघाली होती. घरापासून शाळेत चालत जाऊन शाळेतल्या मेंढ्यांना खायलाप्यायला घालून दोघं काळजी करत असलेल्या आईकडे परत आले तेव्हा सहा तास उलटले होते.

मग शाळेची जरा डागडुजी केल्यावर प्राणी पाळणं काही काळ बंद झालं.  पण तबेला मात्र अजूनही आहे. घोडे पाळणं अजूनही शक्य आहे. मधूनमधून मुलं प्राणी आणून पाळतात. आणि मग त्या प्राण्यांमधला रस संपला की दुसऱ्या गोष्टींकडे वळतात!

८. केमिस्ट्री

गोष्टी कधी ना कधी जुन्या होतातच.

माझ्या बालपणी आजूबाजूचे सगळे हुशार लोक हे रसायनशास्त्रातले पदवीधर असायचे. त्यांच्या त्यांच्या तळघरात प्रयोगशाळा होत्या, जिथे ते त्यांचा बराचसा वेळ घालवत. एखाद्या नवशिक्या रसायनशास्त्रज्ञानं चुकीची रसायनं मिसळल्यामुळे आग लागणं किंवा स्फोटाचा आवाज येणं ही तेव्हा नित्याची बाब होती.

१९६० पर्यंत मात्र रसायनशास्त्राला फारसं महत्व उरलं नाही. हन्ना नावाची एक रसायनशास्त्रातली उत्तम पदवीधर आमच्या शाळेत होती. पण कोणालाच तिची फारशी गरज भासत नव्हती.

आम्ही रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळेशिवायच शाळा सुरु केली होती. बराच काळ ते खपूनही गेलं.

मग एक दिवस काही मुलांना रसायनशास्त्राचा किडा चावला. त्यांच्यासाठी काहीतरी करायला हवंच होतं. तेव्हा काहीही नवीन करायचं म्हणलं तर आमच्याकडे पैसे नसायचे. १९७०च्या सुरुवातीच्या काळात आम्ही शाळा चालवायला फारच झगडत होतो. इतर शाळांसारखी प्रयोगशाळा उभारायची तर सगळी शाळा उभे करायला लागले त्यापेक्षा जास्त पैसे प्रयोगशाळेला लागले असते.

हन्ना आमच्याकडे येण्याआधी एमआयटी युनिव्हर्सिटीमध्ये बायोकेमिस्ट म्हणून नोकरी करत होती. तिचे तिकडे आणि इतर विद्यापीठांतही बरेच मित्रमैत्रिणी होते. तिकडे उपकरणांच्याबाबतीत काय चालतं ते तिला नीट आठवत होतं. अशा विद्यापीठांमध्ये दरवर्षी लोक नवनवीन प्रोजेक्ट सुरु करताना नवीन उपकरणं खरेदी करायचे. आणि टनावारी जुनी उपकरणं आणि फर्निचर टाकून द्यायचे.

हन्नानं त्यांनी टाकून दिलेल्या उपकरणांचा कचरा धुंडाळायचा ठरवला. कारण त्यात सगळ्या गोष्टी खऱ्या तर नवीनच असतात. आम्हाला लागणाऱ्या गोष्टींची यादी करुन तिनं सगळे कचरे तपासले तर बायॉलॉजी आणि रसायनशास्त्र दोन्ही प्रयोगशाळांना लागणारी सगळी उपकरणं जमा झाली.

ती सामुग्री म्हणजे शाळेसाठी बनवलेली शैक्षणिक ओबडधोबड मॉडेल्स नव्हती तर सगळं उच्च दर्जाचं व्यावसायिक पातळीवर वापरण्यासाठीचं सामान होतं. प्रयोगशाळेतली टेबल्स, कपाटं, काचसामान, सूक्ष्मदर्शक, खुर्च्या सगळं काही सुरेख होतं. आम्ही फक्त अग्निशामक उपकरणं, आगीपासून बचाव करणारे ब्लँकेटस्, पंखे इतकंच सामान विकत घेतलं. तेही त्या 'कचऱ्यात' उपलब्ध होतं पण आमच्या खोल्यांच्या मानाने फार मोठं होतं.

आमची प्रयोगशाळा उभारायला काही महिने गेले. ती योग्य आहे असं सर्टिफिकेट इन्स्पेक्टरनं दिल्यावर ती चालू झाली.

रसायनशास्त्र तेव्हा फार लोकप्रिय नव्हतं. दरवर्षी तिथे थोडंफार काम चालायचं. पण जे काय चालायचं ते मात्र उत्तम उपकरणं वापरुन दिमाखात चालायचं.

सगळेच रसायनशास्त्रातले प्रयोग शाळेतल्या प्रयोगशाळेत होत असं मात्र नाही.

उदाहरणार्थ, एक दिवस मी शाळेत प्रवेश केला आणि कसलातरी विचित्र वास आला. त्यापूर्वी मी कधीच तसा वास घेतला नसल्यामुळे मला तो वास ओळखता आला नाही. तो मंद वास होता आणि तळघरातून येत होता असं मला वाटलं.

मग मी जरा चौकशी केली. "दुसऱ्या कोणाला तसा वास जाणवला का?" असं विचारलं. तर कोणालाच तो वास जाणवत नव्हतं. काहीजण वासामुळं किंचित अस्वस्थ होते. मग मी स्वयंपाकघराकडे गेलो. तेव्हा विल्सन गँगनं मला येताना पाहून छताकडे नजर टाकली आणि हसू लपवायचा प्रयत्न केला.

काहीतरी शिजतंय हे कळायला माझ्यासाठी त्यांचं ते हसू लपवणं पुरेसं होतं. काहीतरी कट शिजत होता हे नक्की !

शेवटी छडा लावल्यावर कळलं की तो कट म्हणजे तळघराच्या मागच्या बाजूला दृष्टीआड त्यांनी मिथेन प्लांट उभारलं होतं.

तो सत्तराव्या दशकातला काळ होता. सगळा देश, एकूण जग उर्जेच्या वापराच्या समस्येवर विचार करत होतं. सगळीकडे लोक पर्यायी उर्जेची चर्चा करत होते. पाणी, सूर्य, समुद्राच्या लाटा, कचरा सगळ्यातून उर्जा निर्मिती करण्याच्या चर्चा चालू होत्या.

हा प्रश्न आमच्याकडे विल्सन गँग सोडवायचा प्रयत्न करत होती. मला नेहमीच विल्सन गँग सशांच्या लेंड्याची विल्हेवाट कशी लावते हा प्रश्न पडायचा. आता मला त्या रहस्याचा उलगडा झाला. गॅस जनरेटर टप्प्याटप्प्यानं बांधत आणून त्यांनी काही आठवड्यात तो तयार केला होता.

सशांच्या लेंड्या फर्मेंटेशन टँकमध्ये घालायच्या आणि मिथेन टँकमध्ये मिथेन गोळा करायचा. त्यांच्या दृष्टीनं ते इतकं सोपं होतं. ! सशांच्या लेंड्यांचा मंद वास शाळेत पसरला नसता तर तो प्रकार कित्येक महिने चालू राहिला असता.

विल्सन गँग कोणापासून काही लपवत होती असं नाही. शहरातल्या इन्स्पेक्टरसोबत आमच्या शाळेतला डेव्हिड हा स्टाफचा सदस्य बोलायचा. त्या इन्स्पेक्टरची परवानगी मुलांनी घेतली होती. डेव्हिड रसायनशास्त्रातला नव्हता. त्यामुळे त्याला पटेल अशा भाषेत मुलांनी मिथेन प्लांटवबद्दल सगळं समजावून सांगितलं. डेव्हिडनं इन्स्पेक्टरकडून परवानगी आणून दिली. आम्ही डेव्हिडला दोषी मानलं नाही. पण विल्सन गँगनं विज्ञानातल्या कोणत्याच सदस्याला परवानगीसाठी विचारू नये हा निव्वळ योगायोगही नक्कीच नव्हता.

मग पर्यायी उर्जेचा तो किती मोठा स्त्रोत आहे हे कळण्याआधीच मिथेन प्लांट बंद झाला हे वेगळं सांगायला नको!

९. हंटिंग – वुई विल गो

मिथेन प्लांटला लागणाऱ्या वस्तू सडबरी टाऊन कँपमधून आल्या होत्या. तसंच गवत कापणाऱ्या यंत्राचं (लॉन मोअर) होतं. तसंच सायकली, गाड्या, गोल्फ कार्टस् आणि तत्सम वस्तूंचं होतं. अशा वस्तू आणायला सडबरी टाऊन कँपमधल्या डंपमध्ये नवीन काय आलंय याचं सर्वेक्षण (हंटिंग) करायला हन्ना मुलांना दर आठवड्याला घेऊन जायची.

हे जरा मी अति करुन लिहितोय. पण एकूण जुन्या पण चांगल्या स्थितीतल्या वस्तू वापरायची कल्पना सडबरी व्हॅली स्कूलच्या मुळांमध्ये रुजली होती. लोकांनी वापरून फेकून दिलेल्या इतक्या चांगल्या वस्तू फुकटात उपलब्ध असताना बाकीच्या शाळा फर्निचर वगैरे गोष्टींवर इतके पैसे का घालवतात असा आम्हाला नेहमीच प्रश्न पडायचा.

आम्ही शाळा सुरु करायच्या आधी फर्निचर आणणं गरजेचंच होतं. टेबल, खुर्च्या, सोफा, दिवे, कार्पेटस् अशा बऱ्याचशा घरगुती वस्तूच आम्हाला हव्या होत्या. आमच्याकडे असलेल्या थोड्याफार पैशात आम्ही वापरलेलं जुनं फर्निचर विकणारी दुकानं शोधत फिरत होतो.

या शोधात असतानाच एक दिवस आम्ही फर्मिंगहॅम मधल्या लाऊज या माणसाच्या दुकानात थडकलो. आम्ही काय करतो आणि काय शोधतोय ते त्याला सांगितलं.

“माझा विश्वासच बसत नाहीये. ” तो आम्हाला म्हणाला. “सहा महिन्यांपूर्वी तुम्ही जी इमारत विकत घेतलीत. त्याच्या आधीच्या मालकानं चांगलं चांगलं फर्निचर मला विकलं. त्या फर्निचरनं समोरचं माझं मैदान भरुन गेलं होतं. तुम्हाला ते फर्निचर खरं तर दहा वर्षं उपयोगी पडलं असतं.” लाऊजला आमच्याबद्दल वाईट वाटलं. त्यानंतर वर्षानुवर्षं आम्ही त्याच्या वेअरहाऊसमधलं जुनं फर्निचर विकत घेत होतो.

तसंच बरंचसं फर्निचर आम्हाला फुकटात मिळालं. मुलांच्या पालकांनी आपापल्या घरांमध्ये नवीन फर्निचर घेताना काढलेले जुने सोफे वगैरे आम्हाला दिले. ॲलन व्हाईट एक दिवस त्याच्या घरातलं भलं मोठं कार्पेट घेऊन आला.

त्याला त्याच्या घरात नवीन कार्पेट टाकायचं होतं. आमच्या मोठ्या खोलीला मग ते वॉल टू वॉल कार्पेट चपखल बसलं.

रंगसंगती साधायचीच असा आमचा आग्रह बिल्कुल नव्हता. पण वस्तू जरा इकडच्या तिकडे हलवून खोल्यांचं सौंदर्य वाढवायचा आम्ही प्रयत्न खचितच करायचो. विद्यार्थी आणि शिक्षक कशाला काय मॅच होईल यावर तासनतास चर्चा करायचे. या चर्चेला कधामधी वादाचं स्वरूपही यायचं..!

मग हे सगळं हाताळायला आम्ही एक समिती नेमली. कोणालाही त्याचं सदस्यत्व मिळायचं. आधी त्या सामितीचं नाव 'पेंटिंग अँड हँगिंग कमिटी' असं होतं. मग त्याला 'ॲस्थेटिक्स कमिटी' असं नामाभिधान प्राप्त झालं. त्या समितीतली सुंदर नसणारी गोष्ट म्हणजे सदस्यांचे वादविवादातून चढलेले आवाज..!

खूप वस्तू फुकट मिळाल्या होत्या. उदाहरणार्थ, रसायनशास्त्राची प्रयोगशाळा. तसंच स्वतःच्या लहान मुलांसाठी एका इंजिनिअरनं झोपाळे आणि घसरगुंड्या स्वतः बनवले होते. ती मुलं मोठी झाली आणि वडिल गेल्यावर त्यांनी ते सगळं आमच्या शाळेला भेट दिलं. फोटो डेव्हलप करायची लॅब, ग्रंथालय सगळं फुकटातल्या फर्निचरनं सजलं होतं. तसंच आम्हाला कधीच फ्रिज विकत आणावा लागला नाही. आमच्या कँपसाठी छोटे तंबूही भेट म्हणून मिळाले होते.

एका ख्रिसमसच्या संध्याकाळी शाळेतले आयबीएमचे दोन टाईपरायटर चोरीला गेले. आम्हाला त्यांचं खूपच महत्व वाटत होतं. काही मुलांच्या सायकली आणि गिटारही गेल्या. स्टीरिओ सिस्टीम गेली. ती एक दुःखद सुट्टी ठरली.

लगेचच नंतरच्या जानेवारीत एका पालकानं त्याच्याकडचा जुना रेमिंग्टनचा चालू अवस्थेतला टाईपरायटर आम्हाला भ़ेट दिला. तसंच वापरलेल्या जुन्या टाईपरायटरची चौकशी करायला एका दुकानात गेलो तर आमचं विचारुन होतं ना होतंय तोच दुकानदारानं एक टाईपरायटर आम्हाला तसाच फुकट देऊन टाकला. त्यानंतर वर्षभराच्या आत अजून एक आयबीएमचा आणि रेमिंग्टनचा टाईपरायटर येऊन पडला.

आम्ही मागू त्याच्यापेक्षा आम्हाला बऱ्याचदा जास्त मिळायचं. दान म्हणून दिलेली पुस्तकं आम्ही प्रथम घेतल्यानंतर आमची लायब्ररी, एक-दोन इतर खोल्याही पुस्तकांनी भरुन गेल्या. आम्हाला कशाचेच पैसे द्यावे लागले नाहीत. दुर्मिळ पुस्तकं विकणाऱ्या दुकानदारानं परस्पर आम्हाला पुस्तकं मिळवून दिली. वर थोडे पैसेही देणगीदाखल दिले.

पण मग लवकरच शाळेला एखाद्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या दुकानाची कळा आली. जास्तीचे अनेक फ्रिज येऊन पडले.

एक दिवस आम्हाला विणायची व्यावसायिक ६ यंत्रं घेण्याची ऑफर आली. ती चालू स्थितीत होती. पण जुनी झाली होती. त्याचा मालक एका मोठ्या विणकामाच्या मिलचा ट्रस्टी होता. आम्ही त्यावर मुलांना स्वेटर विणायला शिकवू आणि ते स्वेटर विकून काही पैसेही मिळतील असं त्याला वाटत होतं. मात्र ती ठेवायला एका मजल्यावरच्या सर्व खोल्या लागल्या असत्या. आम्ही जरा विचार करुन नाईलाजानं तो प्रस्ताव नाकारला. पण आम्हाला जरा 'माज' आहे असं त्या मालकाला अजूनही वाटत असावं असा मला संशय आहे.

यानंतरच्या एका वसंतऋतूत जोआन धावतपळत माझ्याकडे आला. धावत आल्यानं त्याचा श्वास फुलला होता. “मला मार्जला घेऊन या सेकंदाला बाहेर जायचंय.” तो उतावीळपणे म्हणाला.

दहा मिनिटांत ते दोघं परत आले. त्यांच्या मुद्रेवर विजयी भाव होते. शाळेत येताना रस्त्यावरच्या कचराकुंडीत कोणीतरी केनच्या चार खुर्च्या टाकलेल्या त्याला दिसल्या होत्या. कचऱ्याची गाडी येऊन त्या घेऊन जाईल अशा अपेक्षेनं घरमालकानं सकाळी त्या टाकल्या असणार. ती गाडी कोणत्याही क्षणी येईल, त्याआधी जाऊन त्या खुर्च्या आणाव्यात म्हणून जोआनची धावपळ चालली होती. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना.

“आपण जुनंपानं वापरतो हे ठीक आहे. पण हा अगदीच कचरा आहे.” मी म्हणालो.

“थोडं थांबा आणि मग पहा” जोआन आणि मार्ज उत्तरले.

मी थांबलो आणि पहातो तर काय .. दोन तासात नवीन, चकचकीत दिसणाऱ्या त्या दोन खुर्च्यांनी आमच्या म्युझिक हॉलची शोभा वाढवली होती.

हे सगळं त्या दोघांनी एका दिवसात केलं होतं.

१०. स्पेशल एक्सपेंडिचर्स

आम्ही जुनं, फुकटातलं सामान वापरत असलो तरी सगळं काही फुकटात येत नाही.

शाळेच्या इमारतीत एक पुराणवस्तुसंग्रहालयातला वाटणारा गॅसस्टोव्ह होता. आम्ही तो तसाच ठेवला होता. कोणाला स्वयंपाक शिकायचा असेल तर असू द्यावा असं आम्हाला वाटत होतं.

पण दैवगतीने अनेक मुलांना पाककलेत रस होता असं लक्षात आलं. वर्षं उलटली तसे मुलांना शिकवणारे अनेक बरे-वाईट शेफ आमच्याकडे आले-गेले. त्यातच मग आम्हाला मार्गारेट पारा नावाची शेफ मिळाली. तिच्यामुळे एकूणच सडबरी व्हॅलीत कुकिंग हा नेहमीच एक मोठा प्रकार होता. शाळेच्या काही वर्षातच मार्गारेटमुळे उत्कृष्ट, चांगले, बरे असे अनेक शेफ बाहेर आले. मार्गारेटनं तर आमच्या शाळेतल्या अनुभवावंरुन पाककृतींचं एक पुस्तकही प्रकाशित केलं. आमचे अनेक शेफ बाहेर पडून मास्टर शेफकडे शिकले आणि शेवटी स्वतः मास्टर शेफही बनले.

हा सगळा विषय ज्यावरुन आठवला तो गॅसस्टोव्ह! तो चालणार नाही हे कळायला आम्हाला काही फार वेळ लागला नाही. तो फक्त जुना होता इतकंच नाही तर विचित्रच होता. त्यात तो कसा चालवायचा कोणालाच माहिती नव्हतं. आणि आमच्याकडे आधीच एक नवीन घेतलेला स्टोव्ह होता.

पण हा गॅसस्टोव्ह वापरायचा नसेल तर मग गरज होती ती विशेष खर्चाची ! चार बर्नर असलेले दोन मोठे स्टोव्ह गरजेचे होते. पण बजेटमध्ये त्या पैशांची तरतूद नव्हती. आणि कुठूनतरी पैसे मिळवण्याची काही सोयही नव्हती.

मग शेवटी होता त्याच गॅसवर केक तयार करुन मुलांनी आणि शिक्षकांनी मिळून अनेक बेक सेल लावले. त्या पैशातून नवीन गॅस विकत घेता येणार होता. थँक्सगिव्हिंगच्या दिवशी पहिला बेक सेल लावला. त्याला चांगला

प्रतिसाद मिळाला. आणि त्यात सहभागी असणाऱ्या प्रत्येकाला मोठ्या प्रमाणावर पदार्थ कसे बनवायचं याचेही धडे मिळाले.

मग ख्रिसमसचा मोठा सेल लागला. जवळच्या एका सुपरमार्केटनं त्यांची जागा तो सेल लावायला आम्हाला फुकटात दिली. बऱ्याच मुलांनी माझ्या घरी रात्रभर खपून ब्रेड, केक, कुकीज, मफिन्स, बिस्किटं असे अनेक प्रकार बनवले. सकाळी आमच्यातले काहीजण सुपरमार्केटमध्ये ते पदार्थ घेऊन गेले. १ वाजता सगळ्याचा फडशा उडाला होता.

नंतर वर्षभर लावले गेलेले छोटे छोटे बेक सेल नीटनेटके झाले. त्यातून पैशांचा ओघ वाहता राहिला. कधी सँडविच, तर कधी सॅलाड असे सेलही लावले.

शेवटचा मोठा बेक सेल इस्टरचा होता. तो संपल्यावर आमच्याकडे चांगले आणि हवे तसे गॅस घ्यायला पैसे जमले होते. आणि सडबरी व्हॅलीत विशेष खर्च कसे करायचे याची एक प्रथाही पडली होती.

अगदी आजतागायत ती प्रथा चालू आहे. कोणाला काही विशेष कामासाठी रक्कम लागणार असेल तर तो विषय स्कूल मीटिंगमध्ये मांडला जातो. मुलांना ते पैसे खरंच हवे असतील, तर ते पैसे मिळवायलाही त्यांनी मदत केली पाहिजे असं आम्ही त्यांना सांगतो. काहीवेळा पैशाची मागणी करणाऱ्यांनीच सगळी रक्कम उभी करावी असं ठरतं तर कधी त्यातली काही रक्कम त्यांनी जमा करावी, उरलेली रक्कम शाळा देईल असं ठरतं. बहुतेकवेळा हा सौदा निम्मी निम्मी रक्कम दोघांनीही जमा करावी असा तुटतो.

या प्रकारामुळे शाळेभोवतालच्या लोकांना अनेक वर्षं स्वादिष्ट अन्नपदार्थ खायला मिळाले. कारण अन्न चांगलं असेल तर त्याचे सेल नेहमीच यशस्वी होतात. अशा प्रकारे खेळाची साधनं, फोटोची डार्करुम, लेदरचं वर्कशॉप, स्टीरिओ सिस्टीम्स खरेदी करणं अशा अनेक कामांसाठी बेक सेल मधून पैसे उभे राहिले. काही वेळा आमच्या मुलांनी शाळेच्या मैदानावरचं गवत स्वतः साफ करुन वाचवलेले पैसेही कामाला येतात.

अशा प्रकारे पैसे जमा करणं हे मुलांमध्ये इतकं प्रिय होतं की शाळेचे माजी विद्यार्थी देखील आनंदाने यात सामील होतात. दरवर्षी शाळेच्या नेहमीच्या खर्चापेक्षा वेगळं काय हवंय अशी विचारणा केली जाई. यात पहिला नंबर होता तो कॅम्प्युटरचा, नंतरच्या वर्षात मग प्रिंटर, लायब्ररीत पुस्तकांसाठी कपाटं, मोठं कार्पेट, फर्निचर .. वगैरे यादी वाढत राहिली.

मग या सगळ्यासाठी पैसे उभारायला माजी विद्यार्थी काही गमतीदार इव्हेंट आयोजित करायचे. त्यात लिलाव हा प्रकार सर्वात मजेशीर होता. शाळेचे विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी सगळे दोन्ही बाजूला जमायचे. मग एकमेकांना वस्तू आणि काही सेवा देण्यासाठी लिलाव सुरु व्हायचा. त्यासाठी ते बोली पण लावायचे. एकूण ते एक गेट-टू—गेदरच असायचं.

ज्या सेवा पुरवण्याचा लिलाव व्हायचा त्या सेवा फार मजेदार असायच्या. त्यात आमच्या मुलांमध्ये काय काय कौशल्यं आहेत त्याची झलकच बघायला मिळायची. कारण एखादा वकिल इतरांची मृत्यूपत्रं तयार करण्यासाठी मदत मागायचा, तर बिल्डर नवीन घर बांधायचा आराखडा तयार करण्यासाटी मदत मागायचा, तर एखाद्या बोटीचा

मालक त्याची बोट घेऊन समुद्रात फेरफटका मारुन आणण्याची संधी द्यायचा. मुलं त्यांच्याकडून एखाद्या लहान मुलाला दिवसभर सांभाळणं, बागेत काम करणं अशा सेवा पुरवण्याचा प्रस्ताव मांडायची.

आणि अशा तऱ्हेनं शाळेचे विशेष खर्च भागून जायचे.

ही पध्दत व्यावसायिक होती आणि तिची सर्वांना लागण व्हायची. फिशिंगला वाहून घेतलेल्या दहा वर्षाच्या तीन मुलांना एका दिवसासाठी बोट हवी होती. त्याला बरेच पैसे लागणार होते. त्यासाठी शाळेतले बेक सेल हा हमखास पैसे मिळवून देणारा एक मार्ग होता.

प्रॉब्लेम एकच होता, हा शाळेचा खर्च नसून वैयक्तिक खर्च होता.

त्या तिघांनी यावर बराच विचारविनिमय करुन शाळेच्या मीटींगमध्ये एक प्रस्ताव मांडला. आम्ही विशिष्ट अटींवर एक बेक सेल लावू. ती अट म्हणजे आमच्या नफ्यातला १० टक्केच नफा शाळेला देऊ.

मग या प्रस्तावातून बेक सेलमध्ये वैयक्तिक पातळीवरच्या सवलती देणं या नवीन प्रथेचा जन्म झाला!

११. फॅडस् आणि फॅशन्स

सडबरी व्हॅली ही एक मस्त शाळा होती. त्यात कोणतेही ठरावीक विभाग किंवा अभ्यासक्रम नव्हते. सगळं काही विद्यार्थ्यांच्या इच्छेनं सुरु व्हायचं किंवा संपायचं. त्यामुळे आम्ही कायम काळाबरोबर पावलं टाकण्यात यशस्वी झालो.

सत्तराव्या दशकात लेदरचं काम सगळीकडे प्रसिध्द होतं. आमच्या टीनएजर्सना त्यात रुची वाटली नसती तरच नवल..! जिम नॅश नावाच्या गृहस्थाचा कार्पेंटरीचा व्यवसाय होता. तिथे तो लेदरच्या वस्तू बनवायचे धडेही द्यायचा. आमच्या मुलांच्या लेदरच्या कामाची सुरुवात तिथून झाली.

थोड्याच काळात एका स्कूल मीटींगमध्ये आमची मुलं आणि जिमनं मिळून शाळेतली एक खोली लेदर शॉप म्हणून वापरता येईल का ? अशी विचारणा केली. एकत्रिपणे ही मागणी करुन मुलांनी त्यांची केस मांडली. मग लेदरच्या वस्तू विकत घेण्यात ज्यांना रस आहे अशी माणसं आम्ही शोधली. त्यामुळे मुलांनी शाळेत बनवलेल्या लेदरच्या वस्तू विकल्या जाऊन व्यावसायिक बाजूदेखील सांभाळली गेली असती.

लेदरचं काम कसं करावं, त्या वस्तूंची किंमत काय असावी यावर मग बरंच संशोधन झालं. काही काळातच स्कूल मीटींग्जमध्ये चर्चा होऊन मुलांनी बेकसेलमधून पैसे जमा केले. या सगळ्यातून एक सुरेख लेदर शॉप सुरु होऊन चालायलादेखील लागलं.

रोजच्या खर्चांसाठी आम्ही एक वेगळीच युक्ती केली जी नंतर अनेकदा कामाला आली. दैनंदिन खर्चासाठी लेदर शॉप हे छोट्या उद्योगधंद्यासारखं चालवायला लागलो. सुरुवातीचे पैसे स्कूल मीटींगमधून कर्जाऊ देण्यात आले. यासाठी वेगवेगळी लेदर, बकल्स, बटणं असा कच्चा माल आणायला भांडवल मिळालं. मोठ्या प्रमाणावर होलसेल माल विकणाऱ्या दुकानातून सामान आणलं. काही काळात मुलांनी बेल्टस्, पर्सेस, पाकिटं, ब्रेसलेटस्, पँटस् अशा

वस्तू बनवायला सुरुवात केली. त्यातून मग शाळेचं कर्ज चुकवलं जायला लागलं. या सगळ्या उद्योगातून शाळेसाठी नवीन साधनं आणायलाही पैसे उरायला लागले.

लेदर शॉप हे शाळेतलं महत्वाचं केंद्र बनलं. रोज डझनभर मुलं तिथे तासनतास त्यांच्या नवनवीन प्रॉजेक्टसवर काम करताना दिसत. ख्रिसमसच्या सुमारात तर तिथे पाय ठेवायला जागा रहात नसे. मुलं त्यांच्या नातेवाईकांसाठी आणि मित्रांसाठी भेटवस्तू बनवण्यात गर्क असत.

मग लेदरचं हे फॅड देशभर जसं एकदम प्रचंड मोठ्या प्रमाणावर सुरु होऊन विरलं तेच शाळेतही झालं. खूप धावपळ आणि परिश्रम केल्यानंतर लेदर शॉप थंडावलं. त्या खोलीचा काही उपयोगच होईना.

मग लेदरकामासाठीची सगळी उपकरणं खोक्यात भरुन ठेवली. बाकीचा माल विकून टाकला. लेदर शॉपची खोली परत साध्या खोलीसारखी वापरली जाऊ लागली. या सगळ्यात कोणालाच फारसा भावनिक त्रास झाला नाही. माणूस आयुष्यातल्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळ्या गोष्टींत रमतो याची प्रत्येकाला जाणीव होती.

लेदरचं फॅड झालं तशीच नंतर अनेक फॅडस् झाली. काहीवेळा देशभरात ज्याची फॅडस् होती तीच शाळेत यायची. सगळ्यांप्रमाणेच आमच्या मुलांनाही व्हिडिओ गेम्स, आईस स्केटिंग, जिम्नॅस्टिक्स मध्ये प्रचंड रस होता. कधीकधी एखादं फॅड सुरु व्हायचं आणि खूप खोलवर रुजायचं. जगभर कॅम्प्युटर्सचं नाव झाल्यावर मग आम्ही आमच्या लिलावातल्या आलेल्या पैशातून एक कॅम्प्युटर विकत घेतला. वर्षानुवर्षं आमच्याकडच्या 'कॅम्प्युटरच्या किड्यां'ना त्या कॅम्प्युटरनं सगळं शिकवलं. पाच वर्षांनी आम्ही ॲपल-२ आणि अजून एक मशिन विकत घेतलं. त्यामुळे एकतर ऑफिसच्या कामामध्ये मदत झाली. आणि मुलांना आधीपेक्षा जास्त चांगलं मशिन मिळालं.

कम्प्युटरनंतर आला तो टीव्ही..! त्यावरच्या सनसनाटी बातम्या शाळेतल्या सगळ्या मुलांचा ताबाच घेत. त्या काळात निक्सन या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या वॉटरगेट प्रकरणातल्या राजीनाम्याच्या बातम्या टीव्हीवर रात्रंदिवस झळकत होत्या. लोकही त्या बातम्या बघण्यात प्रचंड वेळ घालवत होते, इतका की सोप सीरीयलची प्रसिध्दी या बातमीच्या प्रसिध्दीच्या जवळपास सुध्दा फिरकू शकली नसती. आमच्या शाळेतले वयानं जरा मोठे असलेले विद्यार्थी सर्वात मोठ्या खोलीत ठेवलेल्या १९ इंची ब्लॅक अँड व्हाईट टीव्हीच्या जवळ तासनतास मांडा ठोकून बसलेले असत. वयानं जरा लहान असणारी मुलंही लवकरच त्यांना सामील होत, तर काहीवेळा शिक्षकही तिथे दिसत. कित्येक आठवडे चाललेला हा प्रकार राज्यशास्त्र, अमेरिकेचा इतिहास आणि दैनंदिन बातम्या शिकण्याचा अड्डाच बनला होता. विद्यार्थ्यांना स्वतःहून इंटरेस्ट वाटेल किंवा ते इतक्या तन्मयतेनं शिकतील अशी कोणतीच दुसरी गोष्ट त्याकाळात शाळेत नव्हती. याहून जास्त इंटरेस्ट दुसऱ्या कोणत्याही विषयात मुलांना वाटायला लावणं कोणालाच शक्य नव्हतं.

तेव्हा मी विचार करायचोः दुसरीकडे कुठल्या शाळेत असं होऊ शकतं ? देशभरातले शिक्षक आणि विद्यार्थी जेव्हा त्यांच्या पाठ्यपुस्तकांना आणि ठरावीक शिक्षणक्रमाला कवटाळून बसले होते तेव्हा आम्ही आमच्यासमोर घडत असलेल्या इतिहासाचे सुजाण साक्षीदार होतो. वॉटरगेटची ही बातमी इतिहास म्हणून पाठ्यपुस्तकात ३-४ वर्षांनंतर सामील झाली असती. आमच्या सडबरी व्हॅलीमध्ये मात्र ३-४ वर्षं थांबून मुलांचा त्यातला इंटरेस्ट संपल्यानंतर तो

इतिहास शिकवला जाण्याच्या कंटाळवाण्या पध्दतीची गरजच पडली नाही. आमची मुलं चालत्याबोलत्या इतिहासाची साक्षीदार होती.

वॉटरगेट प्रकरणाची सुनावणी संपली आणि शाळेतलं रोजचं साधं वातावरण सुरु झालं. टीव्हीचा उपयोग मग शून्य झाला. एक-दोन वर्ष तर तो पडूनच राहिला. मग एक दिवस तो बंद पडला. नंतर इराणमध्ये ओलिस ठेवलेल्या लोकांचं प्रकरण टीव्हीवर दाखवणं सुरु होईपर्यंत नवीन टीव्ही घ्यायचेही आम्ही कष्ट घेतले नाहीत!

## १२. स्कूल कॉर्पोरेशन्स

आवडीनिवडी समान असणारे लोक एकत्र येतात तेव्हा काम व्यवस्थितपणे करण्याचा मार्ग शोधतात. त्यांची दैनंदिन कामं नीट चालण्यासाठी त्यांना एक पध्दत ठरवावी लागते. आम्हालाही आमच्या कामांसाठी एका विशिष्ट पध्दतीची गरज होती. ती गरज भागवण्यासाठी आम्ही मग एक सोपा उपाय शोधला.

इतर शाळा वेगवेगळ्या विषयांसाठी वेगवेगळे विभाग करुन हा प्रश्न मिटवतात. आम्हाला तसं नको होतं. वेगवेगळे विभाग करण्यामुळे त्या त्या विभागातली माणसं स्वतःच्याच वेगळ्या जगात जगत असतात. तसे एकमेकांशी संबंध नसलेले विभाग आमच्या शाळेत असावेत हे आम्हाला अजिबात मान्य नव्हतं. सडबरी व्हॅली स्कूलच्या मुक्त शिक्षणव्यवस्थेत ते अजिबात बसत नव्हतं. उदाहरणच घ्यायचं झालं तर १९६०च्या दशकात मी सेव्हन सिस्टर कॉलेजेसपैकी एका कॉलेजमध्ये भौतिकशास्त्र शिकवत होतो. ५० वर्षांपूर्वी कॉलेज सुरु झालं तेव्हा कॉलेजमधला तो एक महत्वाचा विभाग होता. इतका की कॉलेजच्या चारमजली बिल्डिंगमध्ये एका मजल्याचा अर्धा भाग भौतिकशास्त्र या विभागाने व्यापला होता. पण जेव्हा मी शिकवत होतो तेव्हा कॉलेजच्या एकूण १००० विद्यार्थ्यांपैकी फक्त ५ जणांचा भौतिकशास्त्र हा मुख्य विषय होता. आणि फक्त ५चजण असल्यामुळे ते सगळे समोरच्या एका (असोसिएटेड मेन्स) कॉलेजमध्येच भौतिकशास्त्राच्या इतर विद्यार्थ्यांबरोबर शिकायला जात होते. म्हणजे सेव्हन सिस्टरमधे इतर अनेक विषयांच्या विभागांना जागेची कमतरता भासत असताना भौतिकशास्त्र हा विषय अर्धा मजला फुकटच अडवून बसला होता. एका कॉलेजमधल्या वेगवेगळ्या विभागांचा एकमेकांशी संबंध नसल्यामुळे निर्माण होणारे असे अनेक विरोधाभास मला इतर ठिकाणीही दिसले होते.

त्यामुळे आमच्याकडे असे विशिष्ट विभाग करायचे नाहीत यावर आम्ही ठाम होतो. मग काय? तर आम्ही स्कूल कॉर्पोरेशन नावाची नवीन संकल्पना काढली. एखाद्या विभागासाठी जे काय हवं असेल त्याची कल्पना शाळेच्या मीटींगमध्ये मांडायची. ज्यानं ती कल्पना मांडली असेल त्या व्यक्तीने किंवा समिती असेल तर त्या समितीने ते काम पुढे न्यायचं. नंतर परत जर कधी त्या विभागासाठी सुविधा किंवा पैसे हवे असतील तरच तो विषय स्कूल मीटींगमध्ये मांडला जाई. ज्याला त्यात रस असेल तो त्यात भाग घेऊ शके. त्या गोष्टीचं व्यवस्थापन पहाण्यासाठी सर्वांच्या संमतीनं एक संचालक नेमला जाई.

मग वेगवेगळ्या विभागांना आपलं म्हणणं आणि गरजा मांडण्यासाठी स्कूल कॉर्पोरेशन हे एक माध्यम बनलं. स्कूल कॉर्पोरेशनची इतरही अनेक वैशिष्ट्यं होती. एक तर ते सगळ्यांना खुलं होतं, ते लोकशाही तत्वावर चालायचं आणि सगळेजण एकत्र काम करत असल्यामुळे एखादं मिशन संपल्यावर ते परत बासनात गुंडाळून ठेवता यायचं.

स्कूल कॉर्पोरेशनची कल्पना जन्माला आली तेव्हा शाळेत अनेक ॲक्टिव्हीटीज् चालू होत्या. वेगवेगळ्या विषयावर काम करणाऱ्या सगळ्या गटांना आपापल्या विषयाला औपचारिक स्वरुप देण्यात रस होता. मग काही काळातच कलाकौशल्यांत शिल्पकला, पॉटरी, संगीत, गायन, लेदर, कँपिंग, गिर्यारोहण, रसायनशास्त्र, खेळ, लाकडावरचं कोरीव काम, फोटोग्राफी अशा असंख्य स्कूल कॉर्पोरेशन्स सुरु झाल्या. आम्ही म्हणलं, चला, स्कूल कॉर्पोरेशन या संकल्पनेची सुरुवात तर जोमानं झाली.

सुरुवातीला मुलांना वाटत होतं की त्यांच्या आवडीच्या प्रकल्पांसाठी शाळेकडून पैसे मिळणं सोपं असेल. वैयक्तिक पातळीवर मदतीसाठी आलेल्या मागण्यांवर स्कूल मीटींगमध्ये बरंच चर्वितचर्वण व्हायचं. बऱ्याचदा त्या अयोग्य आहेत म्हणून फेटाळल्याही जायच्या. पण स्कूल कॉर्पोरेशनसारख्या भारदस्त प्रकाराकडून आलेल्या मागण्या नामंजूर कशा होतील? असा बऱ्याच लोकांचा ग्रह होता. पण तो ग्रह चुकीचा आहे हे त्यांच्या बऱ्याच मागण्या स्कूल मीटींगमध्ये तावूनसुलाखून निघाल्यावर त्यांच्या लक्षात यायला लागलं.

काही दिवस उलटल्यावर हे समज-गैरसमज नाहीसे होऊन लोक स्कूल कॉर्पोरेशन या प्रकाराला सरावले. सुरुवातीला काहीजण यात बरेच आपापल्या लहरीनुसार वागले. ऑडिओ–व्हिजुअल कॉर्पोरेशननं सुरुवातीला बरीच खळबळ माजवली. ती सुरु झाली तेव्हा बऱ्याच मुलांना सिनेमा, ध्वनी तंत्रज्ञानातली उपकरणं आणि विशेषतः शाळेला मिळालेला पोर्टेबल टी.व्ही. कॅमेरा याबद्दल उत्सुकता होती. हळूहळू तो उत्साह थंडावला. मग काही वर्षं त्या कॉर्पोरेशनमध्ये स्वतःच स्वतःला संचालक म्हणवून घेणारा फक्त एकच माणूस उरला. कॉर्पोरेशनमध्ये ठरावीक सभासदसंख्या हवी असा कायदा नसल्यानं ते ठीक होतं. पण त्याच्याकडून पैशाची मागणी आल्यावर त्यानं दुसरा सभासद आणावा म्हणजे मागणी पूर्ण करता येईल असं त्याला आम्ही शांतपणे सांगितलं. मग स्टीरिओ उपकरणांत दुसऱ्या एकाला रस वाटला, दुसरा सभासद आला आणि ऑडिओ–व्हिजुअल कॉर्पोरेशननं परत जोम धरला.

काही कॉर्पोरेशन्समध्ये उत्साही मंडळी बरीच असायची तर काहींमध्ये एखादाच उत्साही प्राणी असायचा. लेदर वर्किंग कॉर्पोरेशनमध्ये सुरुवातीच्या दिवशी १५ सभासद होते, सुतारकामात दहा-बारा मुलं असायची. फोटोग्राफीमध्ये मात्र तो आकडा फारच कमीजास्त व्हायचा. स्वयंपाकात मात्र मुलं नेहमीच बहुसंख्येनं असत.

काही कॉर्पोरेशन्स मध्ये व्यवस्थापनाची कामं होती. सोर्स कॉर्पोरेशन मध्ये स्टाफ नियुक्तीचं काम होतं. काहीवेळेला त्यांच्याकडे असलेला स्टाफ कमी पडला तर बाहेरुन शिक्षक नियुक्त केले जात. आणि असा बाहेरुन आलेला शिक्षक कधीकधी शाळेत कायम होऊन जाई. लायब्ररी कॉर्पोरेशन शाळेच्या लायब्ररीचं तर प्रेस कॉर्पोरेशन शाळेसाठी जे साहित्य, मासिकं प्रकाशित होई ते काम करत असे.

अशा बऱ्याच कॉर्पोरेशन्स सुरु झाल्या आणि कालांतरानं त्या चालवणारी मुलं सोडून गेली म्हणून बंद पडल्या. पहिल्यांदा लेदर काम संपलं, मग प्लेरुम कॉर्पोरेशन काही वर्षं चालून संपलं. डंजन्स आणि ड्रॅगन्स कॉर्पोरेशन हे प्रकरण मात्र या सगळ्या दरम्यान फारच गाजलं. पण तेही संपलं. निरनिराळ्या कलांसाठी सुरु झालेल्या कॉर्पोरेशन्स मात्र बंद न होता एकत्र आल्या आणि त्यांची एकच कॉर्पोरेशन बनली.

स्पोर्टस् कॉर्पोरेशन सुरु व्हायच्या त्या मधूनमधून बंद पडण्यासाठीच..! त्याची सुरुवात अतिशय उत्साहात काही धावपटूंनी केली. मात्र त्यांना थोड्याच काळात कळून चुकलं की खेळाच्या वस्तूंची निगराणी राखणं, ती खरेदी

करणं, त्यांचा स्टॉक ठेवणं वगैरे करण्यापेक्षा खेळणं फारच सोपं आहे. मग स्पोर्टस् कॉर्पोरेशन नंबर १ संपली. परत नवीन ताज्या दमाच्या मुलांनी एका स्कूल मीटींगमध्ये ते स्पोर्टस् कॉर्पोरेशनचं काम नीट करतील अशी ग्वाही दिली. पण स्पोर्टस् कॉर्पोरेशनचा हा पुनर्जन्म काही काळच टिकला. मग स्पोर्टस् कॉर्पोरेशन नंबर २ संपली. काही वर्षांनंतर एक नवीन ग्रुप आला. त्यातली मुलं मनापासून, सकारात्मक आणि निश्चितपणे काम करुन स्पोर्टस्च्या साहित्याची जबाबदारी घेणार होती असं त्यांचं म्हणणं होतं. आम्ही त्यांना स्कूल मीटींगमध्ये मंजुरी मिळाल्यावर खेळाची साधनं घेण्यासाठी पैसे दिले आणि शांतपणे वाट पहात बसलो. हा पुनर्जन्म एक वर्षच टिकला. असं होत होत सध्या आम्ही स्पोर्टस् कॉर्पोरेशन नंबर ५ सोबत काम करतोय. मुलांची आशा अमर असते पण नियम, शिस्त यांना धाब्यावरच बसवलं जावं असं स्पोर्टस्सारख्या प्रकरणात काहीतरी असावं त्यातूनच या कॉर्पोरेशन सुरु होऊन संपत रहातात.

१३. स्वेच्छेनं ठेवलेले अकाऊंटस्

सगळे खर्च काही ग्रुपसाठी असतात असं नाही. अनेकदा मुलांना स्वतःसाठी काहीतरी विकत घ्यायची गरज भासते. आमच्याकडे पदार्थ  तयार करताना, चामड्याच्या वस्तू बनवताना, फोटो फिल्म डेव्हलप करताना किंवा फिरत्या चाकावर मडकी घडवताना ज्या वस्तू लागतात त्या वस्तू मुलं स्वतःच विकत आणायची.

मग अकाऊंटस् ठेवणं हा प्रकार स्वयंपाकघरात चालू झाला. तिथेही सुरुवातीला प्रत्येकजण स्वतःला लागणाऱ्या वस्तू स्वतःच आणायचा. पण हे मूर्खपणाचं आहे हे लक्षात यायला फार वेळ लागला नाही. एकतर खूप पदार्थ बनवायचे असायचे आणि त्यात मुलं काही वस्तू आणायला विसरायची. मग कोणीतरी एकानंच यादीनुसार वस्तू खरेदी कराव्यात असं ठरलं.

वस्तू आणण्यापुरता हा प्रस्ताव ठीक होतं. पण मग पैसे या विषयावर येऊन गाडं अडलं. आता वस्तू आणायला विसरायच्या ऐवजी मुलं पैसे आणायलाच विसरायला लागली. त्यातही जर कधी त्यांनी आठवणीने पैसे आणले तर ते पैसे आणायला विसरले का नाहीत? असं आम्हाला वाटायचं इतकं नंतर बिलं, सुट्टे पैसे यांचा हिशेब ठेवणं कर्मकठीण जात होतं.

म्हणजे यासाठी काहीतरी नवीन शक्कल लढवायला हवी होती. मग प्रत्येक विद्यार्थी आणि शिक्षकानं एका मिनिबँकेत हवे तितके पैसे भरुन स्वतःचे वेगवेगळे अकाऊंटस् काढावेत असं ठरलं. प्रत्येकानं अगदी १० डॉलर्स भरले तरी चालणार होते.

मग आम्ही चेकसारखी दिसणारी साधी चेकची पुस्तकं अगदी स्वस्त दरात एका माणसाकडून विकत घेतली. म्हणजे आता मुलांना चेकनंही पैसे काढता यायला लागले. आठवड्यातून एकदा एखादा विद्यार्थी सगळे चेक वटले आहेत का नाहीत ते बघायचा; अकाऊंटस् जुळवायचा. आता शाळेत मुलांना कधीही रोख रक्कम लागली तरी प्रॉब्लेम येत नव्हता.

अकाऊंटस ठेवण्यासाठी आम्ही सुरुवातीला जरा वेगळा प्रयत्न केला. आम्ही प्रत्येकाच्या अकाऊंटमध्ये दरवर्षी १० डॉलर्स भरायचो. मुलांना त्याच्यापेक्षा जास्त पैसे लागले तर त्यांनी ते स्वतः भरायचे अशी योजना होती. वर्षभरात विद्यार्थी जे काही शैक्षणिक साहित्य आणायचे त्यासाठी हे पैसे त्यांनी वापरावेत अशी यात अपेक्षा होती. शाळेत

आम्ही मुलांना काही फारशी साधनं पुरवत नव्हतो. त्यामुळे वैयक्तिकरीत्या त्यांनी केलेले खर्च काही प्रमाणात आमच्यातर्फे भरुन निघावेत अशी आमची अपेक्षा होती.

हे सगळं नीट चाललंय असं एकूण आम्हाला वाटत होतं. पण ते तसं चाललं नाही. फ्री लंचचं मानसशास्त्र आमच्या लवकरच लक्षात आलं.

प्रत्येकाकडे १० डॉलर्स आहेत आणि ते हवे तसे खर्च करायचेत असं मुलांच्या लक्षात आल्यामुळे पैसे खर्च करण्यासाठीच मुलांच्या निरनिराळ्या योजना चालू झाल्या. आधी पैसे खर्च करण्यात काडीचा रस नसलेले विद्यार्थी अचानक खर्चिक वस्तू विकत घ्यायच्या मागे लागले. पैसे खर्च करण्याचा योग्य मार्ग सापडला नाही म्हणून पैसे खर्च न करणारा विद्यार्थी मूर्ख मानला जाऊ लागला.

आमच्या शाळेच्या तत्वांप्रमाणे हे पैसे मुलांनी कसे खर्च करावेत याची कोणतीच मंजुरी त्यांना घ्यावी लागत नव्हती. मुलांनी तारतम्य बाळगावं आणि निर्णय घ्यावेत असं आमचं म्हणणं होतं. त्यामुळे मुलं काय काय आणतायत  ते हताशपणे बघणं इतकंच आमच्या हातात होतं. ते जे काय आणत होते ते शैक्षणिक साहित्य या प्रकारात बसणं जरा अवघडच होतं. खरेदी केलेल्या गोष्टींमध्ये एक नाव सातत्यानं येत होतं.. ते म्हणजे पिझ्झा..!  मग याच कारणानं प्रत्येक विद्यार्थ्याला १० डॉलर्स गिफ्ट म्हणून देण्याची योजना हळूहळू बारगळली.

पण नंतरची स्वेच्छेनं पैसे साठवण्याची योजना मात्र नीट चालली. या पैशातून अनेकदा खाजगी पातळीवर वापरायच्या वस्तूही मोठ्या प्रमाणावर विकत घेतल्या जात. यामुळे सगळ्यांना हव्या त्या वस्तू मिळाल्या याची आम्हाला खातरजमा मिळायची.

आणि हो..बाहेरच्या जगाप्रमाणेच आमच्याकडचेही चेक कधीकधी बाऊन्सही व्हायचे..!

१४ कुकिंग

होऊ घातलेल्या ब्रेडचा खरपूस वास शाळेत दरवळत होता. सर्व लोक हळूहळू स्वयंपाकघरात जमा होत होते. सगळ्यांनाच तो ब्रेड ओव्हनमधून कधी बाहेर निघतोय असं झालं होतं. काही मिनिटांतच मार्गारेट पारा त्या ब्रेडच्या जाडजूड, नरम स्लाईसेस लोकांना विकत होती. कुकिंग कॉर्पोरेशनच्या वतीनं हे सगळं चाललं होतं. ब्रेडच्याच किमतीत बटरही मिळत होतं.

हे दृश्य अनेक वर्षं वारंवार पहायला मिळायचं. ब्रेडस्, पिझ्झा, केक, कुकीज, बिस्कीटं आणि असे अनेक पदार्थ मार्गारेटच्या जादूई पोतडीतून बाहेर पडून दाद देणाऱ्या खवैय्या लोकांच्या पोटात जायचे.

अर्थात सगळ्यांनाच काही पदार्थ आयते मिळायचे नाहीत. काहीजण तिला मदत करायचे. काहीवेळेला मुलंच पदार्थ ठरवून मार्गारेटला मदत मागायची. तर कधी कधी मार्गारेटच “मंगळवारी आपण अमुक एक पदार्थ करणार आहोत, मदतीला इच्छुक असणाऱ्यांनी नाव नोंदवावं” अशी नोटीस लावायची.

काय बहारदार दृश्य असायचं ते! स्वयंपाकघरात एक दिवस ७,८,९ वर्षाच्या मुलांचा समुदाय असायचा तर दुसऱ्या दिवशी सगळ्या टीनएजर्सची गर्दी जमायची. पण अनेक वेळेला सर्व वयोगटातल्या मुलांचं त्या गर्दीत मिश्रण

असायचं. काही मुलं शांत, तर काही व्रात्य, काही वागायला सोपी तर काही हट्टी, काही समंजस तर काही काहीच न समजणारी असायची. सगळ्यांनाच मार्गारिटसोबत पदार्थ बनवायचे असत. त्यांनी जर त्या पदार्थातल्या घटकांचे पैसे दिले असले तर तो पदार्थ ती मुलं घरी नेऊ शकायची. उदाहरणार्थ, डेझर्टसारखा एखादा गोड पदार्थ त्यांच्या कुटुंबासाठी ते नेत किंवा मग शाळेतले सगळेजण मिळून तो पदार्थ फस्त करायचे.

मार्गारिटला शाळेबद्दल खूप आस्था होती. शाळा सुरु झाल्यावर पहिली १६ वर्षं, म्हणजे ती निवृत्त होईपर्यंत तिचं शाळेत महत्वाचं स्थान होतं. ती स्वयंपाक तर उत्तम करायचीच शिवाय ती एक उत्कृष्ट शिक्षिका होती. आणि तिचं खरं वैशिष्ट्य म्हणजे ती फार समंजस होती. अमेरिकेतल्या नौदलातील एका अधिकाऱ्याची बायको असल्यामुळे वयाच्या तिशी-चाळिशीतच मार्गारिट जगभर फिरली होती. नौदलाच्या जगातली भाषा तिला अवगत होतीच आणि खूप हिंडल्यामुळे एकूण माणसं ओळखण्यात ती वाकबगार होती.

मुलांचं तर तिच्यावर अतिशय प्रेम होतं. सगळ्यांनाच ती खूप आवडायची. आयुष्यातल्या टीनएजच्या अवघड वळणावर मुलांना ती जवळच्या मैत्रिणीसारखी वाटायची. ती त्यांच्याबरोबर सिगारेटस् ओढायची आणि तासन तास गप्पाही मारायची. मुलं जरा चुकतायत असं वाटलं तर लगोलग त्यांना सल्ले द्यायला ती अजिबात बिचकायची नाही. पण तरीही मुलांविषयी तिला आदर असायचा, त्यांचे विचार तिच्यापेक्षा भिन्न असले तरी ती ते मान्य करायची. सहा वर्षांच्या चिमुरड्यापासून ते प्रौढांपर्यंत सगळ्यांशी ती एकसारखंच वागायची. स्वच्छतेत कोणी कुचराई केली तर मात्र मार्गारिटचा धारदार आवाज मुलांना जागेवर आणायचा.

'प्रूफ ऑफ द पुडिंग इज इन द इटिंग' असं म्हणतात ते मार्गारिटच्या बाबतीत स्वयंपाकात आणि प्रत्यक्ष आयुष्यात खरं होतं. वेगवेगळे खाद्यपदार्थ करण्यात ती पटाईत होती. मार्गारिट निवृत्त झाल्यावरही शाळेतही कुकिंग करणं हा दरवर्षी प्रत्येक वेळी महत्वाचा भाग असे. मार्गारिटमुळे शाळेत कष्ट करणं, सगळ्यांशी मिळूनमिसळून वागणं या चांगल्या प्रथा पडल्या होत्या. मार्गारिटनं अनेक चांगल्या सवयी मुलांना लावल्या. कोणत्याही वयाचा विद्यार्थी असो, त्याला झेपेल तेवढं काम त्याला करायलाच लागायचं. प्रत्येकालाच सफरचंद सोलणं, पदार्थ करताना त्यात गोष्टी मोजून घालणं, ओव्हनमध्ये पदार्थ भाजणं, प्लेटस आणि टेबल स्वच्छ करणं असं करता यायचं. स्वयंपाकात मदत करणं म्हणजे काय त्याची प्रत्येकाला जाणीव होती. अतिशय स्वच्छ असलेल्या स्वयंपाकघरात काम चालू व्हायचं आणि तितक्याच स्वच्छ स्वयंपाकघरात संपायचं. ही सवय मार्गारिटच्या देखरेखीमुळेच मुलांना लागली होती.

मार्गारिटला आदर्श मानून इतर अनेकजणही स्वयंपाक शिकले. आमच्या शाळेच्या कुकिंग कॉर्पोरेशननं प्रमाणपत्र दिलेले विद्यार्थी एकट्यानं स्वयंपाकघरात काम करु शकायचे. त्यांना जरा सराव झाल्यानंतर ते जवळपासच्या छोट्या रेस्टॉरंटमध्ये काम करत. कधीकधी वर्षभर ओळीत ब्रेड, नंतर चायनीज अशा प्रकारे शाळेतच वर्ग चालायचे.

कधीकधी स्टाफमधला एखादा खवैय्या शिक्षक काहीतरी पदार्थ बनवायचा प्रयत्न करायचा. उदाहरणार्थ, बार्बरा, तिला शक्यतो नॅचरल फूड वापरुन पदार्थ बनवायलाआवडायचं. ती स्वतः आहारतज्ज्ञ होती. तिचं नॅचरल फूड म्हणजे कधीमधी मैद्याऐवजी कणीक वापरुन किंवा एखादा मधाचा थेंब घालून एखाद्या पदार्थाला पौष्टिक म्हणणं असं नव्हतं. बार्बराला पदार्थाला बाहेरुन साखर लावलेली मान्य नव्हती. ताजी, पौष्टिक पीठं आणि कमीतकमी गॅस

वापरुन ती पदार्थ बनवायची. उदाहरणार्थ, रायच्या पीठात गाजर घालून बनवलेला साखरेशिवायचा केक! हा केक इतका चांगला होईल याची मी पूर्वी कल्पनाही केली नव्हती.

मार्गारेटप्रमाणेच बार्बराचंसुध्दा सर्व वयाच्या लोकांशी जमायचं. ती एखादा पदार्थ करणार आहे अशी तिनं बोर्डावर नोटीस लावली की अनेक मुलं त्यात भाग घ्यायला उत्सुक असायची. त्यांना बार्बरासोबत काम करायला आवडायचं. स्वयंपाक करण्यातही एक आव्हान आहे याची त्यांना जाणीव व्हायची. यातूनच एक दिवस चॉको-चिप कुकीजसारख्या दिसणाऱ्या पण राय/ओट /सूर्यफुलाच्या बिया/सोया यांचं पीठ वापरुन केलेल्या आणि बेकिंग पावडर, मध किंवा साखर न घातलेल्या कुकीज तयार झाल्या होत्या. यांची चव चॉको-चिप्स कुकीज सारखी नव्हती पण त्या अत्यंत चविष्ट होत्या.

दरवर्षी जूनमध्ये जुन्या पध्दतीनं आईस्क्रीम बनवण्याचा एक कार्यक्रम असे. ही पध्दत अर्थातच मार्गारेटनं सुरु केली होती. तिच्या लहानपणीच फार्महाऊसवर तसं आईस्क्रीम तयार करायला ती शिकली होती. आईस्क्रीमच्या दिवशी क्रीम, बर्फ, मीठ असे घटक एकदा येऊन पडले की मुलांची उत्सुकता कमालीची ताणली जायची. आईस्क्रीमचं मशिन तासनतास हलवायला लागायचं आणि लहान मुलांची ते हलवायला चढाओढच सुरु व्हायची. ते हलवायला जड झाल्यानंतर मग जरा मोठी मुलं मशीनचा ताबा घ्यायची. मग आईस्क्रीम सेट झाल्यानंतर दुपारी अडीचच्या सुमारास स्वयपांकघराबाहेर नागमोडी रांगा लागायच्या. प्रचंड उकाड्याच्या दिवशी स्वतः बनवलेलं आईस्क्रीम डिशेस भरभरुन खाणं या आनंदाची तुलना फारच कमी गोष्टींशी होऊ शकेल. नंतर स्वयंपाकघराची स्वच्छता करायला लागणं हे कंटाळवाणं कामसुध्दा त्या आईस्क्रीम खाण्याच्या आनंदाला गालबोट लावू शकत नव्हतं!

१५ एज मिक्सिंग.

सर्व वयाची, वंशाची मुलं एकत्र असणं हे सडबरी व्हॅली स्कूलचं एक उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. वयानुसार काटेकोरपणे मुलांचं वर्गीकरण करायला मला आवडत नाही. रोजच्या जगात माणसं काही वयानुसार वर्गीकरण करुन आयुष्य जगत नाहीत. तसंच एकाच वयाच्या मुलांना आवडणाऱ्या सगळ्या गोष्टी एकसारख्याच असतील असंही शक्य नाही.

आमच्याकडे स्वतःची खेळणी वापरत असली तरी सर्व वयाची मुलं एकत्र येऊन खेळतात. मी माझं सँडविच मेकिंग सेमिनार घेतलं होतं तेव्हा त्यात १२ वर्षांपासून १८ वर्षांपर्यंतची मुलं होती. आमच्या शाळेत स्वयंपाक करताना त्यात भाग घेणाऱ्या मुलांमध्ये वयाच्या सगळ्याच सीमारेषा ओलांडल्या जातात. तसंच शाळा सुरु झाल्यावर सुरुवातीच्या काही वर्षांनतर मी आधुनिक इतिहासाचे धडे शिकवताना त्यातला १० वर्षांचा एड्रियन १७ वर्षांच्या मुलांसोबत शिकत होता अशीही उदाहरणं आहेत.

यामागचं तत्व एकच आहेः मुलांना कोणत्याही वयात जे काही करायचं असेल ते त्यांना करु द्यावं. त्यात त्यांना इंटरेस्ट असणं हे महत्वाचं ! तो धडा जरा अवघड असेल तर तो शिकताना मुलांना जरा जास्त कौशल्य वापरावं लागतं. मात्र त्यांना हवं ते शिकू दिलं तर कितीतरी गोष्टीत लहान मुलं मोठ्या माणसांपेक्षा जास्त निष्णात असतात असं लक्षात येतं.

आमच्याकडे लहान मुलं ज्या वेगात एखादी गोष्ट शिकू पहातात त्या वेगाला पुरेसं कौशल्य त्यांच्यात नसेल तर मात्र मुलं एकमेकांना मदत करतात. इतकंच नव्हे तर, त्यांना एकमेकांना तशी मदत करावीच लागते नाहीतर त्यांचा सगळा ग्रुपच नापास होतो असा आमच्याकडे नियम आहे. अशी मदत केल्यानंतर त्यांना ग्रेडस्, मार्कस् असं काही मिळणार नसतं. त्यामुळे एकानं दुसऱ्याला मदत केली तर त्याचं ज्ञान वापरुन दुसऱ्यालाही त्याच्याइतकेच मार्क मिळतील अशी स्पर्धा त्यांच्यात नसते. त्यामुळे ते सहजी एकमेकांना मदत करतात असा आमचा अनुभव आहे.

मुलं एकमेकांच्या सहकार्यानं शिकतात हे पहाणं हा एक आनंददायक अनुभव असतो. सडबरी व्हॅलीत जिकडे नजर टाकू तिकडे सर्व वयाची मुलं एकत्र काम करतायत हे दृश्य मनाला वेगळंच समाधान देतं.

या सगळ्याला एक भावनिक बाजूही असते. सोळा वर्षाचा मुलगा किंवा मुलगी जेव्हा सहा वर्षाच्या मुलाला पुस्तक वाचून दाखवत असतो/असते तेव्हा त्यांच्यातली निसर्गदत्त ममत्वाची भावना देखील पूर्ण होत असते. आणि त्या सहा वर्षाच्या लहान मुलालाही आपली कोणीतरी काळजी करतंय यानं बरं वाटतं. बारा वर्षाची एखादी मुलगी जेव्हा सोळा वर्षाच्या मुलाकडून कम्प्युटरची माहिती ऐकत असते तेव्हा तिला आपणही एक महत्वाची व्यक्ती आहोत असं वाटत असतं.

भावनिक बाजूप्रमाणेच याला एक सामाजिक बाजूही आहे. आमच्या शाळेत आम्ही पहिला डान्स प्रोग्रॅम आयोजित केला तेव्हा मला स्वतःचा पहिला नृत्याचा कार्यक्रम आठवत होता. आम्ही माध्यमिक शाळेत असताना आमचा पहिल्यांदा डान्स प्रोग्रॅम झाला होता. तेव्हा शिक्षकांनी पहिली गोष्ट कोणती केली असेल तर – मुलांना आणि मुलींना वेगळं केलं. तिथून त्या कार्यक्रमातली मजा संपतच गेली.

आमच्या शाळेत मात्र सर्व मुलामुलींनी एकत्रपणे डान्स करण्याची मुभा होती. त्या कार्यक्रमात मुलांनी आम्हाला सर्वांनाच आश्चर्यचकित केलं. चक्क एक सात वर्षाचा मुलगा १५ वर्षाच्या मुलीबरोबर डान्स करुन बक्षीस घेऊन गेला ! सगळ्यांचाच तो वेळ मजेत गेला. वर्षं मागे पडत गेली, लहान मुलं मोठी झाली. पण एकत्र डान्स करण्याची पध्दत तशीच राहिली.

सडबरीत मोठी मुलं हे लहान मुलांचे आदर्श असायचे. कधी कधी तर लहान मुलांसाठी मोठी मुलं ही देवासारखी असायची. “मी सात वर्षांचा असताना टीनएजच्या मुलांबरोबर फिरायचो ते माझ्यासाठी चांगलंच ठरलं. टीनएजमध्ये कसं वागायचं त्याचे धडे मला मिळाले. ” असं आमचा मुलगा मायकेल १८ वर्षांचा असताना एकदा सांगत होता. पुढे तो म्हणाला, “टीनएजमध्ये उगाच जिममध्ये जाऊन मोठी मुलं भयाण दिसतात. त्या वयात कसं दिसू नये ते त्यांच्याकडे पाहून मला कळलं. याचा परिणाम म्हणून मग मी माझ्या टीनएजमध्ये जिममध्ये फार वेळ वाया घालवला नाही.”

मोठ्या मुलांना लहान मुलं ही आपल्या धाकट्या भावाबहिणींप्रमाणे वाटतात. शेरॉन नावाची मुलगी चार वर्षाची असताना शाळेत दाखल झाली. तिचे पालक नुकतेच दगावले होते. पहिल्या वर्षी ती तर सगळ्यांचीच ‘मुलगी’ होती. सतत तिला कोणीतरी वाचून दाखवायचं, तिच्यासोबत खेळायचं, बोलायचं, तिला मायेनं जवळ घ्यायचं. शाळेचे माजी विद्यार्थी आपापल्या मुलांना घेऊन यायचे तेव्हा आमच्याकडचे टीनएजर्स त्यांच्यासोबतही तासनतास खेळायचे.

सर्व वयाची मुलं एकत्र शिकण्यामुळे अजून एक चांगली गोष्ट घडते. ती म्हणजे, मुलांना मुलांकडूनच शिकायला आवडतं. त्यांना ते सोपं वाटतं. एखाद्या प्रौढ शिक्षकापेक्षा त्यांना शिकवणारी मुलंच त्यांना जवळची वाटतात. त्यांच्या शंका मुलंच जास्त समजावून घेऊ शकतील असं त्यांना वाटतं. त्या शंकेची त्यांना मिळालेली उत्तरं सोपी, त्यांना समजणारी असतात. त्यांना त्यात मोकळेपणा वाटतो आणि मुख्य म्हणजे यामुळे ती वेगात आणि नीट शिकतात.

मुलांना शिकवायलाही आवडतं. त्यातून त्यांना काहीतरी केल्याचं समाधान मिळतं. सगळ्यात महत्वाचं म्हणजे जे शिकवतात ते त्यांना स्वतःला नीट कळत जातं. दुसऱ्याला काहीतरी समजावून सांगण्यासाठी मुलांना त्या विषयाचा जास्त सखोल अभ्यास करावा लागतो. स्वतःला एखादा विषय स्पष्ट झाल्याशिवाय त्यांना तो विषय दुसऱ्याला शिकवता येत नाही.

अशा रीतीने सर्व वयाच्या मुलांनी एकत्र शिकणं खूप गरजेचं आहे. शाळेतलं शिकणं आणि शिकवणं यात या एकत्रितपणामुळे प्रचंड फरक पडतो. एक सौहार्दाचं वातावरण तयार होतं. आमच्या शाळेची आम्ही नेहमीच एखाद्या छोट्याशा गावाशी तुलना करतो. छोट्या गावात सगळे एकत्र येतात, शिकवतात, मदत करतात, एकमेकांना रागावतात – आयुष्य वाटून घेतात. मला शाळेसाठीदेखील हेच मॉडेल योग्य वाटतं. आमची शाळा तशीच आहे.

एकूण मोठ्या माणसांना लहान मुलांकडून शिकण्यासारखं खूप काही असतं. हन्ना ग्रीनबर्ग या आमच्या स्टाफ मेंबरनं याचं एक उदाहरण लिहून ठेवलंय. ती लिहिते,

***द बीच ट्री***

*"हिवाळ्यातल्या एका सोनेरी सकाळी बीचचं ते झाड मी पहिल्यांदा पाहिलं".*

*एसव्हीएस (सडबरी व्हॅली स्कूल) मध्ये १८ वर्षं काढलेल्या एका सदस्याकडून आलेलं हे वाक्य आश्चर्यकारक असलं तरी खरं होतं.*

*हन्ना पुढे लिहिते, इतरांप्रमाणेच मी त्या झाडाची पानं तांबडी होऊन मग गळून पडताना पाहिली. हिवाळाभर त्यांच्या फांद्या शुष्क दिसत होत्या. मग वसंतऋतूमध्ये त्यांना कोवळी तांबूस पालवी फुटली आणि मग पानं हळूहळू हिरवीगार झाली. पिढ्यानपिढ्या आमच्या शाळेतली लहान मुलं त्या झाडावर चढायची. कधीकधी अगदी वरच्या टोकाला जायची. पण त्या दिवशी मी ते झाड खऱ्या अर्थानं पाहिलं. मला ते झाड कळलं. मी मोठी होईपर्यंत त्या झाडाकडे कसं पहायचं मला कळत नव्हतं. ते एका लहान मुलीकडून कळलं.*

*त्याचं असं झालं..*

*एक दिवस शेरॉन चमकदार डोळ्यांनी मला सांगत होती की अखेरीस ती एकटी स्वतंत्रपणे बीचच्या झाडावर चढली. जॉईसनं तिला कसं चढायचं ते दाखवलं आणि आता तिचं तिला चढता यायला लागलंय.*

*ती सांगत होती तेव्हाची ती सकाळ एकदम प्रसन्न होती. सर्वत्र वसंतातल्या रंगीबेरंगी फुलांची पखरण होती. स्वच्छ सोनेरी सूर्यप्रकाश गवताच्या पात्यांवरच्या दवबिंदूंवर पडून ती पाती चमकत होती. मग शेरॉन झाडावर कशी चढते ते दाखवायला मला ओढून घेऊन गेली. ती चढली, उतरली.. आणि मग तिनं मला त्या झाडावर चढायला सांगितलं. मी*

*आजपर्यंत हजारो मुलांना त्या झाडावर चढता उतरताना पाहिलं होतं पण मी स्वतःआजवर कधीच त्या झाडावर चढले नव्हते.*

*माझा नकार सहजपणे ऐकणाऱ्यातली शेरॉन नव्हती. आणि माझ्याबद्दलचा तिच्या मनातला आदर टिकवायचा असेल तर मला झाडावर चढणं भागच होतं. तिनं मला शांतपणे त्या झाडावर कसं चढायचं, कसं उतरायचं ते समजावून सांगितलं. आणि तिच्यासाठी मी आयुष्यात प्रथमच त्या झाडावर चढले.*

*मी पहिल्या फांदीवर चढले आणि सभोवताली दिसणारं सौंदर्य पाहून मंत्रमुग्ध झाले. फांद्यांचा तो अवाढव्यपणा शब्दात उतरवणं फार कठीण होतं. आणि त्या झाडानं मला वेढून घेतल्यावर जी भावना मनात जागृत झाली त्या भावनेनं त्या झाडाकडे १८ वर्षात मी प्रथमच पाहिलं असं मला जाणवलं. यावरुन मला एक साक्षात्कार झाला. आपण मोठी माणसं स्वतःला ज्ञानी समजतो. पण मला खात्री आहे – एसव्हीएस मधल्या प्रत्येक मुलाला आपले शिक्षक अज्ञानी आणि संवेदनाशून्य वाटत असले पाहिजेत. शेरॉन माझ्यासाठी एक उत्तम शिक्षिका ठरली. तिनं मला जे शिकवलं त्याबद्दल मी तिची कायमची ऋणी आहे.*

१६ खेळ

दिवसामागून दिवस आणि महिन्यांमागून महिने जात होते आणि आमच्या डोळ्यांदेखत एक प्लॅस्टिसीनपासून बनलेलं टुमदार गाव उभं रहात होतं. कधीकधी सहासात किंवा त्याच्याहीपेक्षा जास्त मुलं टेबलाभोवती घुटमळत, एकमेकांशी चर्चा करत करत एका गावाची परिपूर्ण प्रतिकृती बनवायचा प्रयत्न करत असत. घोडे, झाडं, गाड्या, ट्रक्स, प्राणी, शेताभोवतालची कुंपणं, माणसं जे काही मुलांना आठवेल त्याच्या ती प्रतिकृती करत होती. आणि केवळ प्रतिकृती नव्हेत तर अगदी हुबेहूब वाटणाऱ्या आणि इलेक्ट्रिक मोटर बसवलेल्या गाड्यादेखील त्यांनी बनवल्या होत्या. तशा गाड्या माझ्या तळव्यावर मावत होत्या. बोटाएवढ्या माणसांना रेखीव अवयव आणि कपडेदेखील होते. छतांवर कौलं होती, भिंतींना दारं होती आणि इवल्या इवल्या खोल्यांमध्ये टेबल-खुर्च्यादेखील होत्या. हे सगळं प्लॅस्टिसीनपासून बनलेलं होतं. तो एक मोठा खेळ होता..! जो सुमारे दोन वर्षं चालला.

हे सगळं बनवणाऱ्या आठ ते चौदा वर्षांच्या मुलांना ते काहीतरी कलाकृती बनवतायत याची कोणी जाणीव सुध्दा करुन दिली नाही. त्यांनी त्यात कोणत्याच शिक्षकाची मदत मागितली नाही आणि कोणी शिक्षकाने आगंतुकपणे स्वतःहून मदत केली नाही. मुलांसाठी तो एक खेळ होता. ती खूप मन लावून तन्मयतेनं तो खेळ खेळत होती. त्यात त्यांना खूप मजा येत होती.

आमच्या शाळेत येणाऱ्या प्रत्येक पिढीचे स्वतःचे क्लब असायचे. हा प्रकार त्यांच्या वयाच्या साधारण नवव्या किंवा दहाव्या वर्षी सुरु व्हायचा. आणि एक दोन वर्षं चालून बंद पडायचा. असे निरनिराळे क्लब आणि अर्थातच त्यांच्यासाठी एक क्लबहाऊस असायचं. सुरुवातीला जंगलातल्या एक मोडकळीला आलेल्या झोपडीवजा घरात, नंतर एका तबेल्यात, काही काळानं एका मोठ्या बिल्डिंगमधल्या एक छोट्या कोपऱ्यात क्लबहाऊस चालायचं. नंतर नंतर मात्र फायर फायटिंग सिस्टीम नसेल तिथे क्लबहाऊस चालवणं कायद्यानुसार मुष्किल व्हायला लागलं. मग ते जरा नीटनेटक्या ठिकाणी चालायला लागलं. क्लबहाऊसमधली सजावट म्हणजे जुनं कार्पेट, एखाद-दुसरी

टेबलखुर्ची इतकंच असायचं. तिथे अनेक गुप्त खलबतं चालायची, वादचर्चा झडायच्या. गुंतागुंतीची कटकारस्थानं रचली जायची. तिथली मुलं नेहमीच प्रचंड व्यग्र असायची.

'खेळ' हा सडबरी व्हॅलीत एक गंभीर प्रकार होता. त्याला अजिबात कमी लेखलं जायचं नाही. खेळणं हे मुलांसाठी नेहमीच महत्वाचं असतं असं मला वाटतं. खरं तर जी मोठी माणसं खेळणं विसरत नाहीत त्यांनाही ते महत्वाचं वाटतं. मात्र काही व्यावसायिक शिक्षणतज्ज्ञांना खेळाचा फार त्रास होतो. मुलं अभ्यासापेक्षा खेळाच्या बाबतीत जास्त उत्साह आणि बुध्दिमत्ता दाखवतात याचा त्यांना राग येतो. मात्र शैक्षणिक मानसशास्त्रज्ञ खेळाचं शिक्षणातलं महत्व लक्षात घेऊन सांगतात की मोटरस्किल्स शिकणं किंवा एवादी गुंतागुंतीची समस्या सोडवणं हे कौशल्य काही खेळांमध्ये वापरलं गेल्यामुळे अभ्यास करणं कसं सोपं होतं वगैरे!

सडबरी व्हॅली स्कूलचं खेळ हे अविभाज्य अंग होतं. शिकण्याचा तो एक महत्वाचा भाग मानला जाई. मुलं खेळातून काय शिकतील हे आपल्या अपेक्षेपेक्षा फारच वेगळं असतं. हातातल्या कामावर अथकपणे न कंटाळता, न दमता, घाईगडबड न करता लक्ष केंद्रित करणं हे सगळं ते खेळातून शिकत असतात. हे धडे त्यांना आयुष्यभरासाठी उपयोगी पडतात.

शाळेतील बहुतेक मुलं न खाता-पिता सकाळपासून खेळत असतात. दुपारी मात्र त्यांना मग खूप भूक लागते आणि मग मस्त झोप लागते. त्यांनी खूप श्रम केलेले असतात ना!

बऱ्याचदा खेळण्यासाठी लागणारी साधनं फुकट किंवा अगदी स्वस्तही असतात. आम्ही शाळा सुरु करताना लहान मुलांना खेळासाठी लागणारी गरजेची साधनं घेताना बजेट ठरवण्यात तास न तास घालवले होते. नर्सरी आणि माँटेसरीमध्ये सहसा जी खेळणी आढळतात तीच खेळणी आम्ही विकत घेतली. पहिलं वर्षं संपलं आणि जे काय दृश्य दिसलं त्यावर आमचा विश्वासच बसेना. त्या सगळ्या खेळण्यांना कोणी हातच लावला नव्हता. मुलांनी खोलीतल्या टेबलं, खुर्च्या, कपाटं आणि बाहेर झाडंझुडपं, दगडधोंडे असं सगळं खेळताना वापरलं होतं. अशा रीतीने १२ वर्षं ती खेळणी पडून राहिली. अर्धीपाऊण खेळणी खोक्यातच पडून होती, तर काही शोपीस ठरली.

अर्थात याला काही अपवाद होते. जरा मोठी मुलं बोर्ड गेम्स खेळायची. मग काही दिवस मोनॉपॉली या गेमचे झाले तर काही वर्षं रिस्क नावाच्या गेमची गेली. सगळेजण त्या गेमसाठी भूगोलतज्ज्ञ आणि मिलिटरी तज्ज्ञ बनले होते. डॅँगन्स अँड ड्रॅगन्स नावाचा गेम मुलं सोडून इतर स्टाफलाही आवडायचा. त्यातून मध्ययुगाबद्दल माहिती वगैरे मिळायची.

आम्ही खेळाकडे गंभीरपणे बघतो. त्यात मुलांना अटकाव करण्याचा आम्ही विचारही करु शकत नाही. आमच्याकडे सर्व वयाची मुलं खेळत असतात. मग आमच्याकडचं शिक्षण संपवून मुलं बाहेरच्या जगात गेली की एखाद्या गोष्टीवर संपूर्ण लक्ष केंद्रित करुन काम करणं आणि ते करताना आयुष्य हसतखेळत जगणं हे दोन्ही त्यांना सहज जमतं!

१७. लायब्ररी

पिवळा टेप लावण्यावरुन आमच्यात आकांडतांडव चाललं होतं! ती शाळेच्या लायब्ररीबद्दल शाळा सुरु व्हायच्या आधीच एक दीर्घकाळ चाललेली मीटींग होती. पॉला नावाची आमची ग्रंथपाल तिचं म्हणणं तावातावाने मांडत होती.

“लहान मुलांसाठी असलेल्या पुस्तकांवर काहीतरी खूण करायला हवी. त्यांना पिवळा टेप लावला तर ती सहज लक्षात येतील.” असं तिचं म्हणणं होतं. पॉला आमच्या शाळेची ग्रंथपाल होती आणि नवीन पध्दती राबवायचा तिचा विचार होता. पण जुन्या पध्दती थोड्याच अशा सहजासहजी बदलतात?

“आपल्याला त्याची काय गरज आहे?” मी तिला विचारलं. “आपल्याला असं वाटतंय का की लहान मुलं एखादं प्रौढांसाठी असलेलं पुस्तक वाचतील? ”

वाद वाढत गेला. पॉलाला भीती होती की एखाद्या लहान मुलानं त्याला अवघड असलेलं मोठ्या मुलांचं पुस्तक वाचायला घेतलं तर वाचनाबद्दलच त्याच्या मनात कंटाळा निर्माण होईल. तिच्या म्हणण्यानुसार, मोठ्यांच्या दुनियेत लहान मुलं बिचकतात. आणि अशा जगाशी लहान मुलांचा संबंध येऊ नये याची शाळेनं काळजी घ्यायला हवी.

आमच्या दृष्टीनं पिवळा टेप लावणं म्हणजे मोठी माणसं मुलांवर आपलं म्हणणं, वर्चस्व लादतात हे दाखवणं होतं. शेवटी अनेक वादचर्चा होऊन यावर मतदान घेण्यात आलं. पिवळा टेप लावणं मंजूर झालं नाही. पॉलानं राजीनामा दिला. लायब्ररी सुरु झालेली तिनं कधीच पाहिली नाही.

खरं तर सुरु झालेली म्हणण्यापेक्षा फारशी नीट सुरु न झालेली असंच म्हणावं लागेल. आमच्यासाठी लायब्ररी म्हणजे तहानलेल्यानं पाणी प्यायला जावं तसं ज्ञानाची तहान लागलेल्यांसाठी चोखाळायचा एक मार्ग होता.

आम्ही आजपर्यंत पाहिलेल्या लायब्ऱ्यांमधली त्रासदायक गोष्ट म्हणजे त्यातली पुस्तकं मुलांपासून दूर ठेवली जातात. मुख्य म्हणजे आम्हाला पुस्तकं लायब्ररी नावाच्या वेगळ्या विभागात नको होती. लायब्ररीत वेगळ्या ठेवलेल्या अशा पुस्तकांना एक प्रेतकळा आलेली असते. शवागारात असल्यासारखे तिथे सर्वजण एकमेकांशी कुजबुजतात, शांत रहातात. ग्रंथपालाची बोचक नजर चुकवत सावकाशपणे दबक्या पावलांनी इकडेतिकडे फिरतात. आम्हाला पुस्तकं सर्वत्र विखुरलेली, सर्वांना सहज मिळतील, सहजपणे चाळता येतील अशा पध्दतीने शाळेत हवी होती. आम्हाला मुलांनी पुस्तकं शेल्फमधून काढून सगळीकडे त्यांचा पसारा मांडायला हवा होता. पसाऱ्याची आम्हाला भीती नव्हती.

अर्थात आम्हाला खूप सारी चांगली पुस्तकं हवी होती. त्यासाठी पहिल्यांदा आम्हाला पुस्तकं जमा करायची एक योजना आखावी लागली. एकावरच पुस्तकं जमवण्याची जबाबदारी टाकण्याची नेहमीची पध्दत आम्हाला टाळायची होती. कारण एकाच विषयात तज्ज्ञ असण्यापेक्षा ज्ञानशाखांच्या सर्व बाजूंमध्ये रुची असलेल्या माणसानं आमच्यासाठी चांगली पुस्तकं जमा करावीत असं आम्हाला वाटत होतं.

मग आम्ही लोकांना त्यांच्या खाजगी पुस्तकांमधून काही पुस्तकं आम्हाला द्यायची विनंती केली. प्रत्येकानं काळजीपूर्वक ती पुस्तकं त्यांना आवडली म्हणून, उपयोगी असल्यानं निवडलेली होती. अशा रीतीनं सडबरी व्हॅली स्कूलची लायब्ररी तज्ज्ञांच्या सहाय्यानं सुरु झाली आणि त्यात सतत भरही पडत गेली.

सगळीच पुस्तकं चांगली होती असं मात्र नाही. पण तशी कोणत्या लायब्ररीत असतात? कोणतंही पुस्तक उचललं तरी त्याच्या बऱ्यावाईटपणाबद्दल लगेच त्या पिवळ्या टेपवर झाली तशी चर्चा सुरुच होते. पण आमच्याकडची पुस्तकं ज्यांनी विकत घेतली त्यांना तरी महत्वाची वाटत होती हे नक्की! लवकरच शाळेची इमारत पुस्तकांनी भरुन गेली. नव्या खोल्या, नवी शेल्फस यांची मागणी वाढत राहिली. कधीकधी जरा जास्तच पुस्तकं झाली तर आम्ही त्यांचा

सेल लावायचो. कधीकधी पुस्तकं जरा अतिच प्रमाणात येत. मॅसॅच्युसेटस् जनरल लॉचा आख्खा सेटच एकदा आला. पिवळा टेप लावा किंवा लावू नका तो कोणीही वाचणं जरा अवघडच होतं. तसंच काही विज्ञान नियतकालिकांचं होतं. तीही इतकी क्लिष्ट होती की कोणी वाचेल अशी शक्यताच नव्हती. आम्हाला अशी पुस्तकं देऊन किंवा विकून टाकण्याचे मार्ग शोधावे लागत. बरीचशी पुस्तकं मात्र शेल्फवर असत आणि मुलं ती चाळताना दिसत.

कधीकधी एवाद्याला हवं असलेलं पुस्तक आमच्याकडे नसेल तर आम्ही ते पुस्तक विकतही घ्यायचो. पण तो एक विशेष खर्च असायचा.

पुस्तकांच्या बाबतीत एक मजा म्हणजे मॅसॅच्युसेटस्च्या शैक्षणिक खात्याकडून ७०च्या दशकात आम्हाला एक पत्र आलं. त्यानुसार देशभरातल्या शाळांना पुस्तकं विकत घेण्यासाठी पैसे दिले जाणार होते. मला वाटतं, पुस्तकं हा चांगला प्रकार आहे आणि जास्त पुस्तकं आणि जास्त शेल्फस् असणं चांगलं ठरेल असं तेव्हा सत्तेवर आलेल्या कॉँग्रेसला वाटलं असेल. शाळांसाठी पुस्तकं छापण्याचं काम भरपूर मोबदला मिळवून देणारं असल्यानं प्रकाशकांनीही ती कल्पना उचलून धरली असेल यात मला  शंकाच वाटत नाही.

आमच्याकडे मात्र पहिल्यांदा आम्ही ती मदत घ्यावी का नाही यावरच चर्चा झाल्या.  आधी वाटलं ती मदत नाकारावी पण नाकारण्यात काही अर्थ नव्हता. मग शाळेत पुस्तकं खरेदी करायच्या ज्या योजना होत्या त्यासाठी आम्ही ती मदत स्वीकारायची ठरवलं. मग नंतरच्या काळात तिकडे सत्त्ेवर निरनिराळे अध्यक्षमहाराज आले आणि गेले. राजकारण डाव्या-उजव्या पक्षांकडे झुकत राहिलं. पुस्तकांसाठी चेक्स मात्र येत राहिले.

पण पिवळ्या टेपचं काय? आम्ही  तो लावला नाही पण काही प्रमाणात तडजोडी केल्या. लहान मुलांसाठी असलेली पुस्तकं शेल्फच्या वरच्या कप्प्यात ठेवायची नाहीत असं ठरलं. लहान मुलांना शिडी न वापरता ती पुस्तकं वापरता यायला हवी असा त्यात हेतू होता. पण पिवळ्या टेप्स वगैरे नक्कीच लावल्या नाहीत. कोणीतरी लहान मुलगा टेप नसलेलं एखादं पुस्तक वाचतोय आणि त्याला कोणीतरी दटावतंय, “अरे हे तू काय करतोयस?”  असा प्रसंग आमच्याकडे घडणं शक्यच नव्हतं. तसंच एखादा मोठा मुलगा पिवळा टेप असलेलं लहान मुलांचं पुस्तक वाचताना पाहून इतरांसमोर त्याला लाज वाटेल असंही आमच्या शाळेत होणंच शक्य नव्हतं. ते आमच्या तत्वात बिलकुल बसत नव्हतं आणि बसत नाही!

## १८ टाईम इनफ

सडबरी व्हॅली स्कूल मध्ये तास नव्हतेच त्यामुळे तासाच्या घंटाही नव्हत्या. एखाद्या कामाला किती वेळ द्यायचा हे ते काम करणाऱ्यानं ठरवावं. ज्याला जितका वाटेल तितका आणि त्याला गरज असेल तितका वेळ त्यानं द्यावा. तो वेळ त्या कामासाठी नेहमीच योग्य मानला जायचा.

शाळा सकाळी ८.३० ला सुरु होऊन दुपारी ५ ला संपायची. पण आमच्याकडे कोणीतरी मुलगा सकाळी ९ ला डार्करुम मध्ये अदृश्य झाला आणि काम संपल्यावर ४ ला बाहेर आला हे फारसं आश्चर्यकारक दृश्य नव्हतं.

जेकब १३ वर्षांचा होता. तो रोज कुंभारकामाच्या चाकावर बसायचा. सकाळी १०.३० तो तयार होऊन मडकी बनवायला लागायचा.. एक तास जायचा.. दोन तास जायचे. भोवती काय काय चाललेलं असायचं. त्याचे मित्र फूटबॉल खेळायचे. तीन तास जायचे. २.१५ला तो जात्यावरुन उठायचा. तरीही त्या दिवशी त्याच्या मनाप्रमाणे एकही मडकं बनलेलं नसायचं.

दुसऱ्या दिवशी तो परत प्रयत्न सुरु करायचा. यावेळी तो १ ला थांबायचा आणि स्वतः बनवलेली तीन मडकी त्या दिवशी त्याला आवडलेली असत.

थॉमस आणि नाथन ११ वर्षांचे होते. ते डॅंगन्स आणि ड्रॅगन्स खेळायला ९ ला सुरुवात करायचे. त्या दिवशीचे ५ वाजले तरी खेळ संपलेला नसायचाच पण तो दुसऱ्या दिव़शीच्या ५लाही संपलेला नसायचा. तिसऱ्या दिवशी दुपारी २ला तो खेळ संपायचा.

शर्ली, वय वर्ष ९, खुर्चीत बसायची आणि पुस्तक वाचायला सुरुवात करायची. पुढचे तीन दिवस ते पुस्तक वाचून संपेपर्यंत ती घरीही वाचत रहायची.

सहा वर्षांच्या सिंडी आणि शेरॉन जंगलात फिरायला जायच्या. वसंतऋतूचे सुरेख दिवस असायचे. त्या मग चार-पाच तासांनंतर उगवायच्या.

डॅन तळ्याकाठी गळ टाकून बसायचा. तीन वर्ष झाली तरी तो मासेच पकडत असायचा.

वेळ ही सडबरी व्हॅली स्कूलमध्ये कमोडिटी नव्हती. ती चांगल्या किंवा वाईट प्रकारात वापरली जात नव्हती. वेळ वाया जाणं आमच्याकडे नव्हतं तसंच तो वाचवणंही नव्हतं.

आमच्याकडे वेळ हे आयुष्यातल्या वेगवेगळ्या प्रसंगात मुलं काय करणार आहेत, काय गतीने चालणार आहेत त्याचं मोजमाप करणारं साधन होतं. मुलांच्या आयुष्यात प्रत्येक प्रसंग घडला की ती गती ठरायची.

आमच्याकडे मधली सुट्टी हाही प्रकार नव्हता. कोणत्याही वेळेला मुलं डबा खाऊ शकायची. भूक लागली असेल तर १०.३० काय, १२ काय, १२.३० काय आणि पाच काय? आमच्याकडे विनी-द-पू या कार्टुनचं एक भिंतीवरचं घड्याळ होतं ते कधीतरी ११ वाजता बंद पडलं होतं. म्हणजे ११ ही वेळ काहीतरी थोडंसं खाण्याची असायची आणि कायम ११ वाजलेले असत असा त्याचा सोयीस्कर अर्थ आम्ही काढला होता.

शाळेत वर्षानुवर्षं काढल्यावर मुलांना वेळेचं जे भान येतं त्यावर त्यांची वाढ अवलंबून असते. मुलं कुठेतरी पळत पळत जातात आणि मग असंख्य वेळ तिथेच बसतात असं मी पाहिलं होतं. मुलं दिवसाउजेडी स्वप्नं पहातात आणि सावकाश परत जमिनीला त्यांचे पाय टेकतात असंही मी पाहिलं होतं.

मुलांना शाळेच्या वेळेपेक्षा जास्त वेळ शाळेत थांबायचं असेल तर आम्ही त्यांना शाळेच्या किल्ल्या द्यायचो. काहीजण थोडावेळ थांबायचे, तर काही बराच वेळ जास्त थांबायचे. काहीजण सुट्टीच्या दिवशी आणि वीकएंडस्ना पण यायचे.

मुलांच्या वाढीच्या गतीच्या बाबतीत शाळा कधीही नाक खुपसायची नाही. त्यामुळे आत्ता किंवा नंतर प्रत्येकाला आपला आतला आवाज सापडेल याची आम्हाला खात्रीच होती. मुलांना दिल्या जाणाऱ्या वेळाबद्दल त्यांना जाणीव होती. ते कधी आमच्यावर विसंबायचे तर कधी स्वत:वर! विशीतल्या मुलांकडून "कशाहीपेक्षा जास्त आम्हाला 'स्व'चा शोध घ्यायला शाळेनं वेळ दिला" हे वाक्य मी कितीवेळा ऐकलं असेल याची तर गणतीच नाही.

एखाद्या कामावर लक्ष केंद्रित केलं तर वेळेचं भान रहात नाही. रॉंटजेन या शास्त्रज्ञानं एक्सरेचा शो लावला तेव्हाच्या त्याच्या वागण्याबद्दल मी प्रथम वाचलं तेव्हा मी अचंबित झालो होतो. प्रचंड औत्सुक्य आणि ज्ञानपिपासा यामुळे या गबाळ्या शास्त्रज्ञानं कसं स्वत:ला प्रयोगशाळेत बंद करुन घेतलं, त्याचं जेवण कसं बंद दाराबाहेर पडून रहायचं आणि तो थेट सात दिवसांनी त्याच्या विलक्षण अनुमानासकट कसा बाहेर आला त्या कथेचा माझ्यावर फार प्रभाव होता.

सृजनशील आणि हुशार माणसाच्या कथा नेहमीच त्याचं कामावरचं लक्ष केंद्रित करणं आणि वेळेचं भान नसणं यांनीच भरलेल्या असतात. हुशार माणसांच्या बाबतीत असंच असतं असं आपण कौतुकानं म्हणतो. पण आपण सर्वजणच आपल्या आपल्या प्रकारे सृजनशील बुध्दिमान असतो. असं कशात तरी गुंतवून घेण्याची क्षमता आपल्या प्रत्येकात असते. बाह्य जगाच्या वेळेचं भान सोडून आतल्या घड्याळाशी तादात्म्य पावण्याची आपल्या प्रत्येकाला गरज असते.

शाळेतलं सार्वजनिक वेळापत्रक जितकं काटेकोर असतं तितकंच वैयक्तिक वेळापत्रक बिनमहत्वाचं असतं. खरं तर तो एकमेकांना दाखवलेल्या आदराचा तो भाग आहे. काहीजण मिळून काहीतरी एकत्र करण्यासाठी ठरावीक वेळेला, ठरावीक ठिकाणी जमणार असं ठरलं तर त्यांनी ती वेळ पाळणं गरजेचं आहे. सर्वांनी त्यांचा वेळ त्याप्रमाणे ॲडजस्ट करायला हवा.

आमच्या शाळेच्या मीटींग्ज दर गुरुवारी ठीक १ वाजता सुरु व्हायच्या. 'तुम्हाला यायचं नसेल तर येऊ नका, पण आलात तर वेळेवर या' असा मीटींगचा नियम होता. वर्ग सुरु होणार असतील त्या अचूक वेळेला सगळेजण भेटायचे आणि न येणारे यायचेच नाहीत. फिल्ड ट्रीप ठरलेल्या वेळेनुसारच व्हायच्या. किंवा मग लोक फिल्ड ट्रीपला जायचेच नाहीत. कोणी उशीरा आलं तर तो मुलगा मागे राही. इतरांबरोबर ठरलेल्या कामासाठी तुमचं स्वत:चं आतलं घड्याळ वापरण्याला बंदी होती.

आमच्या शाळेत सर्व वयाची मुलं एकत्र मिळूनमिसळून वागण्यामागे वेळेचं भान नसणं हे महत्वाचं कारण होतं. मूल जन्माला आल्यावर किती दिवस, किती महिने झाले याचा काय संबंध असतो? सहा वर्षांची मुलं, टीनएजर्स, पदवीधारक, शिक्षक आणि पालक सगळे एकमेकांशी एकमेकांच्या वयाबद्दल माहिती नसल्यामुळे मोकळेपणानं बोलायचे. नील्स बोर या महान शास्त्रज्ञाची एक कथा सांगितली जाते. तो त्याच्या एका सहकाऱ्याला १० वर्षांनंतर भेटला आणि १० वर्षांपूर्वी त्यांचं जे संभाषण जिथे थांबलं होतं तिथून त्यानं सुरु केलं. सडबरी व्हॅली स्कूलमध्ये तसं अक्षरश: रोजच घडायचं. एकमेकांशी संवाद साधायला सडबरी व्हॅलीमध्ये प्रत्येकाला वेळ होता!

सडबरी व्हॅली स्कूलनं आम्हाला सगळ्यात जास्त एक गोष्ट शिकवली ती म्हणजे पाय जमिनीवर असणं! रोज आपण आपल्या अज्ञानाशी लढतो आणि शिकतो. शिकणं म्हणजे काय यावरुन जेव्हा आमचं शिकणं सुरु झालं तेव्हाची गोष्ट. काही वर्षांपूर्वी जेव्हा आम्ही शिक्षणक्षेत्रात आलो तेव्हा आम्हाला वाटत होतं माणसं कशी शिकतात ते आमच्या लक्षात आलंय.

माझा कॉलेजमध्ये शिकवण्याचा अनुभव माझ्या चांगलाच लक्षात आहे. तेव्हा मला माझा विषय माहिती होता, मी मुलांबद्दल, त्यांच्या मानसशास्त्राबद्दल आणि त्यांच्या विकासाबद्दल पुस्तकं वाचली होती. मला एकदम मी टॉप ऑफ द वर्ल्ड असल्याचा भास होत होता. मला किती माहिती आहे आणि मी मुलांना काय काय देऊ शकतो याचा मला गर्व वाटत होता.

पण वास्तवाचे कटु घोट हळूहळू प्यायला मिळतात. मी शिकवायला लागल्यावर प्रथम माझ्या लक्षात आलं की समोर उत्सुक आणि आनंदी चेहरे दिसतायत त्या मुखवट्यामागे कंटाळा आणि तिरस्कार भरलेला आहे. नंतर मला कळलं की मी शिकवत होतो त्यातलं बरंचसं त्यांना कळतच नव्हतं. पाठ्यपुस्तकात नसलेला हा महत्वाचा मुद्दा आहे असं सांगून मी त्यांना बरंच ज्ञानामृत पाजत होतो. पण परीक्षेचे पेपर्स तपासायाला आल्यावर कळलं की मुलांनी त्यांची पाठ्यपुस्तकं सोडून काहीच लिहिलं नव्हतं.

मग मी शिकवायचे अजून नेटानं प्रयत्न केले. अजून पुस्तकं वाचली; पण़ काही फरक पडला नाही. मग मला कळलं की माझ्या अनेक सहकाऱ्यांना याच समस्या भेडसावत होत्या. मग हळूहळू माझ्या लक्षात आलं, मुलांना जे शिकायचं नसतं ते मी त्यांना प्रेमाने, दटावून किंवा धमकावून शिकवलं तरीही ते अजिबात शिकत नाहीत.

नंतर मला अजून एका भयंकर सत्याची जाणीव झाली, मुलांना शिकायची इच्छा असो अथवा नसो पण ते जे काय शिकतात ते कसं शिकतात त्याबद्दल आपल्याला काडीचीही माहिती नाही.

मला वाटतं राजाचे नवीन कपडे या दंतकथेचं उत्तम उदाहरण म्हणजे आपल्या भोवतालच्या शाळा आहेत. वर्षानुवर्षं त्या स्वतःला ज्ञानाचं भांडार, शिक्षणदाते समजून सुरु असतात. सगळे उपाय थकल्यानंतर मग शिकवता न आल्यामुळे झालेल्या जख़्मा भरायला प्लॅस्टरसारखा पैशाचा वापर केला जातो.

पण त्यानं फारसा फरक पडत नाही. मुलांना हवं ते, त्यांना हवं तेव्हा आणि त्यांना हव्या त्या पध्दतीने ती शिकतात. आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करुन काही फरक पडत नाही. सडबरी व्हॅलीमध्ये मी हे सत्य अनेकदा अनुभवलंय. मुलं कशी शिकतात या प्रश्नाच्या कुलपाची किल्ली मला अजून सापडलेली नाही.

जे माहिती नाही ते माहिती असल्याचं ढोंग आम्ही आमची शाळा आहे म्हणून करत नाही. मुलं स्वतःचे निरनिराळे मार्ग निवडत असताना मुलांमागे भक्कमपणे उभं रहाणं इतकंच आम्ही करतो. त्यांनी मागितली तर मदत करतो, मागितली नाही तर शांतपणे एका बाजूला थांबतो.

आणि त्यांच्या सुंदर मनात काय रंगीबेरंगी गोष्टी सापडतात म्हणून सांगू.. ! शिकण्याच्या पायऱ्या, समजून घेण्याची पध्दत? ज्ञान कसं मिळतं त्याच्या पध्दती? छे..!

दोन मुलं कधीच शिकण्यासाठी एकसारखे मार्ग निवडत नाहीत. काही अगदी दुरान्वयाने सारखे असतात. पण एकूण प्रत्येक मूल हे एकमेव असतं; वेगळं असतं; आम्ही ते बघून आश्चर्यचकित व्हायचो.

मुलं सतत शिकत असतात. आयुष्य हा सर्वात महान शिक्षक आहे. आमच्याकडचे बीए, एमए, पीएचडी सगळे शिक्षक त्या तुलनेनं दुय्यम आहेत.

मुलं त्यांच्याबरोबरची मुलं, पुस्तकं, साधनं आणि त्यांच्याशी साधर्म्य असणारे प्रौढ यांच्याकडून शिकतात. मुख्य साधन म्हणजे त्यांचं कुतूहल. त्यातून ते शोधतात, शिकतात आणि समजून घेतात.

ते जग पहायला शिकतात, कारण त्यांना ते बघायला मिळतं, त्या जगाचा ते  एक भाग असतात. तिथे ते रमतात. दिवसभर ते वर्गात कोंडून बसू शकत नाहीत.

बाहेरच्या जगात ते लोकांसोबत रिलेट करायला शिकतात, कारण ते निरनिराळ्या वयाच्या माणसांसोबतच दिवसभर वावरत असतात.

ते समस्या सोडवायला शिकतात, कारण त्यांना त्या सोडवायची गरज असते. राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांच्या टेबलावर ‘द बक स्टॉपस् हिअर’ (तुमच्या समस्या इथे सुटतील) असं लिहिलंय. आणि ते ‘हिअर’ प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात असतं. त्यानंच ती समस्या सोडवणं गरजेचं असतं.

मुलांना पाहून मी रोज काहीतरी नवीन शिकतो. उदाहरणार्थ, असं म्हणतात की मुलांना काय करायचंय ते त्यांचं त्यांना ठरवू दे, मग त्यांना कमीतकमी अडथळा होईल असाच मार्ग ते निवडतात. “पण मग मुलांना कठीण परिस्थितीचा सामना करायला शिकताच येणार नाही.” असं लोक मला सांगतात. तेव्हा मी मनातल्या मनात (आणि कधीकधी मोठ्यांदा त्यांना) म्हणतो “कोणती मुलं तुम्ही इतक्यात पाहिलीयत ?”

कारण असं मुलांच्या बाबतीत अजिबात घडत नाही. बऱ्याचवेळा मुलं खूप त्रासदायक, विरोधाचा, अडथळ्यांचा मार्ग निवडतात. हे मी चुकून लिहिलेलं नाही. मुलं सर्वात जास्त अडथळ्यांचा मार्ग निवड़तात !

हे असं का होतं ते मला माहिती नाही. पण असं घडताना दिसतं हे मात्र नक्की! बहुतेक मुलांना आपल्यातल्या उणिवा कळतात आणि ते त्यावर मात करायचा अत्यंत परिश्रम घेऊन प्रयत्न करतात.

मग जरा घाबरट मुलगा घाबरटपणा कमी व्हावा यासाठी दिवसभर मैदानी खेळ खेळतो. गणिताची भीती असेल तर अंकगणित आणि भूमिती शिकतो. एकेकटी रहाणारी मुलं दुसऱ्यांच्यात मिसळू पहातात. तर जरा सभाधीट असणारी एकटं रहायला शिकतात. अस्तित्वासाठीचा लढा आणि खंबीर निर्णयशक्ती याचा प्रत्येक मुलाच्या आयुष्याच्या कथेत मिलाफ झालेला मला स्पष्ट दिसतो.

आता थोडं मुलांनी सर्वगुणसंपन्न असावं असं पालकांना वाटण्याविषयी, पालक म्हणतात, “अनेक गोष्टी थोड्या तरी शिकण्यासाठी आपण मुलांना प्रोत्साहन द्यायला हवं. मुलांना शाळेत सगळं शिकायला  मिळायला हवी. त्यांना हवं तेच शिकू दिलं तर ते फार कमी गोष्टी शिकतील.”

या तक्रारीत मला तरी काहीच तथ्य वाटत नाही. एक तर “जगातल्या ज्ञानाच्या अथांग समुद्रातले ज्ञानाचे कण कोणाला, किती मिळावेत या विषयातले तुम्ही स्वतः कोणीतरी तज्ज्ञ आहात” असं अनेक लोकांना वाटत असतं. आणि समजा जर उद्या अनेक विषयातलं एकावेळी मुलांना कळायची गरज नाही असं समाजमान्य झालं तर लगेच हे लोक मुलांना जरा जास्तच विस्तृत जग दिसतंय, त्यांना कमी कळलं तर बरं असं म्हणायला लागतील. अखेरीस, मर्यादित विषयातलं कळणं चूक आहे हेही एक गृहीतक आहे. आणि फक्त मर्यादित विषयातलं कळणं कोणासाठी चूक आहे असं आपण म्हणणार? मोत्झार्ट, आईन्स्टाईन? राईट बंधू? आंतरराष्ट्रीय पातळीवरचे हे आदर्श त्यांच्या एकाच विषयावरच्या निष्ठेसाठीच मानले जातात ना? ते सर्वगुणसंपन्न होते का?

परत ते सगळं आपले पाय जमिनीवरच असण्यापाशी येऊन थांबतं. आपल्यातले स्मार्ट हे सर्वात जास्त मूर्खांपेक्षा जरा कमी मूर्ख असतात इतकंच! एकूण काय तर मुलांना हवं ते करायला सोडून द्या. मग आपण त्यांना नको असताना मदत केली नाही तर ते त्यांना हवं ते नीट शिकतात असा माझा अनुभव आहे.

२०. इव्हॅल्युएशन

एक दिवस मी सहा वर्षाच्या मुलासोबत कॅच कॅच खेळत होतो. प्रत्येक वेळेला त्यानं बॉल फेकल्यानंतर आणि बॉल झेलायचा प्रयत्न केल्यानंतर मी त्याला प्रोत्साहन देत होतो. अरे वा, छान खेळतोयस, चांगला फेकलास वगैरे! मग थोड्या वेळानंतर त्यानं एकदम माझ्याकडे रागारागाने बॉल फेकला आणि तो ओरडला “मला तुमच्याबरोबर बिल्कुल खेळायचं नाही. तुम्ही खोटं बोलताय. मी एकदम चुकीच्या पध्दतीनं बॉल टाकला आणि तुम्ही चांगलं म्हणताय? तुम्ही खोटारडे आहात.”

त्याचं म्हणणं अर्थातच खरं होतं. तो माझ्यासाठी अजून एक बहुमूल्य धडा होता.

सडबरीमध्ये ग्रेडस् नाहीत. स्वतःची प्रगती कशी मोजायची ते मुलं स्वतःच ठरवतात. स्वतःच्या कामाचं मूल्यमापन करताना जगात त्यांना आदर्श वाटणाऱ्या गोष्टींशी तुलना करुन ते स्वतःला गुणवत्तेचे कठीण निकष लावतात.

उदाहरणार्थ, गणित शिकणारी मुलं गुणाकार-भागाकार शिकली किंवा गणितातलं इतर काही शिकली की त्यांना गणितं सोडवता येतात किंवा येत नाहीत. पण जर त्यांना काही समजलं नसेल तर ते समजेपर्यंत ते शिकतात किंवा मदत मागतात. यंत्र दुरुस्त करायला शिकणाऱ्या मुलांना त्यांना स्वतःला एक वस्तू दुरुस्त करता यायला लागली पण दुसरी एखादी वस्तू दुरुस्त करता येत नाही हे लगेच कळतं. मग तो मुलगा जितक्या वस्तू दुरुस्त करेल तितका तो चांगला मेकॅनिक होतो. पण त्याला काय येत नाही हे त्याला दुसऱ्यांनी सांगायची गरज कधीच भासत नाही.

हे सगळ्याच कामांना लागू पडतं. कुंभारकाम करणाऱ्याला सुरेख मडकी म्हणजे काय हे नीट ठाऊक असतं. चित्रकलेची आवड असणाऱ्याला उत्तमोत्तम चित्रं म्हणजे काय ते माहिती असतं, लेखनाची आवड असणाऱ्यानं चांगली पुस्तकं वाचून आपण कुठे पोचायचंय ते ठरवलेलं असतं. अभिनयात रुची असणाऱ्यानं चांगली नाटकं पाहून आपण कसा अभिनय करायला हवं ते मनाशी योजलेलं असतं तर संगीतात गोडी असणाऱ्यानं चांगल्या मैफिली ऐकून आपल्याला काय करायचंय त्याची खूणगाठ मनाशी बांधलेली असते. त्यांच्या मनात उत्कृष्टतेचं एक परमोच्च स्थान असतं आणि त्यानुसार ते स्वतःचं ध्येय उघड्या डोळ्यांनी ठरवू शकतात.

जे उत्कृष्ट आहे त्याच्या तुलनेत आपण कुठे आहोत हे स्वतःचं विश्लेषण करणं खरंतर फार यातनादायक असतं. उत्कृष्टतेच्या ध्यासापायी केलेलं काम परिपूर्ण नाही म्हणून खिडकीबाहेर फेकून देण्यात अनेक दिवस आणि आठवडे वाया जातात. "तू इतकं चांगलं चित्र का फाडतोयस?" मी काही विद्यार्थ्यांना विचारत असे "कारण ते वाईट आहे" असं अपेक्षित उत्तरच दरवेळी यायचं.

हातून योग्य काम होत नाही याचा त्रागा म्हणून अनेक मुलांची चिडचिड व्हायची, ते अतिशय वाईट मूडमध्ये जायचे किंवा स्वतःला दोष द्यायचे. इतर कोणी "अरे पण हे तू चांगलं केलंयस" असं म्हणण्यात काहीच अर्थ नसायचा. आपण जेव्हा मुलांना "तुझ्या वयाच्या मानाने तू जे काही मिळवलंयस ते खूप आहे" असं म्हणत असतो त्यातून मुलांना बरं वाटत नाही. त्यांनी काम सुरु करायच्या आधीच कुठे पोचायचंय ते ठरवलेलं असतं. त्यामुळे तुमचे शब्द त्यांना पोकळ आणि फसवे वाटतात.

कधी कधी स्वतःचं कठोरपणे केलेलं विश्लेषण मुलांना ते विशिष्ट काम फेकून द्यायला भाग पाडतं. अनेकवेळा मुलं परत परत, परत परत तेच काम एकाग्रतेनं करतात. अखेरीस ते येऊन सांगतात. "हे माझं क़ाम चांगलं झालंय!"

कधीकधी मुलं त्यांचं काम सुधारावं म्हणून इतर लोकांकडून अभिप्राय घेतात. जो माणूस त्यांच्या चुका समजावून सांगेल तसा माणूस शोधतात आणि त्याला प्रामाणिक अभिप्राय द्यायला सांगतात. अप्रेंटिसशिपच्या दरम्यान नेहमीच हे घडायचं. आमच्याकडचा अप्रेंटिस त्याच्या मालकानं त्याला चुका दाखवून द्याव्यात याच अपेक्षेनं मालकाकडे बघायचा.

अर्थात हे सगळं त्या मुलावर आणि त्यानं कोणता विषय निवडलाय त्यावर अवलंबून असतं. मला अनेक मुलं विचारायची, "आमचं लिखाण सुधारुन द्याल?" ती मुलं हुशार असायची; त्यांनी बरीचशी पुस्तकं वाचलेली असायची; पण आपलं नेमकं काय चुकतंय ते त्यांना कळायचं नाही म्हणून ती माझ्याकडे येत असत.

मुलांनी मला विचारलं तर त्यांना समजावून सांगण्यात मला आनंदच होता. त्यांचं माझ्याकडचं काम संपलंय आणि त्यांना माझ्याकडून हवं होतं ते मिळालंय असं सांगितल्यावर मी मग तो विषय सोडून द्यायचो. आमच्या शाळेतले सगळे शिक्षक असंच वागायचे. शाळेची ती परंपराच होती.

सडबरी व्हॅली स्कूलमध्ये आम्ही कधीही मुलांचं मूल्यमापन करत नाही. त्यांची एकमेकांशी किंवा आम्ही ठरवलेल्या कोणत्याच स्टँडर्डशी तुलना करत नाही. मुलांच्या खाजगी जीवनावर आणि स्वतःच्या ध्येयांवर तो आघातच ठरतो असं आम्हाला वाटतं.

शाळा काही निवाडा करणारं कोर्ट नव्हे! मुलांना स्वतःची शिफारस करणारं पत्र कोणाकडून लिहून हवं असेल तर तो लिहून देणारा आणि घेणारा अशा दोघांचा वैयक्तिक प्रश्न असतो. असं पत्र एखाद्यानं लिहायचं ठरवलंच तर त्यानं / तिनं ते शाळेच्या लेटरहेडवर लिहायचं नाही, स्वतःचे कागद वापरायचे असा अलिखित नियम होता. सडबरी व्हॅली स्कूलनुसार सर्वच मुलं ओके होती. प्रशस्तीपत्राचा किंवा शिफारसपत्राचा काही संबंधच येत नव्हता!

मात्र आमच्या या धोरणामुळे काही गमतीदार समस्या निर्माण व्हायच्या. उच्च शिक्षण आणि नोकऱ्या मिळवताना मुलांना शाळेची शिफारस लागायची. मग आम्ही नम्रपणे त्या शाळा/कॉलेजला किंवा कंपन्यांना आमचं कामकाज कसं

चालतं त्याबद्दलचं एक पत्र लिहित असू. आमच्याकडे मूल्यमापनाच्या पध्दती नाहीत हे आम्ही शक्य तितक्या सभ्यपणे त्यात लिहायचो. दहापैकी नऊ वेळा आमचं हे धोरण त्या लोकांकडून मान्य केलं जायचं आणि मुलांना हवा असेल तिथे प्रवेश मिळायचा. पण उरलेली दहातली एक केस आयुष्य रोचक बनवायची.

त्या केसमध्ये मग कधीकधी ते कम्प्युटर प्रोग्रॅमनं शिफारसपत्राची विचारणा करत रहायचे. त्या प्रोग्रॅमला आम्ही उत्तर पाठवलं तरी त्या प्रोग्रॅममध्ये उत्तरं पाठवायची व्यवस्थाच नसायची. त्यामुळे आमचं इमेल त्यांना मिळायचंच नाही. मग शेवटी त्या त्या ठिकाणचा निर्णय घेणारा माणूस भेटेपर्यंत आम्ही आमच्याकडून फोन वगैरे करायचा प्रयत्न करत रहायचो. काहीवेळा आम्हाला फोनवर विचारलं जायचं. "तुम्ही तुमच्याकडच्या मुलांची काहीतरी शिफारस कराल का ? तोंडी तरी सांगा म्हणजे कोणाला कळणारसुध्दा नाही." आम्ही शांतपणे ते शक्य नसल्याचं सांगायचो.

आमच्या माहितीप्रमाणे मूल्यमापन न करण्याच्या आमच्या धोरणामुळे आमच्या कोणत्याही विद्यार्थ्याचं बाहेरच्या जगात नुकसान झालेलं नाही. त्या धोरणामुळे गोष्टी थोड्या अवघड झाल्या हे कबूल! पण असे टक्केटोणपे खायला कोणत्याही शाळेत शिकवलं जायलाच हवं. मुलं स्वतःचे मार्ग स्वतः निवडायला शिकतात; स्वतःची ध्येयं ठरवतात. आणि आमच्याकडे मार्क नाहीत, ग्रेड नाहीत यामुळे मुलं जे शिकतात हे शिकणं हा त्यांना एक बोनसच असतो. आमच्याकडचं स्पर्धा नसलेलं, पालकांचं ॲप्रूव्हल असण्याची गरज नसलेलं वातावरण फार महत्वाचं ठरतं. सडबरी व्हॅलीमध्ये सर्वजण एकमेकांना सदोदित मदत करतात. कारण आपण मदत केली तर त्याच कामात आपल्याकडून शिकून दुसरा जास्त मार्क मिळवेल, असं मदत न करायला त्यांच्याकडे कोणतंही कारणच नसतं.!

२१ द लायटनिंग रॉड

मार्क ट्वेनची लायटनिंग रॉड विकणाऱ्या एका विक्रेत्याची मस्त गोष्ट आहे. त्या कथेत वादळ झालं तर बचावासाठी म्हणून घराच्या प्रत्येक कोपऱ्यात ठेवायला असे भरपूर लायटनिंग रॉड घ्यावेत असं एक विक्रेता एका माणसाला सुचवतो. नंतर त्यानं अनेक रॉडज् घेतल्यावर प्रथम वीज चमकते तेव्हा घरातले सगळे लायटनिंग रॉड खंडोगणती दूर असलेल्या आकाशातल्या वीजेला आकर्षित करतात आणि घराभोवती इलेक्ट्रिसिटीचा एक पापुद्राच तयार होतो. मग तो तो माणूस स्वतःच्याच घरात कैद होतो.

ही जरा क्रूर वाटणारी बोधकथा आम्ही शाळा सुरु केल्यावर आमच्यासाठी एक भीतीदायक वास्तव ठरली. १९६०च्या दशकात आलेल्या वादळात सडबरी व्हॅली स्कूल हा एक मोठा लायटनिंग रॉड ठरलं. त्या वेळी अमेरिकेतलं सामाजिक वातावरण ढवळून निघत होतं. राजकीय अस्थैर्यामुळे लोकांमध्येही गट पडले होते, वातावरण संतप्त आणि हिंसक होतं. शाळांवरही याचा परिणाम झालाच.

तो परिणाम म्हणजे सगळीकडे असंतुष्ट शिक्षक किंवा चळवळीत भाग घेतलेले पालक, राजकीय दंगली किंवा सूडानं पेटलेल्या तरुणाईचा सुळसुळाट होता. त्यातून रुढ शाळांपेक्षा वेगळ्या पध्दतीनं शिक्षण देणाऱ्या शाळा सुरु झाल्या. त्या सगळ्यांना अल्टरनेटिव्ह स्कूल्स (पर्यायी शिक्षण देणाऱ्या शाळा) असा एक शब्द रुढ झाला. आजही नेहमीपेक्षा वेगळ्या असणाऱ्या शाळांना तोच शब्द वापरला जातो.

सडबरी व्हॅली स्कूल ही आमची शाळा खरं तर अशा फॅशनेबल पध्दतीतून सुरु झाली नव्हती. आमचं शाळा सुरु करण्यामागचं तत्वज्ञान आणि ध्येय हे शिक्षणाच्या इतिहासाचा, शिक्षणपध्दतींचा आणि अमेरिकेतल्या वातावरणाचा अभ्यास करुन बनलेलं होतं. १९६८ या खळबळजनक वर्षातच आमची शाळा सुरु झाली हा केवळ नशिबाचा भाग होता. मॅसॅच्युसेटस् मधली इतर अल्टरनेटिव्ह स्कूल्स फक्त टीनएजर्ससाठी होती. लहान मुलांसाठी अल्टरनेटिव्ह स्कूल्स नव्हतीच.

लोकांना मात्र आमची शाळा इतर अल्टरनेटिव्ह स्कूल्सपेक्षाही वेगळी आहे असा काही विचार करायला वेळच नव्हता. त्यांच्यासाठी आम्ही अनेक आम्ही अल्टरनेटिव्ह लायटनिंग रॉडपैकी एक रॉड होतो. त्यामुळे आम्ही काय सांगतो आहोत हे न ऐकताच सगळीकडून पालक त्यांच्या मुलांना घेऊन प्रवेशासाठी हजर झाले. याचा परिणाम व्हायचा तसाच झाला. थोडक्यात म्हणजे प्रचंड गोंधळ माजला. त्यातले बरेच पालक मुलांसाठी सुधारकी विचारसरणीची शाळा शोधत होते. त्यांच्या मुलांना मार्गदर्शन आणि समुपदेशन करणारी, पर्यायानं त्यांच्या मुलांच्या आयुष्यात ढवळाढवळ करणारी शाळा ते शोधत होते. आम्ही जे काय करत होतो त्यात अशी ढवळाढवळ अजिबातच बसत नव्हती.

शाळा सुरु झाल्यावर मुलांना स्वातंत्र्य देण्याची आमची पध्दत बदलेल याची काही काळ पालकांनी वाट पाहिली, विद्यार्थ्यांनीही वाट पाहिली. आम्ही मुलांना स्वातंत्र्य देत आहोत ते फक्त काही काळासाठी मुलांना आमच्याकडे आकर्षित करण्यासाठी आहे असं त्यांना वाटत होतं.

त्यांना खात्री होती की काही आठवड्यांनंतर आमचे शिक्षक मुलांच्या खांद्यावर हात ठेवून प्रेमळपणानं म्हणतील, "जॉनी, आता बरेच दिवस तू खेळण्यात आणि झाडंबिडं लावण्यात घालवलेस. आपण आता काहीतरी उपयोगाचं शिकूयात का ?"

पण तो दिवस कधीच आला नाही. आम्ही आमच्या पध्दतींवर ठाम होतो. मग आम्ही म्हणतोयत तसंच करणार आहोत यावर सगळ्यांचा विश्वास बसायला लागला. आमच्या शाळेत मुलांना खरोखरच हवं ते करण्याचं स्वातंत्र्य मिळणार याची त्यांना खात्री पटली.

मग काही पालक त्याकाळच्या राजकीय वातावरणाप्रमाणेच जरा उपरोध घेऊनच आमच्याकडे आले. त्यांच्या अपेक्षांच्या बाबतीत आमच्यात सुमारे महिनाभर वादावादी होऊन शाळेतील काही मुलं कमी झाली. आम्ही आमचं काम चालूच ठेवलं !

पण या वादांमुळे आम्ही पण इतर अल्टरनेटिव्ह स्कूल्सपैकीच एक लायटनिंग रॉड आहोत ही इतरांची आमच्याबद्दलची संकल्पना भंग पावली. आम्ही खरोखर काय आहोत ते लोकांना कळलं. आम्हाला स्वतःबाबत मनात कधीच गोंधळ नव्हताच पण आता तो गोंधळ इतरांच्याही मनात उरला नाही.

एकदा एक मित्र म्हणाला, "तुमच्यात आणि इतर अल्टरनेटिव्ह स्कूल्समध्ये काय फरक आहे ते मला नक्की माहिती आहे."

"तो कोणता ?" मी जरा साशंकतेनं विचारलं.

“तुमच्या शाळेत तुम्हाला जे आवडतं ते करायला मुभा आहे.  इतर शाळात तुम्ही जे करता ते तुम्हाला आवडावं लागतं.”

त्याच्या या उद्गारात आमच्या शाळेबद्दलचा अर्थ नीट सामावला आहे असं मला वाटतं.

आम्ही आमचं ध्येय मुलांचं मनोरंजन करणं, त्यांना प्रोत्साहित करणं, त्यांनी काय शिकायला हवंय तिकडे त्यांना वळवणं असं काहीही ठरवलं नव्हतं. शाळेत सतत आनंदी वातावरण ठेवणं वगैरे गोष्टींना आम्ही कधीच प्राधान्य दिलं नाही. सडबरी व्हॅलीमध्ये वास्तवाला सामोरं जायला शिकणं हे सर्वात महत्वाचं होतं. मुलांचं शिक्षण आणि त्यांची वाढ होण्यासाठी रोजच्या आयुष्यातले लढे, दु:खं, वैताग आणि अपयश हे निव्वळ आनंद आणि समाधान यांच्याइतकेच नव्हे तर त्यांच्यापेक्षा जास्त गरजेचे असतात याची आम्हाला खात्री होती.

आता लोकांना या सगळ्या गोष्टींबद्दल प्रश्न पडत नाहीत. मुलांना हवा तो मार्ग निवडू दिल्याचे फायदे आता सर्वत्र दिसतात. आता आम्ही नवीन पध्दतीचा लायटनिंग रॉड बनलो आहोत. आपल्या मुलांना हवं ते करण्याचं स्वातंत्र्य देणाऱ्या पालकांना आता आमच्या रॉडचा प्रकाशझोत आकर्षित करतो.

भाग-२

शाळेतलं आयुष्य

२२ स्कूल मीटींग

प्रत्येक गुरुवारी ठीक १ वाजता चेअरमन स्कूल मीटींग बोलावतात. अजून एक विषय त्यात चर्चेला येणार असतो.

या मीटींग्ज शाळेसाठी फार महत्वाच्या असतात. त्या मीटींग सडबरी व्हॅली स्कूलचे सर्व सदस्य चालवतात. तेच शाळेच्या रोजच्या कामकाजाबद्दल ठरवतात. लहानमोठे विषय या मीटींग्जमध्ये चर्चेला येत असतात. शाळेच्या आयुष्यातले अनेक महत्वाचे विषय इथेच मांडून तडीला लागले. उदाहरणार्थ, १९६८ साली सलग सहा तास चाललेल्या एका मीटींगमध्ये शाळेची एक ज्युडिशिअल सिस्टीम तयार झाली. ११ वर्षांनतर एका मीटींगमध्येच या सिस्टीमची पुनर्रचना करण्यासाठी बराच वाद झाला. आणि त्यानंतर सहा वर्षांनंतर ज्युडिशिअल सिस्टीममध्ये अजून एक बदल झाला. त्यावरही तासनतास विचारविनिमय झाला. एकूणच मीटींग्जमध्ये शाळेच्या नियमांबद्दल चर्चा होते. शाळेसाठी काय नियम असावेत ते मांडलं जातं आणि चर्चा होऊन ते पास केले जातात. मग शाळेच्या एका रजिस्टरमध्ये या नियमांची नोंद केली जाते.

काही वेळा फार मजेदार नियम मांडले जातात. आधी सर्वजण शाळेच्या आवारात कागदाचे बोळे फेकायचे आणि आम्ही काही ठरावीक लोक शाळा स्वच्छ ठेवण्यासाठी धडपडायचो. वादविवादानंतर लक्षात आलं की काहीजणांना स्वच्छता कोणी करावी? हा प्रश्न जास्त गंभीर वाटतोय. पण त्यावर एकमत होण्याचं काही चिन्ह दिसेना. शेवटी जॅकनं एक प्रस्ताव मांडला. ज्यांनी कचरा केलाय त्यांनीच तो उचलावा. हे सूत्र अंमलात आणल्यानंतर दोन वर्षांनंतर अखेरीस कचरा टाकणारी माणसं शरण आली आणि इतस्ततः कचरा टाकणं त्यांनी थांबवलं. तोपर्यंत हा नियम रजिस्टरमध्ये लिहिलेला होता.

शाळेच्या मीटींगमध्येच स्कूल कॉर्पोरेशनचा आराखडा ठरायचा. शिक्षकांच्या कॉंट्रॅक्टसवर मीटींग्जमध्येच वाटाघाटी व्हायच्या; दैनंदिन खर्चापेक्षा विशेष खर्च कोणते आहेत त्यावर चर्चा व्हायच्या. याच मीटींगमध्ये ठरल्यानंतर कोणाला वैयक्तिक सवलत हवी असेल तर दिली जायची किंवा एवाद्याला दिलेली सवलत योग्य नसेल तर काढून घेतली जायची.

मीटींगमध्ये कशावर अनंत काळ चर्चा सुरु होईल हे सांगताच यायचं नाही. मजा म्हणजे काही महत्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी पंधरा मिनिटांत संपायच्या आणि काही क्षुल्लक गोष्टी प्रचंड वेळ खायच्या.

उदाहरणार्थ, शिसपेन्सिल एका डाईमला विकण्याची सवलत देण्याचा प्रस्ताव डेनिसनं जेव्हा मांडला (त्यातल्या नफ्यातल्या १०% वाटा अर्थातच शाळेचा होता) तेव्हा अचानक वाद सुरु झाले. तेव्हा शाळेत २५ सेंटला एक पेन्सिल दिली जायची आणि आमच्याकडे पाच वर्षं पुरेल इतका पेन्सिलींचा साठाही होता. मग स्वतःच्याच एका योजनेशी स्पर्धा करण्याचा प्रस्ताव शाळा कसा स्वीकारणार होती?

मग यातून थोर थोर नियम बाहेर आले.. मुक्त बाजारपेठ.. शाळेच्या पेन्सिल विकण्याचा इतिहास.. सगळ्याचं चर्वितचर्वण झालं. शेवटी यावर तोडगा निघाला. पण तोपर्यंत या फालतू मुद्यावर इतकी चर्चा होईल असं कोणाला वाटलंही नसतं.

शाळेतल्या मुलाचं वय काहीही असो, त्याला या मीटींगमध्ये मत मांडायचा अधिकार होता. तसंच प्रत्येक स्टाफ मेंबरचंही होतं. मात्र सात मुलांमागे एक स्टाफ मेंबर असल्यानं त्यांची संख्या मुलांच्या तुलनेत नेहमीच कमी असायची आणि मुलांकडेच शाळेचा ताबा जायचा.

आम्ही प्रथम शाळा सुरु केली तेव्हा शाळेच्या मीटींग्ज कायद्याच्या चौकटीत बसवणं अवघड जायचं. मॅसॅच्युसेटस राज्याच्या कायद्याप्रमाणे लहान मुलांना मोठ्या माणसांइतके अधिकार नव्हते. आमच्या वकीलाकडची दोन प्रेमळ, समजूतदार, अनेक वर्षं समाजसेवा केलेली माणसं येरझाऱ्या घालत आमच्याशी तेव्हा काय बोलत होती ते मला आजही आठवतं. ज्या मुद्यांवर तुम्ही मतं मोठ्या माणसांची घेणार त्याच मुद्यांवर चार वर्षांच्या, आठ वर्षांच्या आणि दहा वर्षाच्या चिमुरड्या मुलांची मतंही तुम्ही घेणार? हे त्यांना पटतच नव्हतं. पण तरीही त्यांच्या सुपीक डोक्यातून त्यांनी यावर एक मार्ग काढला.

तो मार्ग म्हणजे, मीटींगला हजर असलेला प्रत्येकजण मत देईल पण प्रत्येकाला मीटींगला हजर रहाणं बंधनकारक नसेल. मग लोकशाहीमध्ये जसं बाहेरच्या जगात, संसदेत चालतं तसंच शाळेतही चालायचं. बाहेरच्या जगात जसं

ज्या विषयात एखाद्याला रस असेल तेव्हाच तो माणूस मीटींगला येतो. तसं नसेल तर लोक मीटींगला जायची फारशी पर्वा करत नाहीत. तसंच शाळेच्या मीटींगमध्ये ज्या विषयात रस असेल तेवढ्याच विषयांच्या मीटींगला मुलं यायची.

नंतर नंतर तर मीटींगचा विषय पाहूनच कोण आलं असेल आणि कोण आलं नसेल ते कळायचं. मग मीटींगच्या हॉलमध्ये धावपटूंचा घोळका दिसला तर डोळे मिटून समजावं की आज खेळासाठी काहीतरी नवीन साधनांची मागणी होणार आहे. १२ वर्षांची तीन मुलं एकदम दिसली की त्यांना काहीतरी सवलत हवी असणार याची मनाशी खूणगाठ बांधायची. काही ठरावीक मुलांना मात्र ही आपली शाळा आहे, ती आपण चालवावी असं वाटायचं. ते सर्वजण प्रत्येक मीटींगला हजर असायचे.

अर्थात नेहमीच मुलांकडे पाहून मीटींगचा विषय कळायचा असा प्रकार नव्हता. आम्ही आधीच्याच मीटींगमध्येच पुढच्या मीटींगचे विषय ठरवायचो. ही सवय अगदी शाळा सुरु झाल्यापासूनच लागली होती. यामुळे मीटींगमध्ये काय घडणार आहे याची सगळ्यांना पूर्वसूचना असायची.

शाळेची मीटींग शिस्तबध्द पध्दतीनं चालायची. पदाध्यक्ष नियम वाचायचे आणि हौशी संसदसदस्य त्यात खोड्या काढत रहायचे. अध्यक्षांच्या परवानगीशिवाय कोणीच बोलत नसे. सभागृहात संपूर्ण शांतता आणि शिस्त असे. (आणि जेव्हा क्वचित तसं नसे तेव्हा अध्यक्षमहोदयांना मधे पडावं लागत असे तो भाग वेगळा!) बहुतेक सगळे निर्णय हे ज्या मुद्याला बहुमत असेल त्यावरुन घेतले जात. प्रत्येक निर्णयासाठी दोन तरी मीटींग्ज व्हाव्या लागत. लोकांना विचार करायला पुरेसा वेळ मिळावा अशी आमची इच्छा असायची.

सुरुवातीच्या काही वर्षांनंतर कोणतातरी विद्यार्थीच मीटींगचा अध्यक्ष असायचा. शाळेच्या मीटार्गेमध्येच एक वर्षासाठी त्याची अध्यक्षपदी नियुक्ती व्हायची.

शाळेच्या मीटींग्ज नीट चालायच्या आणि त्यातून शाळेला बराच आकार मिळाला. दोन तासांपेक्षा जास्त मीटींग चाललीय असं फार क्वचित व्हायचं. शाळा चालवण्यासाठी आठवड्यातले दोन तास मीटींगला देणं म्हणजे फार वेळ देणं नव्हतं. सुरुवातीला मीटींग फारच शिस्तबध्द चालवण्यावरुन आमच्यावर बरीच टीका व्हायची. मीटींग जास्त खेळीमेळीत व्हाव्यात, त्यात भावनांना जरा जास्त स्थान मिळावं अशी लोकांची इच्छा होती. बहुमतावर निर्णय घेण्याच्या काही जण विरुध्द होते. त्यांना वाटायचं भावनिक बंधांवर काम चालावं.

एकूण पहाता, पूर्वीच्या काळी ग्रीकमध्ये चालणाऱ्या लोकशाही पध्दतीनुसार आमचीही शाळा चालवण्याच्या पध्दतीचा सडबरी व्हॅलीला कधीच पश्चात्ताप झाला नाही. आमच्याकडे लोकशाही पध्दत नीट चालते आणि आम्हाला त्याचा अतिशय अभिमान आहे!

२३ संकटं

१२ वर्षाचा एक मुलगा प्रथम बीचच्या झाडावर चढला तेव्हा आमच्या हृदयाचे ठोकेच वाढले. तो ७० फूट वरती चढून आम्हाला हाक मारत होता. तो कुठे आहे ते आम्हाला दिसतही नव्हतं. पण होता तिथे तो मजेत होता आणि

आम्ही मात्र डोळ्यासमोर दिसणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत काय करायचं असा विचार करत चिंताग्रस्त अवस्थेत बसलो होतो.

बीचच्या झाडानंच शाळेच्या आवारातली संकटं या विषयाला तोंड फोडलं. आम्ही मग जितका जास्त विचार केला तितकी संकटं आमच्या डोळ्यासमोर तरळायला लागली आणि आम्ही ज्या संकटांचा द्रष्टेपणानं विचार करु शकलो नाही त्यां संकटांची मुलांनी नीट जाणीव करुन दिली.

आमच्या शाळेत प्रत्येक मुलगा हवं तिथे हवं तेव्हा जाऊ शकायचा. आमचं आवार सगळ्यांना खुलं होतं आणि ही सुविधा आम्ही पुरवल्याच्या बदल्यात आमच्या नाशिबात सगळ्यांची चिंता करणं लिहिलं होतं.

सुरुवातीला आम्हाला संकटं, धोके असं फारसं काही कळत नव्हतं. आमचं आवार खुलं आहे. असंच आम्ही सगळ्यांना सांगायचो. याचा अर्थ मुलं कुठेही, कशीही फिरणार असा होतो हे आम्हाला नीट कळत होतं. आम्ही लहान असताना तुरुंगासारखं आम्हाला डांबून ठेवणाऱ्या शाळेचा आम्ही किती तिरस्कार करायचो ते आमचं आम्हाला माहित! मात्र सडबरी व्हॅलीच्या बाबतीत शाळा आणि तुरुंग यांच्यात काहीच साम्य नव्हतं. आमच्या शाळेत आम्ही एकदा दाराचं कुलूप उघडलं की किल्ल्या फेकून द्यायचो.

शाळा सुरु झाल्यावर काही महिने आम्ही अगदी खुषीत होतो. मग एके दिवशी आम्हाला आठ वर्षांची एक जोडगोळी शाळेचा दरवाजा ओलांडून एक मैलावरच्या नॉबस्कॉट नावाच्या पिझ्झाच्या हॉटेलकडे जाताना दिसलं. आमचा भीतीने थरकाप झाला.

यानंतर मात्र पोलिसांना आमच्या शाळेच्या सगळ्यांना कुठेही जाता येतं या पध्दतीची सवय व्हायला काही दिवस गेले. अनेक दिवस वेगवेगळ्या पोलिस ऑफिसर्सकडून आमच्याकडची पळून गेलेली मुलं सापडल्याचे फोन येत.

यानंतर संकट म्हणून मग मोठ्या आकाराच्या दगडांची बारी होती. आमच्या शाळेच्या आवारातल्या एका कोपऱ्यात नैसर्गिक दगडांचा एक बारीकसा डोंगर होता. आधी ते खूप सुंदर दिसायचे – पण पाच आणि सहा वर्षांच्या मुलांनी त्याच्यावर रॉक क्लायंबिंग करायचं ठरवल्यावर ते एकदम भयावह दिसायला लागले.

दगडांनंतर आमचं लक्ष वेधलं गेलं ते झऱ्याकडे! चिमुकला आणि उथळ असा एक झरा आमच्याच आवारात होता. त्याचं नाव बेटिंग ब्रूक. तळ्याकाठी एकदम छान वाटायचं. पण हा छोटासा झरा किती प्रकारात आम्हाला भेडसावणार आहे ते तेव्हा माहिती नव्हतं. एक तर झऱ्याकाठचे दगड निसरडे होते आणि मध्येच त्यात खड्डेही होते. चार पाच वर्षांचा मुलगा त्यात पडला तर गळ्यापर्यंत बुडला असता.

खरं तर थोड्याच काळात आम्हाला कळून चुकलं की एका विशिष्ट बाजूने पाहिलं तर भोवतालचं काहीही धोकादायक असू शकतं. झाडं, दगड. पोर्च, रस्ते, झरे काहीही! अगदी आमच्याकडची मस्त दिसणाऱ्या हिरवळीवर देखील मुलांचे घोटे मुरगळू शकतात हे आमच्या लक्षात आलं.

या सगळ्या धोक्यांबद्दल आम्हाला कितीही भीती वाटत असली, मुलांना इशारे द्यावेसे वाटत असले तरी आम्ही स्वतःच्या मनाला मधून मधून समजावत रहायचो. मुलांची निर्णयक्षमता वास्तव जगातल्या समस्या सोडवूनच वाढेल

ही शाळेची संकल्पना होती. मुलांनी स्वतःच्या प्रकृतीची काळजी जबाबदारीनं घेतली, स्वतःच्या आयुष्याची जबाबदारी घेतली तरच मुलं पुढे जाऊन जबाबदार नागरिक बनतात असं आमचं तत्व होतं. त्यामुळे आम्ही चुपचाप असायचो, त्यांना हवं ते करु द्यायचो.

आमच्या इतर सगळ्या तत्वांप्रमाणेच या तत्वाची कसोटी सुध्दा लवकरच द्यावी लागली.

आम्हाला आमच्या तत्वांना चिकटून रहायला हवं असलं तरी आम्ही या सगळ्याबद्दल तासनतास चर्चा करायचो.

एकूण आमच्या लक्षात आलं, रोजचे धोके मुलांना आव्हानात्मक वाटत होते. त्या धोक्यावर त्यांनी नीट ठरवून एकाग्र चित्तानं मात करायला हवी होती. माणसं साधारणतः स्वतःचं भलं पहातात. स्वतःचा विनाश करावा ही त्यांची प्रवृत्ती सहसा नसते. मुलांना सारख्या मर्यादा घालणं हा खरा धोका असतो. कारण मग त्या त्या मर्यादा तोडणं हे त्यांना इतकं महत्वाचं वाटतं की त्या तशा तोडण्यासाठी मग ते स्वतःच्या जिवाची पर्वा करत नाहीत.

मग आम्ही गोष्टी घडतील तशा घडू द्यायच्या ठरवल्या. त्यात मुलांना जख़मा आणि खरचटणं वगैरे भरपूर चालायचं. काही वेळेला बँडएड लावून मुलं परत जे काय करत असतील तिकडे परतायची. त्यांच्या जखमांकडे परत कोणी पहायचं देखील नाही. ते रोजचं साधं खरचटणं असायचं. चालायचंच! आणि मुलांनाही असल्या फालतू गोष्टींकडे लक्ष द्यायला वेळ कुठे असायचा. मात्र आठ वर्षांच्या एक मुलगी घसरगुंडीवरुन चुकीच्या बाजूनं उतरली आणि तिच्या खांद्याला जबरदस्त मार बसला हा खूपच गंभीर प्रकार होता.

तसंच आम्ही झऱ्याकाठी मात्र कुठपर्यंत गेलं तर चालेल याची एक अदृश्य रेषा काढली. पाणी हे सगळीकडेच धोकादायक समजलं जातं. आणि त्यात पडायची चूक झाली तर सुधारायचा दुसरा चान्स मिळेल याची शाश्वती नाही. झऱ्यातले धोके नजरेला दिसत नाहीत. आणि आमचा कॅामन सेन्ससुध्दा तळ्याकडे जायला मार्ग खुला ठेवायला  सांगू शकत नव्हता.

मग शाळेच्या मीटींगमध्ये कोणीही तळ्यात उतरु नये, अगदी पाय सुध्दा बुडवू नयेत असा नियम करण्यात आला. हिवाळ्यात त्यावर बर्फ जमल्यावरही हेच नियम चालू होते. तळ्याकाठी कुठपर्यंत जावं यावर बरीच चर्चा झाली आणि एकमतानं हा ठराव पास झाला. तळ्याकाठी जायचं नाही या ठरावावर शाळेच्या मीटींगमध्ये आणि प्रत्यक्षात देखील कधीच कोणी आक्षेप घेतला नाही. नंतर कधी कधी पाण्यात पाय बुडवताना लहान मुलं काहीवेळा दिसत पण कोणीच पाण्यात किंवा पाण्यावर बर्फ साचल्यावर तिथे गेलेले दिसले नाहीत. तळ्याभोवती कुंपण नाहीये. मुलं स्वयंस्फूर्तीनं नियम पाळतात.

बीचच्या झाडाचा मात्र दरवर्षी नव्यानं दाखल होणाऱ्या प्रत्येकाला मोह पडतो. दरवर्षी एक नवीन चमू त्या झाडावर चढतो आणि ते तिथपर्यंत कसे पोचले ते पुढच्या मुलांना सांगतो.

नॅाबस्कॅाट पिझ्झामध्ये काम करणाऱ्या लोकांना सुध्दा आता आमची लहान मुलं तिथं दिसण्याची सवय झालीय. शाळेच्या जवळपासच्या माणसांना वेगवेगळ्या वयाची मुलं इतस्ततः फिरताना पहायची सवय झाली.

मुलांनी रोज नवीन संकटांना तोंड द्यायला शिकणं हा या सगळ्या स्वातंत्र्य असण्यामागचा सर्वात महत्वाचा भाग होता. सडबरी व्हॅलीमध्ये ते बंधनमुक्त अशा खऱ्या जगात जगत होते.

२४ द ऑनर सिस्टीम

मुलं त्यांच्या हजेरीची नोंद स्वतःच एका कागदावर यादी करुन ठेवत असत.

आमच्याकडे फक्त तळ्यावर जायचं नाही हा एकच निर्णय सगळ्यांनी मिळून घेतलेला नव्हता तर सगळे निर्णय एकमतानचे होत असत. उदाहरणार्थ, कुलुपं लावणं! सडबरी व्हॅलीमध्ये आम्हाला कुलुपांची ॲलर्जी होती म्हणलं तरी चालेल. आमच्या सुरुवातीच्या काळापासून शाळेत कुठेच कुलुपं दिसू नयेत अशी आमच्याकडली पध्दत होती.

प्रत्येकाला स्वतःच्या वस्तू ठेवायला एक ड्रॉवर दिला होता. सगळ्यांचे खजिने त्यात दडवलेले असत. त्यांनाही कुलुपं नव्हती. ड्रॉवरमधून काहीतरी हरवलंय असं फार क्वचित घडायचं. कधीकधी एखादा मुलगा दुसऱ्याच्या ड्रॉवरमध्ये डोकावताना दिसायचा. मग त्याला शाळेच्या कोर्टासमोर हजर व्हावं लागायचं.

कोणाच्याही खाजगी आयुष्यात डोकवायचं नाही हा आमच्याकडचा नियम बऱ्याचदा बुचकळ्यात पाडणाऱ्या परिस्थितीतही न्यायचा. ताजं अन्न ड्रॉवरमध्ये ठेवायचं नाही असा एक नियम होता. पण आमच्या नाकांनी आम्हाला जाणीव करुन दिली की हा नियम तोडला जातोय. एकदा त्या ड्रॉवरचा मालक जागेवर नसताना असं घडलं.

मग काय करायचं? आत्मपरीक्षण सुरु झालं. ड्रॉवर उघडून अन्न बाहेर काढावं का? दुसऱ्याच्या ड्रॉवरला हात लावावा का? ही चर्चा बराच काळ चालली. मग असह्य होणारा वास आणि उंदरांची भीती यातून तो प्रश्न आपोआप सुटला. ड्रॉवर उघडून त्यातले खाद्यपदार्थ बाहेर काढण्यात आले.

दुसऱ्याच्या वस्तूंना हात न लावण्याची सवय सर्वांच्या डोक्यात इतकी भिनली होती की पर्सेस, मौल्यवान वस्तू सहज उघड्यावर टाकल्या जात. त्यांना सहसा कोणी हात लावत नसे. हा नियम कोणी मोडलाच तर तात्काळ तीव्र प्रतिक्रिया उमटत असे. नियम तोडणाऱ्याला त्याचं वागणं निषेधार्ह आहे हे क्षणार्धात कळत असे.

विश्वास आणि आदराची ही भावना मुलांमध्ये आमच्या अपेक्षपेक्षा खूपच खोलवर रुजली होती. शाळेतला प्रत्येक माणूस ते पाळत असे. एरवी एखादा मुलगा भुरट्या चोऱ्या करत असेल किंवा टीनएजर्स नियम तोडत असतील तरी तेही आमचे नियम नीट पाळायचे.

एकदा एक १७ वर्षांचा मुलगा कार चोरल्याबद्दल शिक्षा भोगून आमच्याकडे आला होता. आमच्या शाळेत मात्र त्याच्या इतकं विश्वासू कोणीच नव्हतं.

पण या ऑनर पध्दतीचा खरा गाभा होता तो प्रशस्तिपत्रकं! त्यात शेकडो प्रकार होते.

शाळेतल्या अनेक वस्तू वापरायला विशेष शिक्षण लागायचं. डार्करुम, ऑफिस, कम्प्युटर रुम, स्वयंपाकघर, दुकान, आर्टस अँड क्राफ्टस् रुम सगळीकडेच असं विशेष शिक्षण मुलांना घ्यावं लागायचं. शाळेच्या मीटींगमध्ये यासाठी एक

सोपा नियम काढला होता. जो मुलगा ती वस्तू वापरायला शिकला असेल त्यानंच ती वापरावी. एकदा त्यांना ती वस्तू वापरायचं प्रशस्तिपत्रक मिळालं की मग ती वस्तू ते हवी तशी वापरु शकत असत.

त्या त्या विषयातले तज्ज्ञ मुलांना आणि इतर तज्ज्ञांना प्रशस्तिपत्रक द्यायचे. प्रशस्तिपत्रक मिळालेल्या मुलांची यादी सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावली जायची. धोकादायक उपकरणांबाबतही हाच नियम होता. त्यातला धोका जितका जास्त असेल तितका प्रशस्तिपत्रक मिळवण्याचा मार्ग जास्त गुंतागुंतीचा होता; पण यात वयाची अट नव्हती. प्रशस्तिपत्रक मिळवण्याचा मार्ग सगळ्यांसाठी सारखाच होता.

अर्थात यामुळे काही अतिशय लहान मुलं त्यांच्या वयाला न शोभणाऱ्या वस्तू वापरायला शिकत. म्हणजे ११ वर्षाचा मुलगा डार्करुममध्ये एकटाच काम करताना दिसे. किंवा १२ वर्षांचा एखादा मुलगा दुकान चालवताना दिसे. तर ९ वर्षांचा एखादा मुलगा स्वयंपाकघरात दिसे. ही लहान मुलं जितकी काळजीपूर्वक वागायची तितकं कोणीच वागत नसे. आम्ही मोठ्यांसारख्याच त्या वस्तू जबाबदारीने वापरु शकतो असं त्यांना जणू सुचवायचं असे. आणि सगळं प्रशस्तिपत्रकावर अवलंबून असल्यामुळे कोणीच चपळाई करुन चोरटेपणानं ती वस्तू वापरु शकत नसे.

कधीतरी आम्हालाही बंधनांची गरज वाटे. आमचा कम्प्युटर आला तेव्हा तो नीट वापरला जाणं अशक्य वाटायला लागलं. मध्यरात्रीदेखील तो चोरीला जाऊ शकत होता. कम्प्युटर एखाद्या कपाटात बंद करुन ठेवण्याशिवाय पर्याय दिसेना. शाळेत आणि कुलुप ?

कुलुप लावण्यावर इतकी चर्चा का चालावी हे एखाद्या बाहेरच्या माणसाला कळणं दुरापास्तच होतं. शाळेला रोज रात्री कुलुप असायचंच. नाही का ? शाळेच्या दाराची कुलुपं ही शाळेतली कुलुपं नसून ज्या बाहेरचा जगाशी आमचा संबंध नव्हता त्यांच्यासाठी होती. कम्प्युटरचं काहीसं तसंच होतं. ते फक्त बाहेरच्या जगानं शाळेच्या जगात येऊ नये याचं कुलुप होतं.

शेवटी ते कुलुप आम्ही लावलं. तिथून जाणारा प्रत्येकजण ते पाहून कुरकुर करत असे. शाळेत कम्प्युटर चालवण्याचं प्रशस्तिपत्रक असलेल्या प्रत्येकजणाकडे त्याची किल्ली होती.

काही महिन्यांतच ते कुलुप सगळ्यांना असह्य झालं. शाळेच्या मीटींगमध्ये शेकडो डॉलर्स खर्चून कम्प्युटर त्याच्या जागी फिक्स करण्यासाठी सुरक्षाव्यवस्था बसवावी असा ठराव प्रचंड बहुमतानं मंजूर झाला.

अतिशय आनंदानं त्या कपाटाचं कुलूप काढण्यात आलं.

जसजशी वर्षं गेली तसं लक्षात येतंय, की शाळेत चोऱ्यामाऱ्या वगैरे फारशा झाल्या नाहीत. मुलांना मनातून एकमेकांद्दल अनादर आहे असंही फार कमी घडलं. आमची शंभर वर्षांपूर्वीची इमारत जर वाईट पध्दतीनं वापरली असती तर सहज तिचा विध्वंस झाला असता, ती आज पहिल्या दिवसापेक्षा जास्त चांगली दिसतेय.

आणि आमच्याकडच्या ऑनर सिस्टीममुळे सगळीकडे विश्वासाचं आणि वैयक्तिक आदराचं वातावरण पसरलं होतं.

२५ द स्पोर्टिंग सीन

सप्टेंबरमधल्या एका लख्ख सूर्यप्रकाशाच्या दिवशी शाळेची इमारत ओस पडली होती.

शिवणकामाच्या खोलीच्या खिडकीतून मी बाहेर डोकावलं तर सगळे समोर हिरवळीवर जमले होते. 'कॅप्चर द फ्लॅग'चा खेळ मोठ्या रंगात आला होता. हसत खिदळत मुलं मैदानावर बागडत होती. तासाभरानं तो खेळ संपला. दोघाचौघांचे गट करुन मुलं शाळेच्या इमारतीकडे परतत होती. तहानलेली, भुकेली आणि दमलेली!

त्यांच्या गप्पात अजूनही त्या खेळाचाच विषय होता. सगळ्यांच्या डोळ्यासमोर त्याची क्षणचित्रं तरळत असावीत. दोन्ही बाजू जिंकल्या असाव्यात.

हे दृश्य वर्षभर दिसायचं. हिवाळा, उन्हाळा असो किंवा बर्फ पडलेला असो, फूटबॉल, सॉकर, आईस हॉकी, बास्केटबॉल आणि बेसबॉल हे खेळ आळीपाळीनं मैदानावर खेळले जायचे. गोल पोस्ट सारखी साधनं नसतील तर काहीतरी पर्यायी व्यवस्था करुन ते खेळायचे.

खेळ कोणताही असो त्यातला महत्वाचा नियम म्हणजे ज्याला खेळायची इच्छा आहे तो कोणत्याही वयाचा असो, त्याची क्षमता असो वा नसो त्याला खेळायला मिळायलाच हवं.

त्यामुळे मग बेसबॉलची टीम पाचपासून पंधरा खेळाडूंपर्यंत कितीही जणांची व्हायची. सहा आणि सोळा वर्षांची मुलं एकमेकांच्या सोबतच खेळायची. मुलं-मुली असा भेदभाव तर बिल्कुलच नव्हता.

जर मुलांचा खेळ बारकाईनं पाहिला तर बऱ्याच वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी दिसायच्या.

उदाहरणार्थ, एक आठ वर्षांचा लाजराबुजरा मुलगा बॅटिंगला आलाय; त्याचे सहकारी मैदानावर विखुरलेत; त्याला प्रोत्साहन देतायत; तो चेंडू फटकावतो; तो चेंडू उसळतो आणि त्या मुलाच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद उमटतो. आलेला पुढचा खेळाडू हा टीममधला स्टार खेळाडू आहे; अठरा वर्षांचा आणि धिप्पाड! तो चेंडू यायची वाट पहातो आणि सोडून देतो; कोणीच काही बोलत नाही; धावफलक दोनने वाढतो. खेळ चालू रहातो. इनिंगमागून इनिंग चालतात. मुलं चेंडू फटकावतात; आऊट होतात; काहीवेळा चुका करतात; काहीजण चमकदार फटके मारतात; खेळात नक्की काय चाललंय; हारजीत कोणत्या टीमची होतेय ते मुलांच्या वागण्यावरुन कळणं अवघड असतं धावफलक? त्याची कुणाला पर्वा आहे. तो १०-१ असा काहीतरी असतो.

दीड तासानं सर्वांच्या संमतीनं खेळ थांबतो. कोणालाच पराभवाचं दुःख नाही, एकमेकांची उणीदुणी काढणं नाही. मग एक महान सत्य सर्वांच्या लक्षात येतं. मुलं खेळणं एंजॉय करतायत. त्यांना त्यात मजा येतेय. मुलंमुली, लहानमोठी सगळी मुलं खेळाचा आनंद लुटतायत. वातावरण उत्सुकतेने भारलेलं, सळसळत्या चैतन्यानं रसरसलेलं आहे. मैदानावर सतत हास्याचे फवारे उसळतायत असंच दृश्य असायचं. फक्त बेसबॉलमध्येच नाही तर कोणताही मैदानी खेळ असो. खेळाचं ध्येय एकच असायचं, वर्गातून बाहेर पडून भरपूर खेळायचं आणि वेळ मजेत घालवायचा.

एका शिशिरऋतूत आमच्या शाळेत सुरुवातीपासून असलेली एक शिक्षिका मिम्सीला एका सत्याची जाणीव झाली. टॅकल फूटबॉल हा खेळ आमच्या शाळेत गेली पंधरा वर्षं काही सुरक्षेची साधनं न वापरतात खेळला जातोय. तिला यामुळे बराच धक्का बसला आणि ती अस्वस्थ झाली. हे अगदीच बेजबाबदारपणाचं कृत्य होतं. दरवर्षी वर्तमानपत्रात

फूटबॉल खेळताना जखमी झालेल्या मुलांच्या बातम्यांनी पानं न पानं भरलेली असायची. काही शाळांनी तर तो खेळ बंद केला होता.

मिम्सीनं शाळेच्या एका मीटींगमध्ये टॅकल फूटबॉल बंद करावा असं सुचवलं. शाळेच्या इतिहासात खूप जास्त मुलं हजर असल्याने गाजलेल्या काही मीटींग्जपैकी ती एक मीटींग होती. मीटींगमध्ये वादावादी चालू असली तरी ती शांतपणे, विचारपूर्वक चालली होती. जे खरोखर फूटबॉल खेळत होते तेच जास्त प्रमाणात बोलत होते. हळूहळू खेळाच्या मैदानावर नक्की काय घडतं त्याचं चित्र आमच्या डोळ्यासमोर स्पष्ट व्हायला लागलं.

“सडबरी व्हॅलीच्या मैदानावर टॅकल फूटबॉल खेळताना कोणीच आजपर्यंत जखमी झालेलं नाही.” मीटींगमध्ये एक टीनएजर सांगायला लागला.“कोणाला लागू नये यासाठी आम्ही फार दक्ष असतो. तो खेळाचाच एक भाग आहे. आम्हाला त्याची सतत जाणीव असते. ते कृत्य कुणीच करत नाही. टॅकल फूटबॉल हा खेळ रस्त्यावर चालण्यापेक्षा सुध्दा कमी धोकादायक आहे. ”

लहान मुलं याच्याशी सहमत झाली. एकाचाही विरोध नव्हता. एकालाही आजपर्यंत लागलेलं नव्हतं.

वादाला दोन बाजू होत्या. मग फूटबॉल बंद करावा हा मुद्दा प्रचंड बहुमताने नाकारला गेला. मिम्सीनं स्वतः सुध्दा या चर्चेनंतर टॅकल फूटबॉल खेळू नये याच्या विरोधात मत दिलं असावं असं मला आज अंधुक आठवतं.

या वादानंतरच्या दिवशी मी बास्केटबॉलचा खेळ नीट पाहिला, म्हणजे आजपर्यंत पाहिला असेल त्यापेक्षा जास्तच नीटपणे पाहिला. सहा फूटी आणि दीड फूटी मुलंमुली तो खेळ एकत्रच खेळत होते. एका पार्किंगच्या जागेचंच कोर्ट केलेलं होतं. बास्केटबॉल हा नेहमीचाच खेळ आमच्या शाळेच्या पध्दतीत खेळला जात होता.

मी पाहिलं तर मोठी मुलं मोठ्या मुलांशी दांडगाई करत होती. पण लहान मुलांना कोणीच हात लावत नव्हतं. लहान मुलं आपल्याएवढ्या मुलांशीच ढकलाढकली करत होती. ती मोठ्या मुलांना ढकलायचा प्रयत्न करत होती. अर्थात हे ढकलणं म्हणजे चिलटानं हत्तीला ढकलण्यासारखंच होतं.

मतितार्थ काय तर सडबरी व्हॅलीच्या खेळात खेळणं महत्वाचं होतं आणि खेळायचं हे ध्येय सगळेच गाठायचे आणि एका अर्थानं सगळेच जिंकायचे!

२६ कॅंपिंग

रोज शाळेत येण्याइतकंच शाळेबाहेरच्या ट्रीप्स आमच्यासाठी महत्वाच्या होत्या. अगदी सहज पाहिलं तरी लहान मुलांच्या चेहऱ्यांवरुन, देहबोलीवरुन, हालचालींवरुन, त्यांच्या मुक्तपणे वावरण्यावरुन हे कोणाच्याही लक्षात आलं असतं.

थंडीतल्या एका दिवशी आमच्यातल्या एकानं विचार केला, आपण यापुढची पायरी का चढू नये? कॅंपिंग ट्रीपची कल्पना सर्वांनाच आवडली. न्यू हॅंपशायरमधल्या व्हाईट माऊंटन्स् या ठिकाणी आपण कॅंपिंगला जावं असा विचार झाला. ज्यांना यायचं असेल त्यांनी नोंदणी करावी अशी सूचना नोटिसबोर्डावर लागली.

त्यावर एका झटक्यात तीस जणांची नावं आली. तयारी म्हणून आम्ही मोठे तंबू मिळवले. यायलाजायला शिक्षकांच्या गाड्या होत्याच. कोणी कोणी काय काय आणायचं त्याची प्रत्येकाला यादी दिली. प्रत्येकानं खर्च वाटून घ्यायचा असंही ठरलं आणि सर्वजण मजेत ट्रीपला गेलो.

त्यानंतर १० ऑक्टोबरला आम्ही फ्रॅंकोनिया स्टेट पार्कला ट्रीपसाठी गेलो. सगळेजण आनंदात होते. तिथे एक गंमतच झाली. आम्ही तिथे पोचलो तेव्हा सगळं रिकामं होतं कारण ऑक्टोबरमध्ये आठवड्याच्या अधल्यामधल्या दिवशी कोणी फारसं कॅंपिंगच्या फंदात पडत नाही. मग आम्ही कॅंप लावला. शेजारचा एक छोटा डोंगर चढलो-उतरलो. तिथून दिसणारं भोवतालचं दृश्य अतिशय मनोहारी होतं. मग खाली येऊन आम्ही शेकोटी पेटवली, आमचं रात्रीचं जेवण बनवलं, एकमेकांना भुताच्या गोष्टी सांगितल्या आणि अखेरीस दमून पण आनंदाने झोपलो.

पण त्या रात्री बर्फ पडला म्हणजे थोडाफार नाही तर फारच मोठ्या प्रमाणात बर्फ पडला. पहाटे तीन वाजता चार इंच बर्फ बाहेर साठला होता. एक तंबू तर कोसळून आत झोपलेल्या लोकांच्या अंगावर पडला. सगळ्यांनी एका ठिकाणी जमण्यातच एक तास गेला. आम्हाला थंडीमुळे हुडहुडी भरली होती. मग वादळ झालं त्यात आम्ही अडकलो. त्या सकाळी गारठलेले सर्वजण एका शेकोटीभोवती शेकत बसले होते. आमचा नाश्ता तर गार झाला होताच. सगळंच एकदम थंडगार पडलं होतं.

मग आम्ही कॅंप गुंडाळला आणि घराकडे निघालो. त्यानंतर सुमारे दहा वर्षांनंतरच आम्ही परत थंडीत एका कॅंपला जाण्याचं धाडस केलं. तेव्हाही  अगदी जवळ, माऊंट मोनाडनॉकला गेलो. जिथून काही प्रॉब्लेल आला असता तर लवकर परत येता आलं असतं. तसंच फक्त एका रात्रीपुरताच कॅंप आयोजित केला होता.

अशा भयंकर अनुभवामुळे शाळेतल्या मुलांनी माघार घेतली का या प्रश्नाचं उत्तर म्हणजे ‘अजिबात नाही’. तो फक्त कोणत्या ऋतूत कॅंपला जावं इतकाच प्रश्न होता. ज्या दिवशी आम्ही बर्फात अडकलो त्याच वसंतऋतूत मुलांची परत कॅंपची चर्चा चालू झाली. मग जो कॅंप ठरवला तो चार दिवसांचा होता. तिथे फारच मजा आली असं मुलं परत आल्यावर बर्फ-प्रकारामुळे शंकित असलेल्या शिक्षकांना सांगत होती.

मग आम्ही अजून एक ट्रीप आखली. जूनच्या शेवटी शेवटी दक्षिणेला केप कॉडला जायचं ठरवलं. निकरसन स्टेट पार्क हे आमचं ध्येय होतं. तिथे आजपर्यंत तरी जूनमध्ये कधीच बर्फ पडला नव्हता. ती ट्रीप फारच यशस्वी झाली. त्या ट्रीपमध्ये आम्ही तळ्यात पोहलो, जंगलात फेरफटका मारला, समुद्रकिनारी गेलो, टेकड्यांवर गेलो आणि प्रोव्हिन्सटाऊनमध्येही फिरलो.

मग शाळेत नवीन पध्दतच रूढ झाली. दरवर्षी जूनमध्ये आम्ही एक महिना केप कॉडला जायचो. घरापासून दूर तंबू ठोकून रहाणं आणि स्वतःची जबाबदारी घेणं ज्यांना जमत असेल त्या सर्वांनी यायला हरकत नाही हा कॅंपला येण्यासाठी नियम होता. मात्र ऊन असो वा सावली, पाऊस असो वा थंडी आम्ही कॅंपला जायचोच. कोणालाच पाऊस वगैरे गोष्टींनी फरक पडत नसे. पाऊस पडला तर बेदिंग सूट लवकर भिजत आणि तळपता सूर्य नसल्यामुळे सनबर्नची भीती नसे इतकंच!

याचा परिणाम म्हणून मग एक कॅंपिंग आणि एक टूरिंग कॉर्पोरेशन् स्थापन झाली. कॅंपिंग आणि इतर ट्रीप्सचं नियोजन करणं हे त्या कॉर्पोरेशन्सचं काम होतं. अर्थात, तिथेही वादावादी होतीच. विशेषतः कॅंपिंग म्हणजे काय याबद्दल बऱ्याचदा वाद होई.

आमच्या पहिल्या केप कॉडच्या ट्रीपला हे सगळं सुरु झालं. "त्याला तुम्ही कॅंपिंग म्हणता?" मार्गनं कुत्सित स्वरात विचारलं. तिच्या दृष्टीनं त्यात काही धाडस वगैरे नसून ते एखाद्या चांगल्या हॉटेलमध्येच रहाण्यासारखं होतं. पुढे ती म्हणाली "आपण जणू काय मायामीच्या समुद्रकिनाऱ्यावर रहात होतो इतकी तिथे ऐष होती. पोहणं काय, फिरणं काय, वाफाळतं जेवण काय, धमाल होती नुसती. त्यात कसलं आलंय कॅंपिंग?"

त्याचं बरोबर होतं. खरं तर आम्ही ज्याला कॅंपिंग म्हणत होतो ते सगळ्यांना रुढार्थानं असलेलं कॅंपिंग अभिप्रेत नव्हतं. आम्हाला सगळ्यांना शाळेबाहेरची एक मस्तपैकी ट्रीप असंच म्हणायचं होतं.

पण मग कॅंपचे कट्टर पुरस्कर्ते नाराज झाले. त्यांना धाडसी कॅंप्सना जायचं होतं. त्यामुळे अशा ऐषोरामी ट्रीपना यावं का नाही यावर ते साशंक होते. पण नंतर फेरविचार करुन ते पुढच्या वर्षी आमच्यासोबत यायला तयार झाले. त्यांना वाटत होतं की कदाचित मजाही येईल. एकूण ट्रीपचा साचा तोच राहिला.

तो साचा तसाच राहिला इतकंच नव्हे तर भाग घेणाऱ्यांची संख्या खूपच वाढली. फ्रँकोलाच्या भयंकर प्रसंगातून बाहेर आल्यावर मग आम्ही मोनाडनॉकची हिवाळ्यातली ट्रीपसुध्दा काढली. मग काही वर्षांनंतर किलिंग्टनला बर्फात स्कीईंगची ट्रीप काढली. एकदा व्हर्मॉंटला गेलो. तिथे तंबू नव्हते. आम्ही स्लीपिंग बॅग्ज मध्ये झोपलो.

या सगळ्यात कॅंपिंगच्या समर्थकांनी त्यांच्या पध्दतीनं आनंद लुटला. त्यांनी एकत्र येऊन जवळपासच्या टेकड्यांवर गिर्यारोहण केलं. भर बर्फात स्कीईंग केलं. ट्रीपचा आनंद लुटणाऱ्यांनी त्यांच्या पध्दतीनं आनंद लुटला. काही मुलं जमून विचारविनिमय करुन छोट्या छोट्या ट्रीप्सना जात. तर काहीजण मनात येईल तेव्हा, मनात येईल तिथे ट्रीपला जात. जेव्हा कधी मुलांना एकत्र यायला जमेल तेव्हा ते जमत एवढं मात्र नक्की!

मार्गला या सगळ्या ट्रीप्ससोबत जुळवून घेणं फार अवघड गेलं नाही. शेवटी सगळेचजण जात होते. महत्वाचं म्हणजे ते जाणं आयुष्यात उपयोगाचं होतं. सगळ्यांचाच वेळ मजेत जायचा. त्यातून स्वतःच्या मूलभूत गरजा काय आहेत याचं सगळ्यांना भान आलं होतं.

मार्गला अजून एक अभिनव कल्पना सुचली. जी मुलं बाहेर कॅंपला जाण्याइतके मोठी नाहीत त्या मुलांसाठी शाळेतच एखाद्या रात्रीपुरती तंबू ठोकून रहाण्याची व्यवस्था का करु नये? लहान मुलांना कॅंपला जाता येत नाही म्हणून ते फारच खट्टू होत होते. त्यामुळे अर्थातच ती सुरेख कल्पना होती. लहान मुलांनी मोठ्या संख्येनं यात भाग घेतला हे वेगळं सांगायला नकोच!

मग दरवर्षी जूनमध्ये केपला जाता येणार नाही अशा लहान मुलांसाठी शाळेच्या आवारातला एका रात्रीचा कॅंपआऊट सुरु झाला. लवकरच मुलं सडबरी व्हॅलीच्या पध्दतीतल्या कॅंपिंगला सरावली. जरा मोठी झाल्यावर ती इतरांबरोबर बाहेरच्या कॅंपला जाऊ शकायचीच.

मार्गलाही आता कोणतीच तक्रार नव्हती. काही लहान मुलं नंतरच्या आयुष्यात खरेखुरे गिर्यारोहक होतील अशी व्यवस्था करुन तिनं ट्रीपच्च्या कामात काहीतरी योगदान दिलंच होतं.

२७. कमिटीज् अँड क्लार्कस्

शाळेच्या दैनंदिन व्यवस्थापनाचे निर्णय कारकून नावाची जमात घेत असे. क्वचित एखादा निर्णय समिती घेत असे. शाळा हिवाळ्यात सुरु झाल्यावर एकदा मीटींग होऊन वर्षभरासाठी कारकून निवडले जात.

आमच्या शाळेत आम्हाला एक गोष्ट अजिबात नको होती – ती म्हणजे अधिकारशाही. हळूहळू ती पध्दत सगळंच झाकोळून टाकते. त्यामुळे आम्ही आमचं कामाचं स्वरुप सडबरी व्हॅलीच्या विशिष्ट पध्दतीत बसवलं होतं. रोजची कामं कशी करायची ते शाळेच्या मीटींगमध्ये ठरायचं. ते काम तेव्हा कोणालातरी करायला सांगितलं जायचं. पण कायमस्वरुपी एकच काम एकजण करायचा नाही. दरवर्षी मुलं किंवा स्टाफ यापैकी कोणीतरी त्या कामाची जबाबदारी घ्यायचं.

फोन घ्यायचे आहेत? पत्रव्यवहार सांभाळायचा आहे ? ऑफिसच्या वस्तू आणायच्या आहेत? फाईल्स नीट ठेवायच्या आहेत? या सगळ्या कामांसाठी आम्ही एक कारकून निवडायचो. शाळेच्या इमारतीची देखभाल करायचीय? मग आमच्याकडे एक बिल्डिंग मेंटेनन्स कारकून असायचा. तर मैदानांची निगराणी राखायला वेगळा कारकून असायचा.

ज्या कामात बरीच मदत लागायची, बरेच निर्णय घ्यायला लागायचे तिथे आम्ही समिती नेमायचो. शाळेचे अकाऊंटस् पहायला, इंटिरिअर पहायला आणि जनसंपर्कासाठी अशा वेगवेगळ्या समित्या असायच्या.

कामं निरनिराळी असायची. त्यासाठी कारकून यायचे आणि जायचे. एकूण कामं तीच असायची पण त्या कामांचं महत्व दरवर्षी कमीजास्त व्हायचं. शाळेच्या मीटींगला जाणं या आनंदाइतकाच आनंद मला फार कमी गोष्टींत मिळायचा त्यात  कारकूनी कामं कमी होणं असा एक सर्वोच्च आनंदाचा प्रकार होता. सर्वजण मिळून काम करतायत, त्यासाठी त्यांना वरती डोक्यावर बसून हाकलणारा माणूस असण्याची गरज संपलीय असा त्याचा अर्थ होता. म्हणजेच पर्यायानं ‘अधिकारशाही नको’ या आमच्या तत्वाप्रमाणे सगळं चाललंय असा कारकूनी कामं कमी झाल्याचा अर्थ होता.

उदाहरणार्थ, शाळा रोज सकाळी वेळेवर उघडणं आणि संध्याकाळी वेळेवर बंद करणं यासाठी एक कारकून होता. शाळेला लागणाऱ्या किल्ल्या ज्याला जशा लागतील तशा द्यायच्या हेही काम त्याच्याकडे होतं. काही वर्षं त्या कामाला कारकून लागायचा अशी गेली. हळूहळू शाळा उघडणं आणि बंद करणं हा प्रकार सोपा झाला. कारकूनाला फक्त एका किल्लीची देखभाल आणि कोणत्या किल्ल्या कोणाकडे आहेत याची यादी पहाणं एवढंच काम उरलं. मग कारकूनाचं ते कामच नाहीसं झालं आणि दुसऱ्या कोणाच्या तरी यादीत ते काम समाविष्ट झालं.

शाळा पहायला सतत कोणी ना कोणी यायचं. अशा येणाऱ्या पाहुण्यांचं व्यवस्थापन बघायला एक व्हिजिटर्स क्लार्क होता. अनेक वर्षं ते काम मोठ्या प्रमाणावर असायचं. कारण येणाऱ्या पाहुण्यांना शाळा दाखवणं हे एक वेगळं कामच असायचं. नंतर नंतर मात्र येणारे पाहुण्यांना आमच्या दैनंदिन कामाच्या मध्ये न येता  आमची शाळा कशी पहातील

यावर आम्ही विचारविनिमय केला. मग ते काम आम्ही पब्लिक रिलेशन्स कमिटीला सोपवलं आणि अजून एक कारकूनी काम आणि कारकून कमी झाला.

काही कामं कमी व्हायची तशीच नवनवीन कामं निर्माण व्हायची हेही खरंच! शाळेला काही वर्षं झाल्यावर आमचे माजी विद्यार्थी काही ना काही कामासाठी आमच्याशी संपर्क ठेवायचे. त्यातले बरेच जण यायचे, आम्हाला त्याचा आनंदच व्हायचा. मग आमच्या लक्षात आलं की माजी विद्यार्थ्यांना शाळेशी संपर्क साधण्याची सोपी पध्दत आम्हाला शोधायला हवी होती. मग माजी विद्यार्थ्यांच्या भेटीचं, कामाचं नियोजन करण्यासाठी एक वेगळा कारकून ठेवण्यात आला.

तो कारकून नेमणं हे आमची तत्वं पाळण्याला आम्ही किती महत्व देत होतो याचं उत्तम उदाहरण आहे. माजी विद्यार्थ्यांसाठी कारकून नेमण्याआधी आम्ही पाच वर्षं शाळेच्या मीटींगमध्ये त्या मुद्यावर चर्चा करत होतो. त्याआधी आम्ही कोणालातरी अनौपचारिकरीत्याच ते काम करायला सांगत होतो. माजी विद्यार्थ्यांनी एक समिती स्थापन केली, त्यांच्याकडून त्यांनी आमच्या संपर्कात रहाण्याची गरज दाखवली तेव्हाही आम्ही काही वर्षं वाट पाहिली. मग खूप सारं विचारमंथन करुन आम्ही एका माणसाला त्या कामासाठी नेमलं. एकधिकारशाही कशी वाढत जाते असं सांगणारा पार्किनसन लॉ आमच्याकडे नव्हता!

क्वचित आम्हाला एका कारकूनाकडे कामं जास्त झाली तर दोघांमध्ये वाटायला लागायची. आम्हाला तसं करायला अजिबात आवडत नव्हतं. पण एकाच कारकूनाला जीवघेणं काम देण्यापेक्षा कामं वाटलेली बरी पडायची.

आामच्याकडे विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचं काम बघायला एनरोलमेंट क्लार्क बरेच दिवस होता. मुलांच्या मुलाखती, कागदपत्रांची देवघेव वगैरे सगळं तोच पहायचा. हे सगळं एकाच प्रकारचं काम आहे असं आम्हाला वाटत होतं. पण खरं तर तसं नव्हतं. त्या कारकूनाच्या हे लवकरच लक्षात आलं. प्रवेशासाठी मुलाखती घेणारी मुलगी हा नवीन येणाऱ्या लोकांचा शाळेशी संपर्क साधायचा पहिला पॉईंट असायचा. पण मग बऱ्याचदा नवीन विद्यार्थी आणि पालक त्याच्या तक्रारी, अडचणी, निरनिराळे प्रश्न तिलाच विचारायचे.

हे सगळं तसं ठीक होतं. पण याच चित्रात पैशाची देवघेव आली आणि सगळंच चित्र बदललं. त्या मुलीसोबत ज्यांची मैत्रीपूर्ण नाती होती ती बदलायला सुरुवात झाली.

खरं तर नेहमीच मैत्रीत अंतराय निर्माण व्हायला पैसा जेवढा कारणीभूत ठरतो तितकं दुसरं काहीच ठरत नाही. एका दिवशी दोन मित्र गळ्यात गळे घालून चालताना दिसतात. एखाद्या बिलावरुन त्यांचं भांडण होतं आणि दुसऱ्या दिवशी ते एकमेकांचे शत्रू झालेले असतात असं आपण़ नेहमीच बघतो.

शाळेतही मुलांची फी वेळेवर आलीय का ? हे बघणारा कारकून मुलांच्या आणि पालकांच्या शत्रुपक्षात जाण्याची बरीच शक्यता असे. यावरुन आमच्याकडेही कालपर्यंत दोस्त असलेले पालक आणि विद्यार्थी आज शत्रू होत. त्याला फारसं काही घडावं सुध्दा लागत नसे. फक्त फी भरण्याची वेळ झालीय असं त्या कारकूनानं सुचवलं की बस्! “पैसे? तू मला पैशासाठी तगादा लावतोयस? काय माणूस आहेस तू? आम्हाला वाटत होतं तू दयाळू, समजूतदार आहेस. पण आता आम्हाला खरं काय ते कळलं. ” असे उद्गार त्याला ऐकावे लागत.

अठरा वर्षं आमच्याकडच्या कारकूनानं हे सहन केलं. अखेरीस त्यालाही ते असह्य झालं. मग फी घेणारा कारकून काढून टाकून आम्ही प्रवेश देणारा कारकून आणि एक रजिस्ट्रार अशा दोन वेगळ्या नेमणुका केल्या. प्रवेश कारकून आता कायमच लोकांना चांगला वाटणार होता आणि रजिस्ट्रार मात्र रोज अॅस्पिरिन घेणं किंवा लवकर निवृत्त होणं यापैकी एक पर्यात निवडू शकत होता इतका त्याच्या डोक्याला त्रास सुरु झाला!

अशी सफाईच्या कारकूनाचीही एक कथाच आहे. पण त्याला एक स्वतंत्र प्रकरणच लिहावं लागेल!

२८ क्लीनिंग.

शाळेसमोर सफाईपेक्षा गंभीर प्रश्न कोणताच आला नाही.

आमच्या शाळेच्या स्वच्छतेला आम्हीच जबाबदार आहोत असं आम्हाला सुरुवातीपासून वाटायचं. आमची शाळा हे आमचं घरच होतं. ते आम्ही घाण केलं तर नीट साफ करायची जबाबदारीदेखील आमचीच होती असं आमचं मत होतं.

शाळा सुरु झाल्यावर काही महिने आमचा स्टाफ शाळेतल्या सर्वच व्यवस्था बघत होता. म्हणजेच बाकीच्या सगळ्या कामांबरोबरच स्टाफचे सदस्य स्वच्छता देखील करायचे.

शाळा सुरु झाल्या झाल्या मुलांनी शाळेच्या कामाला लागावं अशी आमची बिल्कुल अपेक्षा नव्हती. सडबरी व्हॅली काय चीज आहे हे त्यांना कळायला वेळ लागणार होता. म्हणजे त्या काळातही परत स्टाफचे सदस्य स्वच्छता करत असायचे.

दररोज संध्याकाळी शाळा संपल्यावर आम्ही झाडू आणि फडकी घेऊन शाळा साफ करायचो. मैदानावरचा कचरा उचलायचो. आम्हाला हे काम सहजसोपं वाटत होतं आणि आम्ही ते करतोय याचा आम्हाला अभिमान वाटत होता. पण यातूनच मोठा वादविवाद सुरु झाला.

त्याचं असं झालं : आमच्या बऱ्याच विद्यार्थ्यांचे पालक निरनिराळ्या प्रख्यात शाळा कॉलेजेसमध्ये शिकवत होते. त्यांच्या कामाचा त्यांना अभिमान होता. शिक्षक हा त्यांच्या दृष्टीनं समाजात महान काम करणारा माणूस होता.

त्यांच्या महान कामांच्या यादीत साफसफाई करणं बसत नव्हतं. “तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांसमोर स्वतःची नाचक्की करुन घेत आहात. बुध्दिमान लोकांचा दर्जा मुलांच्या नजरेत यामुळे खालावेल” असंही एकानं सांगितलं.

“मुलांपुढे तुम्ही चुकीचा आदर्श ठेवत आहात” असं दुसरा एकजण म्हणाला. “त्यांना तुमच्या मुळे प्रेरणा मिळायला हवी. आमची मुलं सफाई कामगार व्हावीत असं आम्हाला वाटत नाही.”

“मुलांना शिकवायला तुम्हाला फार वेळ मिळत नाही यात काहीच आश्चर्य नाही.” मुलांना हवं ते शिकू द्यावं या आमच्या तत्वज्ञानाबाबत उतावीळपणे ज्यांना परिणाम दिसायला हवे होते त्या सगळ्या पालकांचं असंच म्हणणं होतं. दीडदमडीची सफाई करण्यात आम्ही फारच वेळ घालवतो असं त्यांना वाटत होतं.

सफाईबद्दल त्या पालकांचं म्हणणं तरी काय होतं याचं आम्हाला कुतूहल वाटत होतं. पालकांनी स्वयंसेवक म्हणून शाळेत काम करण्याच्या योजनेत ते नक्कीच भाग घेणार नव्हते आणि बाहेरुन सफाईला माणसं भाड्यानं नेमावीत यासाठी आमच्याकडे पैसे नाहीत हेही त्यांना माहिती होतं.

पण त्यांच्या डोक्यात काय होतं ते आम्हाला लवकरच कळलं. १९६० च्या दशकातल्या राजकारणात बरेच पालक सक्रिय होते. समाजातल्या तळागाळातल्या लोकांचं पुनर्वसन करण्याचं महान काम ते करणार होते. त्या कामाच्या त्यांच्या अनुभवातून त्यांनी आम्हाला या समस्येवर तोडगा सुचवला.

त्यांच्यातली गटप्रमुख असलेली एक स्त्री एक दिवस आमच्याकडे आली. ती जरा गुर्मीतच होती. शाळेच्या मीटींमध्ये ती म्हणाली, "सफाईच्या समस्येवर माझ्याकडे उपाय आहे. त्याचा सगळ्यांनाचा फायदा होईल. स्टाफनं आता ही क्षुद्र कामं करायची गरज नाही. आपल्या शाळेत समाजातल्या खालच्या वर्गातली मुलं नाहीत. त्या मुलांना आपल्या शाळेत बोलवा, शिक्षण फुकट द्या आणि त्याबदल्यात त्यांना सफाई करायला सांगा."

आम्हाला ते पटणं शक्यच नव्हतं. त्यामुळे ती मीटींग प्रचंड वादग्रस्त झाली. स्टाफनं आधीपेक्षा जास्त निर्णायकपणे स्वच्छता करणं चालू ठेवलं. हा प्रस्ताव मांडणारे  पालक वैतागून शाळेतून निघून गेले. सफाईच्याबाबतीत वादाचा हा पहिलाच प्रसंग होता. काही महिन्यांनंतर यात शाळेतल्या सगळ्यांनी सामील व्हावं असं आम्हाला वाटलं. शिक्षक आणि विद्यार्थी दोघांनाही आदर्शाचे धडे मिळायला हवेत.

मग आम्ही स्वयंसेवक ही पध्दत राबवायचं ठरवलं. क्लीनिंग कारकून स्वच्छतेचं व्यवस्थापन बघेल आणि स्वच्छता करायला लागणाऱ्या वस्तू आणण्याची व्यवस्था करेल असं ठरलं. शाळेची इमारत बरीच मोठी होती. त्यामुळे त्याचं व्यवस्थापन हेही एक मोठं काम होतं. त्या कारकूनानं बरीच वर्षं नेटानं काम केलं. स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे पुढे आले. काम करायचा प्रयत्न केला पण ते काही ना काही अडथळा येऊन मागे सरले. दिवसातून एकदा शाळेची सफाई होण्याऐवजी आठवड्यातून एकदा व्हायला लागली.

लवकरच काही ठरावीक शिक्षक आणि विद्यार्थीच प्रत्येक आठवड्याला सफाई करतायत असं चित्र दिसायला लागलं. यावर एका मीटींगमध्ये "ज्यांनी घाण केलीय, त्यांना हे साफ करु दे." जॅक नावाचा मुलगा जरा त्वेषानंच म्हणाला.

मग शाळेच्या मीटींगमध्ये एक नवीनच वाद सुरु झाला. सगळे प्रयत्न फोल झाल्यावर लोकशाही पध्दतीचा विचार झाला. त्यातून एक मसुदा तयार झाला. सडबरी व्हॅलीत मग जोरदार चर्चा होऊन नाईलाजानं आम्ही प्रत्येकानं कंपलसरी स्वच्छता करण्याची योजना आखली. त्यानुसार कोणत्याही वयाच्या मुलांनी दर आठवड्याला आळीपाळीनं स्वच्छता करायची असं ठरलं.

क्लीनिंग कारकूनाचं काम दुप्पट गुंतागुंतीचं झालं. आधी त्यांना काय काय काम आहे ते ठरवावं लागत असे आणि काम करणाऱ्यांकडून ते काम नीट झालंय का ते तपासावं लागत असे. हे काम मुलांना आम्ही सक्तीनं करायला लावत होतो आणि अशी सक्ती केल्यावर कामाचं इतरत्र जे काही होतं त्याला आम्हीही अपवाद ठरलो नाही.

काही वर्षं गेली. काही कारकून आले आणि गेले. शाळा अस्वच्छ दिसत राहिलीच!

मग एक दिवस शाळेचा फळा पुसताना हॅरी नावाचा आमचा एक सिन्सिअर विद्यार्थी म्हणला. "सक्ती बास झाली. आपल्याला प्रामाणिकपणे काम करणारी मुलं हवीत ना मग आपण त्यांना त्या कामाचे नीट पैसे देऊ. पैसे देऊन स्वच्छता करणाऱ्या मुलांची पध्दत आखू. हातखर्चाला पैसे हवे असणारे बरेच विद्यार्थी असतील."

पण अनेक लोकांना ही पध्दत काही बरोबर वाटेना. "सगळेजण काम करायला तयार असताना वेगळे पैसे का द्यायचे ? " असं त्यांचं म्हणणं पडलं. पण एकूण चर्चेअंती हॅरीची कल्पना शाळेच्या मीटींगमध्ये बहुमतानं पास झाली. तोच क्लीनिंग कारकून म्हणून निवडला गेला. त्याला एक छोटं पण पुरेसं बजेट संमत झालं.

त्यानं त्या कामात स्वतःला अक्षरशः वाहून घेतलं. लवकरच हॅरीच्या क्लिनिंग सर्व्हिसचं स्वतःचं ऑफिस सुरु झालं. (ऑफिस म्हणजे एका खोलीत एक वेगळं टेबल!) रजिस्टर्स घातली गेली. त्यानं प्रत्येकाला कागदावर कामं लिहून द्यायला सुरुवात केली. त्यावर काम पूर्ण झाल्यावर ते नीट झाल्याची सही असे. कामाची नीट यादी असे आणि काम कसं करायचं याचं शिक्षणही दिलं जाई.

हे शिक्षण दिल्याचा हॅरीला आनंद आणि अभिमान वाटत होता. व्यावसायिक सफाई संघटनांसोबत त्यानं काम केलेलं असल्यामुळे त्यानं त्यातल्या बऱ्याच करामती आत्मसात केलेल्या होत्या. प्रत्येक नवीन कामगार वर्गातला मुलगा झाडू किंवा पुसणं करण्याआधी हॅरीकडून नीट शिक्षण घेत असे.

हा सुरेख प्रयोग होता. पण तो चालला नाही कारण पैसे देऊन आपण कामावर नेमलेली माणसं त्यांचं काम १००% उत्साहात करतातच असं नाही. त्यामुळे शाळा परत एकदा अस्वच्छ दिसायला लागली. फळा पुसताना देखील ते जाणवायचं.

शेवटी गोष्टी या थराला आल्या याची प्रत्येकालाच थोडी थोडी शरम वाटायला लागली. आणि मग शाळा स्वच्छ असावी असा प्रत्येकाला साक्षात्कार झाला.

यात मग अनेक चढउतार आले. शाळेच्या मीटींग रुम मध्ये वादविवाद झाले. शेवटी लोकांनी स्वतःचा आत्मसन्मान राखायचा ठरवला. स्वयंसेवक पध्दत मग सुरु झाली. जरा जास्त स्वच्छतेचं काम असेल तर आठवड्याच्या शेवटी आम्ही पालकांना बोलावत असू. त्यातले अनेकजण यायचे. त्यातले शिक्षणक्षेत्रातले, शिक्षकांच्या कामाबद्दल मनात पूर्वग्रह असलेले पालकही आता यायला लागले. कालाय तस्मै नमः हेच खरं!

कारकूनही बदलले. क्लिनिंग कारकून हा प्रकार यथावकाश नामशेष झाला. सुंदर शाळा या समितीकडे स्वच्छतेसाठी स्वयंसेवक निवडण्याचं काम दिलं गेलं. आम्हाला तेच जास्त योग्य वाटत होतं.

२९ द मिरॅकल बजेट

फक्त स्वच्छतेसाठीच आमच्याकडे पैसे नव्हते असं नाही. तर पैशाचा खडखडाट सडबरी व्हॅलीत सुरुवातीपासूनच होता.

आमच्या कल्पना राबवण्याआधी १९६६ मध्ये आम्ही शिक्षणतज्ज्ञांचा सल्ला घेतला होता. "शाळा सुरु करायला किती पैसे लागतील असा तुमचा अंदाज आहे ?" हा प्रश्न आम्ही त्यांना विचारला. त्यावर "कमीतकमी

२,५०,००० डॉलर्स" हे उत्तर मिळालं. मिळालेल्या उत्तरांपैकी हा सर्वात लहान आकडा होता. काहीवेळा तो आकडा २,५०,०००००० डॉलर्स इतकाही होता.

शाळेचे आम्ही संस्थापक वगैरे धरुन आमचं बजेट ताणलं तर ४०,००० डॉलर्स कसेबसे जमा होत होते. आम्ही शाळा सुरु करायचीच या निर्णयावर पक्के होतो. त्यानुसार एक वर्ष शोधल्यावर 'नाथानिएल बाउडिच इस्टेट' ही १० एकर आवार आणि इमारत असलेली जागा ८०,००० डॉलर्सना मिळाली. त्यात आधी २०,००० डॉलर्स अॅडव्हान्स म्हणून द्यायचे होते. उरलेले तारणावर होते जे नंतर हप्त्याहप्त्यात दिले तरी चालणार होते. त्या जागेमुळे आमची महत्वाची गरज भागली आणि निम्मे पैसे संपले. उरलेले पैसे इमारतीची डागडुजी आणि फर्निचर, उपकरणं, शाळेची जाहिरात करणं यात गेले. शाळा सुरु झाली तेव्हा आम्ही कंगाल झालो होतो. आम्ही आमची शाळा इतक्या स्वस्तात कशी विकत घेतली याचं सगळ्यांना आश्चर्य वाटत होतं. आम्हालाही त्या जागेची इतकी कमी किंमत का आहे अशा विचारानं अनेक वेळा ते आवार तपासलं पण काहीच उणीव आढळली नाही.

पण एकदा ताबा मिळाल्यावर काहीच महिन्यात या प्रश्नाचं उत्तर मिळालं. त्या आवारात एक मातीचं धरण होतं. त्याच्या बांधकामाच्या पध्दतीची मॅसॅच्युसेटस्च्या इंजिनिअरिंग कॉर्पोरेशननं बरीच निंदा केली होतीच आणि ते बांधकाम योग्य नसल्याचं सर्टिफिकेट दिलं होतं. जागेच्या मालकाबरोबर आम्ही केलेल्या करारानुसार ते धरण नीट करायचं काम आमच्याकडे आलं होतं असं नंतर आमच्या लक्षात आलं. एकूण काय तर आधीच्या मालकांनी ते धरणाचं काम टाळण्यासाठी आमच्यावर ती इमारत अक्षरशः लादली होती.

ते धरण बांधायला कमीत कमी ५०,००० डॉलर्स तर लागणार होतेच. तो खर्च केला असता तर आम्ही रसातळाला गेलो असतो पण मग मॅल स्टॉकर नावाचा आमचा एक फार्मिंगहॅममधला कॉट्रॅक्टर मित्र मदतीला आला. तो म्हणाला "मी स्वतःची माणसं आणून लावतो आणि कमी किमतीत ते काम करुन देतो". मॅल शब्दाला जागणारा होता. त्यानं ते काम फक्त ४००० डॉलर्समध्ये केलं. आम्ही त्याबद्दल त्याचे कायमचे ऋणी आहोत.

मात्र अशा अनुभवांमधून बजेट आणि खर्च काटेकोरपणे करण्याला आम्ही सरावलो. कितीही किरकोळ खर्च असला तरी आमच्या नजरेतून तो सुटत नसे. आम्हाला नक्की कोणकोणत्या गोष्टी लागणार आहेत, त्या स्वस्त दरात कशा मिळवायच्या, वापरलेल्या जुन्या वस्तू कशा-कुठून मिळवायच्या आणि अनेक गोष्टी फुकटात कशा मिळवायच्या हे सर्व आम्ही लवकरच नीट शिकलो. मुख्य म्हणजे कोणत्याही गोष्टींशिवाय अडू द्यायचं नाही किंवा पर्यायी वस्तू कशा वापरायच्या हे आम्ही शिकलो. गरज ही शोधाची जननी असते हे सडबरी व्हॅलीत आम्हाला नीट कळलं.

आमच्या आदर्शवादामुळे गोष्टी अजूनच सोप्या झाल्या. सरकारतर्फे कोणतीही मदत किंवा अनुदान घ्यायचं नाही असं आम्ही ठरवलं होतं. कोणी गिफ्ट दिल्या तर आम्ही स्वीकारायचो. एकूण शिक्षकांना वेळच्यावेळी पगार मिळावा इतकीच आमची साधी अपेक्षा होती.

हे सगळं कमी होतं म्हणून की काय आम्हाला आमची शाळा केवळ उच्चभ्रू लोकांसाठी नाही हे उच्चमध्यमवर्गीयांना दाखवून द्यायचं होतं. त्यामुळे आम्हाला फी कमी ठेवावी लागणार होती. सार्वजनिक शाळांपेक्षा थोडी कमीच फी आकारण्याचं आम्ही ठरवलं. त्यामुळे सार्वजनिक शाळेत पाठवण्याइतकेच पैसे पालकांना सडबरी व्हॅलीत पाठवण्यासाठी द्यावे लागणार होते. आम्ही यशस्वी झालो असतो तर सार्वजनिक शाळांनाही आम्ही जे करतोय ते

त्यांनाही जमेल असं वाटू शकलं असतं. त्यांनीही आमच्यासारखी पध्दत अवलंबून मुलांचं शिक्षण सुकर केलं असतं. त्यामुळे आम्ही तुटपुंज्या मिळकतीवर, विनाअनुदानित तत्वावर शाळा सुरु केली.

प्रत्येक वर्षी वसंतऋतूत शाळा सुरु झाल्यावर शाळेच्या मीटींगमध्ये बजेट सादर करण्यात यायचं. त्याची पध्दत सोपी पण काटेकोर होती. त्याला आर्थिक भाषेत 'झिरो बेस्ड बजेटिंग' म्हणलं जातं. प्रत्येक कारकून, समिती आणि कॉर्पोरेशन स्वतःची सगळी कामं परत एकदा नीट तपासायचे आणि वर्षभ़र काय करणार आहेत ते ठरवायचे. मग त्याला किती खर्च येणार ते ठरवून शाळेच्या मीटींगमध्ये ते अंदाजपत्रक मांडायचे. मग त्यांच्या मागण्या बजेटच्या अनेक मीटींग होऊन त्यामध्ये तपासल्या जायच्या. त्यांच्या गरजेपेक्षा जास्त रक्कम मिळालीय असं कधीच व्हायचं नाही. पण शाळा सुरु झाल्यावर काही वर्षांनंतर त्यांच्या मागणीपेक्षा त्यांना कमी रक्कम मिळालीय असं होणंही बंद झालं.

सुरुवातीला या सगळ्या घडामोडींना सहा आठवडे लागायचे. आता मात्र कोणतेही अडथळे न येता ही पध्दत चालते. या सगळ्याचे परिणाम फार चांगले होत होते. उदाहरणार्थ, १९६९-१९८४ या १५ वर्षांच्या काळात अमेरिकेतल्या मध्यमवर्गीयांच्या रहाणीमानाचा खर्च तिप्पट झाला. देशभरात शाळांची फी सुमारे चारपट वाढली.

सडबरी व्हॅलीमध्ये मात्र त्याच काळात बजेट दुपटीपेक्षा जरा कमीच वाढलं. त्याच काळात सार्वजनिक शाळांपेक्षा आमच्या शाळेची फीदेखील किंचित कमीच होती आणि खाजगी शाळांच्या तर तुलनेत आमची फी तर १/३च होती.

शाळेच्या मीटींगमध्ये आम्ही सर्व खर्चांना कठोरपणे कात्री लावल्यानं खर्च बरेच कमी झाले. याचं एक उदाहरण मला काय म्हणायचं आहे ते स्पष्ट करेल.

आमची शाळा एक दगडी इमारत होती. ती बर्फात उबदार राखण्यासाठी तेल वापरुन (स्टोव्ह) गरम केलेलं पाणी वापरलं जाई. या तेलाचा खर्च कमी ठेवणं याला आमच्याकडे सर्वात जास्त प्राधान्य होतं. १९६९-१९८४ हा काळ जरा त्रासाचा होता. ओपेकमुळे तेलावर नियंत्रण होतं. त्यामुळे तेलाच्या किमती सहापट वाढल्या. म्हणजे हीटींगच्या खर्चात कपात करण्यासाठी नवनवीन योजना आखणं आम्हाला क्रमप्राप्त होतं.

मग आम्ही थर्मोस्टॅट ७० (२१ सेल्सिअस) डिग्रीवरुन ६५ (१८ सेल्सिअस) डिग्रीवर नेले. मग ६३ (१७ सेल्सिअस) डिग्रीला नेले. आम्हाला सगळ्यांना ६३ (१७ सेल्सिअस) ड्ग्रिी हे तापमान योग्य वाटत होतं. नंतर आम्ही ख्रिसमस आणि त्यानंतरचे दोन आठवडे आणि फेब्रुवारीत एक आठवडा शाळा बंद ठेवली. आणि हवामान उबदार असताना शाळेचे दिवस वाढवले. तसंच आम्ही जे स्वयंचलित थर्मोस्टॅटस् आणले ते रात्री आणि शनिवार रविवारी तापमान आपोआप कमी ठेवायचे. त्याला इंधन कमी लागायचं. तसंच आम्ही जास्तीत जास्त इन्सुलेशन वापरलं आणि कमी तेल जाळणारा अत्याधुनिक दिवा आणला. या सगळ्याचा परिणाम म्हणून या पंधरा वर्षांच्या काळात तेलाची किंमत सहापट वाढली असताना आमची तेलाची बिलं दुपटीपेक्षा किंचित जास्त झाली इतकंच!

आमच्या दैनंदिन खर्चाला ही कथा सगळीकडेच लागू पडते. मात्र असंही नव्हतं की आम्ही पैसे खर्चच करत नव्हतो. आम्ही एखादा आत्ता आवश्यक असणारा खर्च नंतर जर पैसे वाचवणार असेल तर गरज असेल तिथे खर्च नक्कीच करायचो.

आम्ही शाळा सुरु केल्यावर अनेकांचं म्हणणं होतं लोकशाही पध्दतीनं तुम्ही शाळेत शिस्त आणि शाळेच्या पध्दती लावाल. पण आर्थिक पातळीवर मात्र असं चालणार नाही. पैशाच्या तुटवड्यामुळे तुमची शाळा लवकरच बंद पडेल.

ते अर्थातच चूक ठरलं! आमच्याकडच्या पध्दतींमुळे लहानथोर सगळेच शाळा यशस्वीरीत्या चालेल आणि आर्थिक पातळीवर स्थिरावेल यासाठी झटत असत. खर्चाला कात्री लावणं या या एका विषयावर शाळेत जेवढी एकजूट होती तितकी दुसऱ्या कोणत्याच बाबतीत नव्हती.

धर्म, इतिहास, मुलांच्या परीकथा यात सतत कंदिल, गुहा, पाषाण इ. ठिकाणाहून लोकांच्या गरजा कशा पूर्ण झाल्या याच्या सुरस चमत्कृतीपूर्ण कथा सापडतात. सडबरी व्हॅलीमध्येही बजेट हा एक असाच चमत्कार होता. दरवर्षी आम्ही एक जादुई बजेट अनुभवायचो. आमच्या सगळ्या गरजा उपलब्ध असलेल्या पैशातून पूर्ण व्हायच्या.

मात्र शाळेतला सर्वात मोठा चमत्कार म्हणजे आमचा स्टाफ!

३० स्टाफ

शाळा सुरु झाल्यावर पहिल्या वर्षी १२ जण एकही पैसा न घेता काम करत होते. १२ लोक हं.. एकदोघं नव्हेत!

शाळा सुरु करायच्या आधी आम्ही एकमेकांना ओळखतही नव्हतो. आम्ही कोणत्याही राजकीय चळवळीतले किंवा सामाजिक कार्यातले सहकारी नव्हतो. 'शैक्षणिक आदर्श ठरेल अशी शाळा सुरु करणं याचं ध्येय' हाच आमच्यातला समान धागा होता.

१९६७ मध्ये प्रथम काही लोकांसमोर आम्ही फाऊंडर मेंबर्सनी सडबरी व्हॅलीचा प्रस्ताव मांडला. त्यातले सुमारे १०० जण शाळेच्या ध्येयानं प्रेरित होऊन शाळेत काम करायला तयार झाले. पुढे त्यातले १२ जण टिकले. आमच्या पगाराला शाळेकडे पैसे नसणार याबाबतीत आमच्या मनात काहीच शंका नव्हती.

त्यानंतर शाळा सुरु झाल्यावर पहिल्या वर्षी स्टाफसाठी ज्या पध्दती ठरल्या त्या आजही तशाच राबवल्या जातात. पहिलं म्हणजे नाव – द स्टाफ. याबद्दल आम्ही बरीच चर्चा केली. शाळेत शिक्षक, व्यवस्थापक, सेक्रेटरी, सफाई कामगार असे सर्वजण असतात. निरनिराळ्या पदांवर अनेक लोक असतात आणि शैक्षणिक जगात त्यांची एक उतरंड असलेली वर्गव्यवस्था असते.

अशी वर्गवव्यवस्था आम्हाला पूर्ण नामंजूर होती. आमच्याकडच्या कामाचं एकच स्वरुप होतं ते म्हणजे - सडबरी व्हॅली स्कूलच्या कल्पनेला धरुन जे काही पडेल ते– तसं काम करायला तयार असणारे लोक आम्हाला हवे होते. त्यात सगळं आलं. आम्ही सर्वचजण शाळेचा स्टाफ होतो. स्टाफ हे एकच नाव सगळ्यांना होतं. आमचं काय काम आहे वगैरे त्यावरुन कळत नसे. आम्हाला तसं कळायला नकोच होतं.

आम्ही शाळेत किती वाजता आलो त्याची नोंद करायला घड्याळं नव्हतीच. आम्ही लवकर यायचो, शाळा संपेपर्यंत थांबायचो आणि शाळा संपल्यानंतरही उरलं असेल ते काम संपवायचो. सुरुवातीला रोज संध्याकाळी ज्या काही समस्या असतील त्या कशा सोडवायच्या यावर एक स्टाफ मीटींग असायची. नंतर नंतर आम्ही आठवड्यातून किंवा महिन्यातून एक दोन वेळा गरज असेल तेव्हाच मीटींगसाठी भेटायचो.

आम्ही पैसे घेत नव्हतो. मात्र सुतारकाम, बागकाम, सेक्रेटरीचं काम, शिक्षक अशा सगळ्यांना सगळ्या कामाचे पैसे द्यायचो.

पैशाचं एक झालं. पण मुलांनी मागितल्याशिवाय त्यांना काही द्यायचं नाही हा मोठा धडा आम्ही स्टाफमधले लोक सडबरीत शिकलो. कोणत्याही वयाच्या मुलांच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांच्याकडे फार लक्ष द्यायचं नाही हेही आम्ही शिकलो. तो मात्र शिकायला अवघड धडा होता. स्वतःला शिस्त लावणं त्याबाबतीत कठीण गेलं. आमच्या संस्थापकांपैकी एकजण हॅना ग्रीनबर्ग हिनं त्याचं वर्णन केलंयः

*द आर्ट ऑफ डुईंग नथिंग*

*“ तुम्ही कुठे काम करता ? ”*

*“ सडबरी व्हॅली शाळेत”*

*“ काय करता”*

*“ काहीही नाही.. ” अशी प्रश्नोत्तरं आमच्यात आणि बाहेरच्या जगातल्या लोकांमध्ये सतत चालत.*

*आम्हाला सर्वांना सडबरी व्हॅलीमध्ये ‘ काहीही न करण्यासाठी’ प्रचंड शक्ती, शिस्त आणि अनेक वर्षांचा अनुभव लागला. दरवर्षी माझ्यात सुधारणा होत गेली. मी आणि माझे सहकारी मुलांसाठी काहीतरी करण्याच्या आतून उसळणाऱ्या उर्मीसोबत कसे संघर्ष करतायत ते बघताना मी अचंबित होत होते. मुलांसाठी काही तरी करावं, त्यांना ज्ञान आणि तुम्ही अनुभवातून शिकलेलं शहाणपण द्यावं असं वाटण्याची प्रबळ इच्छा आणि दुसरीकडे मुलांना स्वतःच्या गतीनं आणि इच्छेनं शिकायला हवं असणं यातला तो संघर्ष होता. त्यांना हवा असेल तेव्हा ते आमचा वापर करत. आम्हाला हवा असेल तेव्हा नव्हे! आम्ही ठरवल्यावर आम्ही त्यांच्यासाठी उपलब्ध असायची गरज नव्हती तर त्यांनी विचारलं तर आम्ही असायला हवे होतो. हे आमच्या हळूहळू लक्षात येत गेलं.*

*जगातल्या सर्वच संस्कृतींमध्ये मुलांना शिकवणं, प्रेरणा देणं आणि सल्ला देणं हे सर्व मोठ्या माणसांचं नैसर्गिक कर्तव्य समजलं जातं. तसं नसतं तर नवीन पिढीला अनेक गोष्टी स्वतःच शोधाव्या लागल्या असत्या.. म्हणजे अगदी चाकापासून टेन कमांडमेंटस् पर्यंत, धातूकामापासून शेतीपर्यंत! माणसांनी लहान मुलांना घरी, समाजात, कामाच्या ठिकाणी आणि शाळेतही पिढ्यानपिढ्या त्यांच्याकडचं ज्ञान देणं अपेक्षित असतं. दुर्दैवानं आजकालच्या शाळा जितकं मुलांकडे वैयक्तिक लक्ष देतात तितकं जास्त त्या मुलांचं नुकसान होतं हे पालकांना, शिक्षकांना कळत नाही. हे वाक्य विषद करुन सांगायची गरज आहे कारण मी आधी जे वाक्य लिहिलंय – ‘ मोठी माणसं लहान मुलांना जगात वागावं कसं हे शिकवायला मदत करतात’ - त्याच्याशी हे माझं नंतरचं जुळत नाही. पण माझ्या अनेक वर्षांनंतर लक्षात आलं की मोठ्यांनी अपेक्षा किंवा कल्पनाच केली नसेल असे निर्णय मुलं स्वतःचे स्वतः उत्तम प्रकारे घेतात. त्यातूनच मी हे वाक्य लिहिलंय.*

*आता मी काहीच करायचं नाही असं स्वतःला शिकवतेय आणि माझं काम सुधारत चाललंय. आमच्याकडे स्टाफ वाजवीपेक्षा जास्त आहे असा याचा अर्थ कृपया काढू नका. कारण जर शाळा मुलंच चालवत असतील तर मग नुसतं*

*बसून रहाणाऱ्या इतक्या स्टाफची काय गरज आहे असं तुम्हाला वाटेल. मात्र यातलं वास्तव असं आहे की मुलांना आणि शाळेला आमची गरज आहे. वैयक्तिकरीत्या मुलं आणि एक संस्था म्हणून शाळा कशी वाढतेय हे पहाण्यासाठी आम्ही आहोत.*

*स्वतःला वळण लावणं, विचारांना दिशा देणं, नुसताच टाईमपास करण्यापेक्षा आयुष्य जगणं हे नैसर्गिक असलं तरी मुलांनी स्वतःचं स्वतः करावं हे आपल्या संस्कृतीत बसत नाही. मनाच्या त्या पातळीवर पोचण्यासाठी मुलांना एक वातावरण हवं असतं – एक कुटुंब हवं असतं. घरातलं न्यूक्लिअर कुटुंब नव्हे तर वसुधैव कुटुंबकम या वृत्तीतलं कुटुंब! त्यात त्यांना सुरक्षितता आणि सहाय्य हवं असतं. स्टाफ हा त्यांच्याकडे लक्ष देणारा, काळजी घेणारा असला पण त्यांना दिशा दाखवणारा आणि सक्ती करणारा नसला तर मुलांना त्यांचा आतला आवाज ऐकता येण्याचं धैर्य प्राप्त होतं. इतर कोणत्याही मोठ्या माणसाप्रमाणेच त्यांना मार्गदर्शन करायला आम्ही लायक आहोत हे आमच्याकडच्या मुलांना माहिती होतं. पण आम्ही शिकवताना असं मार्गदर्शन न करण्याचं साधन आम्ही वापरल्यामुळे ती मुलं भोवतालचं रटलेलं वास्तव ऐकण्याऐवजी स्वतःचा आतला आवाज ऐकायला शिकली.*

*आम्ही मुलांना काही न सांगायचा घेतलेला निर्णय हा त्यांना आमच्यात काही कमी आहे किंवा एखादी पोकळी जाणवणं असा वाटला नाही. आमच्या मार्गदर्शनामुळे नव्हे तर मदतीमुळे त्यांना स्वतःचा मार्ग शोधण्याची प्रेरणा मिळत गेली. हवं ते करायचा मार्ग शोधण्यासाठी  करायला धैर्य आणि कष्ट लागतात.  ते आमच्या मुलांनी केले. हे काही स्टाफनं एकटं निवांत बसून झालं नव्हतं तर स्टाफनं कष्टानं एक पध्दत तयार केली आणि ती सातत्यानं अंमलात आणली त्यातून हे साध्य झालं होतं.*

पहिल्या वर्षी ऊनपावसाचे तडाखे खाऊन आम्ही तयार झालो होतो. मग आम्ही वर्ष क्रमांक २ बद्दल बोलायला भेटलो. अर्थात एका वर्षापूर्वी होते त्यापेक्षा फार पैसे आमच्याकडे नव्हते. “आपण अजून एक वर्ष पगाराशिवाय काम करु शकतो.” एकजण म्हणाला. “नाही. पहिल्या वर्षी एक धाडस म्हणून ठीक होतं. दुसऱ्या वर्षी ती ओढाताण होईल.” दुसरा म्हणाला.

त्याचं बरोबर आहे हे आम्हाला कळत होतं. विनामोबदला माणसांची मदत घेत बसणं यात काहीच अर्थ नव्हता. कष्टाच्या पैशांनी प्राप्त होणाऱ्या आत्मसन्मानावर/प्रतिष्ठेवर आमचा सर्वांचाच विश्वास होता. लोकांना त्यांच्या कामाचे पैसे मिळायलाच हवे होते. हे द्वंद्व काही  सुटेलसं वाटत नव्हतं. आम्हाला योग्य तो पगार मिळावा हे खरं असलं तरी तो द्यायला पैसे नव्हते. पण मग एका मिनिटात त्याचं उत्तर मिळालं. आम्ही शाळेसोबत कॉन्ट्रॅक्ट करायचं ठरवलं. त्यात शाळेनं आम्हाला पैसे द्यायचे नव्हते, पण ती आमचं देणं लागत होती. जेव्हा जास्त बजेट असेल तेव्हा ते देणं फिटेल.

हा आमचा सॅलरी फंडिंग प्लॅन कायद्याच्या भाषेत आणायला एखाद्या मध्ययुगीन तत्वज्ञाला बरेच प्रयास करावे लागले. पण योजना अगदी साधी होती. सगळ्या गरजा भागल्यानंतर स्टाफचे पैसे दिले जातील. जे पैसे दिले जाणार नाहीत ते शाळेकडे अनिश्चित काळासाठी शाळेकडे कर्ज म्हणून रहातील.

याचा परिणाम म्हणून शाळेच्या दुसऱ्या वर्षी स्टाफच्या घरी शंभराच्या पटीत पगार गेला. पंधराव्या वर्षी बजेटनुसार आम्ही १२००० डॉलर्स पगारापोटी देऊ शकलो. त्यानंतर मात्र तो आकडा आता वाढत चालला आहे.

१९७५ मध्ये 'न्यू इंग्लंड असोसिएशन ऑफ स्कूल्स अँड कॉलेजेस्'ची एक समिती पहिल्यांदा सडबरी व्हॅली स्कूलमध्ये मान्यताप्राप्ती देण्यासाठी आली. सुरुवातीला आम्ही काय करतो आहोत ते समजावून घेणं त्यांना फारच जड गेलं. अनेक खाजगी शाळांतले नामवंत सदस्य त्या समितीत होते. त्यांचा शाळेला मान्यता देण्याचा अनुभव आमच्याकडे ते जे काय ते बघत होते त्यासाठी उपयोगी पडत नव्हता. शाळेच्या सुरुवातीपासून मान्यता मिळणं आम्हाला महत्वाचं वाटत होतं. त्याचं कारण म्हणजे आमच्या मार्गात आम्हाला यश मिळण्याइतकंच शैक्षणिक जगात स्वीकृती मिळणं आम्हाला गरजेचं वाटत होतं.

त्यामुळे 'न्यू इंग्लंड असोसिएशन ऑफ स्कूल्स अँड कॉलेजेस्' या समितीनं आमच्याकडे यावं म्हणून आम्ही बरेच प्रयत्न केले होते. सुरुवातीला आमच्या विनंत्यांकडे त्यांनी दुर्लक्ष केलं. त्यांना वाटत होतं की ते प्रतिसाद देत नाहीत हे पाहून आम्ही इतर शाळांप्रमाणे गप्प बसू. पण आम्ही त्यांच्या खनपटीलाच बसलो. शेवटी त्यांना यावंच लागलं.

एके दिवशी मी त्या समितीच्या चेअरमनसोबत आमच्या मुख्य इमारतीतून चाललो होतो. आमच्या जुन्या पण सुंदर इमारतीकडे पाहून त्यांनी विचारलं "ही इमारत तुम्ही इतकी ठाकठीक कशी ठेवलीय? हे छप्पर चांगल्या अवस्थेत ठेवायलाच कितीतरी पैसे लागले असतील ना?"

"शाळा चालवायला जे काय लागेल ते करायचं असं आम्ही ठरवलंय." मी उद्गारलो. मग त्यांनी विचारलं "पण पैसे कुठून येतात? " या त्यांच्या प्रश्नावर मी म्हणालो "आमच्या स्टाफच्या पगारातून येतात. शाळेच्या गरजा आधी मग उरलेले पैसे स्टाफला मिळतात यावर आमचं अगदी एकमत आहे. "

"हाच आपल्यातला फरक आहे." ते जरा विषादानं म्हणाले. "आमच्या शाळेत काहीही असलं तरी स्टाफच्या गरजा आधी भागवल्या जातात. छप्पर तुटलं, इमारत कोसळली – तरी ती 'माझी' समस्या असते. आमच्या सगळ्यांची नव्हे. सडबरी व्हॅली या संस्थेत स्टाफची जी काही निष्ठा आहे ती वादातीत एकमेव आहे." आम्हाला मान्यता देण्याबाबतीत त्या समितीचं एकमत झालं हे वेगळं सांगायलाच नको.

शाळेत पडणारं काम, पगाराची अनिश्चितता, सगळ्या बाबतीत धाकधूक असं असलं तरी आमच्याकडचा स्टाफ वर्षानुवर्षं टिकून राहलाय इतकंच नव्हे तर त्यात ताज्या दमाच्या तरुणांची भरही पडते. यावर धाकधूक कशाची ? असं तुम्ही विचाराल. त्याचं कारण सडबरी व्हॅलीत नोकरीची शाश्वती नाही. शाळेच्या मीटींगमध्ये शाळा चालवायला स्टाफ नियुक्त केला जातो. दरवर्षी वसंतऋतूत पुढच्या वर्षीच्या स्टाफच्या निवडीसाठी निवडणूका घेतल्या जातात. ज्यांना स्टाफ म्हणून काम करायचंय ते नोंदणी करतात. शाळेच्या मीटींगमध्ये स्टाफच्या गरजांबद्दल प्रदीर्घ चर्चा होतात. सगळ्या उमेदवारांना संधी दिली जाते. निवडणूकीच्या दिवशी सगळ्यांना गुप्त मतदान करायला परवानगी असते. त्यामुळे आपण निवडून येऊ का नाही याची सगळ्यांना धाकधूक असते.

कधीकधी एखादा स्टाफ सदस्य निवडणूकीत हरतो. अनेकवेळा नवीन उमेदवार निवडून येतात. नवीन आणि जुन्याचा संगम स्टाफमध्ये दिसून येतो.

याची गोळाबेरीज म्हणजे आज शाळा सुरु झाल्यानंतर २० वर्षांनी सुरुवातीच्या १२ जणांच्या स्टाफपैकी ६ जण अजूनही टिकून आहेत. त्यातल्या गेलेल्या सहापैकी एक जण निवृत्त झालाय, दोन निवडणूकीत हरल्यामुळे गेले आणि उरलेले तिघे दुसरीकडे गेले.

आमच्याकडे स्टाफ म्हणून वेगवेगळ्या क्षेत्रातले बुध्दिमान आणि हरहुन्नरी लोक आहेत. पी एच डी झालेले, पदवीधारक, कलाकार, बुध्दिवंत, व्यावसायिक असे अनेक प्रकारचे लोक आमच्याकडे आहेत. तरुण, म्हातारे, स्त्रिया, पुरुष सर्वजण आहेत. आमच्याकडे शिकलेले लोकही आमच्याकडे स्टाफ म्हणून परतल्याची उदाहरणं आहेत. असलेल्या स्टाफच्या जोरावर पाचपट स्टाफ असता तर झाली असती तितकी कामं होतात.

इतकं जोमानं काम करत असलो तरी १९६८ पासून आम्ही कोणत्याही राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक संघटनेत कधीच एकत्र आलेले नव्हतो. आम्हाला जोडणारा समान धागा एकच होता आणि आहे, तो म्हणजे आमचं 'सडबरी व्हॅली समृध्द झालेली पहाणं' हे ध्येय!

## ३१ लिटिल किडस

ऑफिसमधला फोन वाजतो. आठ वर्षांचा डेबल तो घेतो आणि म्हणतो "सडबरी व्हॅली स्कूल, मी तुम्हाला काय मदत करु शकतो?" दुसऱ्या बाजूला क्षणभर शांतता पसरते. फोन करणारा माणूस लहान मुलाचा आवाज ऐकून साशंक स्वरातच शाळेची माहिती विचारतो. "एक मिनिट हं.. " डेबल म्हणतो. मी कुणालातरी बोलावतो. एका मिनिटात तो स्टाफच्या एका सदस्याला शोधून फोनवर बोलायला सांगतो. फोन संपतो. पण एकाही विशिष्ट शब्दाची देवाणघेवाण न होता फोन करणाऱ्याला सडबरी व्हॅली स्कूलमध्ये सर्वजण, अगदी लहान मुलं देखील समान पातळीवर आहेत हे लगेच लक्षात येतं.

तिकडे सहा वर्षांची चार मुलं मार्गारेटसोबत स्वयंपाकघरात कुकीज बनवत असतात. सावकाशपणे कुकीज बनवणं एकदाचं पूर्ण होतं आणि त्या खाण्यासाठी स्वयंपाकघरात एकच दंगा उसळतो.

"आता हे सगळं स्वच्छ करुयात" मार्गारेट निश्चयी सुरात म्हणते. तिचा नौदलातला अनुभव वाया जाणार नसतो.

मग कुकीज बनवणारे सगळे गोळा होतात. ॲलिस एक खुर्ची घेऊन बेसिन शेजारी ठेवते. त्यावर उभी रहाते. आणि मॉलीने आणून दिलेली भांडी घासते. जेकब आणि एरिक टेबल पुसून घेतात, फरशी पुसतात.

"ते फडकं आण जरा.." मार्गारेट सांगते. एरिक मग फडकं घेऊन जरा घाण राहिलेल्या कोपरा झाडायला/पुसायला जातो. जेकब त्याच्यामागून केर उचलायला जातो.

वीस मिनिटांनंतर कुकीज तर झालेल्या असतातच आणि स्वयंपाकघराची सफाईदेखील झालेली असते. त्या कामात सर्वांचा हातभार लागलेला असतो. ती मुलं लहान आहेत यासाठी त्यांना कामात काहीच सवलत दिलेली नसते.

आमच्याकडे आठ वर्षांची मुलं मोठ्या मुलांसोबतच इलेक्ट्रॉनिक टाईपरायटर वापरत असतात. मात्र जर (आणि हे मोठ्यांनाही लागू आहेच!) ते तो चालवायला शिकले असले आणि त्यांनी ते प्रमाणपत्र मिळवलेलं असेल तर! १० वर्षांची मुलं लाकडावर कोरीव काम करतात तर ९ वर्षांची मुलं मडकी बनवतात. सर्व वयाची मुलं नोबोस्कॉट पिझ्झा किंवा स्टेट पार्क किंवा जवळच्या गोल्फ कोर्सवर फिरायला जातात.

पारंपारिक शिक्षणपध्दतीत जखडलेल्या अनेकांकडून विचारल्या जाणाऱ्या एका प्रश्नांशी आम्ही आजवर झगडतोय. ते प्रश्न म्हणजे "लहान मुलांना विशिष्ट वागणूक द्यावी लागत नाही का? ती शाळेच्या मीटींगचे सभासद असतील त्यांना मतदानाचा हक्क असेल, त्यांना सगळ्यांसारखेच नियम लागू असतील. पण तरीही ती मुलं लहान म्हणून जरा स्पेशल नाहीत का? त्यांची जास्त काळजी घेण्याची गरज नाही का? "

शाळेच्या मीटींगमध्ये यावर तासनतास चर्चा चालायची. अनेक वर्षं हा विषय मीटींगमध्ये चालला होता. आम्ही त्यावर बराच शोध घेतला. पण एका वयाच्या मुलांना दुसऱ्या वयाच्या मुलांपेक्षा वेगळं वागवण्याची पध्दत काही आम्हाला सापडली नाही. आमची तत्वं आम्हाला तसं करु देत नव्हती आणि जगातलं वास्तव आमच्या तत्वांना मुरड घालायचा आग्रह करत होतं.

लहान आणि मोठ्या मुलांमधल्या अनेक फरकांना आम्हाला रोज सामोरं जावं लागत होतं. आमच्या शाळेत जरा जास्त वयात दाखल झालेल्या मोठ्या मुलांपेक्षा आधी लहान वयात दाखल होऊन आता मोठी असलेली मुलं फार स्वतंत्र मनोवृत्तीची, धाडसी, कल्पक, खूप काम करणारी आणि कामात जास्त गर्क असायची.

आमच्याकडच्या लहान मुलांना तर कधीच वेळ नसायचा. बोलायला, खायला, शांत बसायला काहीही करायचं झालं तर त्यांना वेळ नसायचा. ती चालायची बिलायची नाहीतच. कायम पळत असायची आणि घरी जाईपर्यंत ती कधीच थकायची नाहीत.

तसंच लहान मुलं थेट मोठ्यांच्या नजरेला नजर भिडवून मोकळेपणानं बिनधास्तपणे बोलायची. असं असलं तरी ती नम्र होती, त्यांच्यात आत्मविश्वास होता, ती बोलण्यात वाकबगार असायची. आमच्या शाळेला पहिल्यांदाच भेट देणाऱ्या मोठ्या माणसांचा या मुलांकडे पाहून, त्यांचं बोलणं ऐकून स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसायचा नाही.

"तुम्ही फक्त हुशार मुलांनाच प्रवेश देत असाल." असं ते म्हणायचे. "त्यामुळे ही मुलं इतकी बुध्दिमान आणि सळसळत्या उत्साहानं भरलेली आहेत." मग आम्ही सांगायचो "आमच्याकडे सर्वांना मुक्त प्रवेश आहे. कोणीही येऊ शकतं. कोणीही येतं." पण ऐकणाऱ्याला साधारणतः वाटतं की "आम्ही थापा मारतोय. असं वागणारी मुलं सर्वसामान्य मुलं कशी असतील?"

एक गोष्ट माझ्या लक्षात आलीय. ती म्हणजे ही लहान मुलं इतरांसाठी जे काय करतात ती त्यांच्यातली सर्वात सुरेख गोष्ट आहे.

'पॉन्स द लिऑन'नं स्वतःचं आयुष्य उगाचच 'फाऊंटन ऑफ यूथ' शोधण्यात घालवलं. त्यानं इतके कष्ट करण्याची काहीच गरज नव्हती. त्यानं फक्त लहान मुलांसोबत थोडा वेळ काढायला हवा होता.

लहान मुलं एखाद्या रागीट माणसाला शांत करु शकतात किंवा एखाद्या भरकटलेल्या टीनएजरच्या ओठावर हास्यही फुलवू शकतात. आमच्या शाळेत टीनएजर्सना लहान मुलांच्या उत्साहाची आणि उर्जेची लागण होते. टीनएजर्स शाळेत आल्यानंतर काही वेळातच लहान मुलांना वाचून दाखवतायत, त्यांच्याबरोबर काम करतायत, खेळतायत असं चित्र दिसायला लागतं. आमच्याकडच्या जुन्या-जाणत्यांना त्यांचं हे वागणं अपेक्षितच असतं.

लहान मुलांसाठी लिहिलं गेलेलं सर्वात प्रसिध्द पुस्तक म्हणजे 'विनी द पू' याचा लेखक ए.ए.म्लाईन यानं त्याच्या आत्मचरित्रात लिहिलंय "हे पुस्तक लिहिण्याआधी आणि नंतर त्यानं लहान मुलांसाठी कधीच पुस्तक लिहिलं नाही." त्यानं हे पुस्तक जरा जास्त पैसे मिळवण्यासाठी एक प्रयोग म्हणून लिहिलं होतं आणि लहान मुलांसाठी लिहिण्याचा अनुभ़व नसल्यानं त्यानं त्याचा वाचकवर्ग प्रौढ माणसं असतील असं गृहीत धरुन त्यांना आश्चर्य वाटेल अशा पध्दतीनं त्यानं ते लिहिलं याची आपण नोंद घ्यायला हवी. हे पुस्तक लगेच लोकप्रिय झालं आणि ते कायमच बेस्ट सेलर आहे. मी सुध्दा आठ वर्षांचा असल्यापासून आजतागायत मध्ये काही वर्षं गेल्यानंतर ते परत वाचतो. माझ्यात दडलेल्या लहान मुलाला ते आवडतं तसंच मुलांच्या मनात दडलेल्या मोठ्या माणसाला ते पुस्तक मोह पाडतं.

मला वाटतं सडबरी व्हॅली शाळांमधलं विनी द पू आहे. जिथे आम्ही लहान मुलांना मोठ्या माणसांसारखं वागवतो आणि शाळेतलं वातावरण आमच्यासारख्या कालमानानुसार मोठ्या झालेल्यांच्या मनातलं लहान मूल जिवंत ठेवतं!

३२ गुड किडस् अँड ट्रबलमेकर्स

हे झालं लहान मुलांचं पण मोठी मुलं हा एक वेगळाच किस्सा आहे. ती आमच्याकडे वेगवेगळ्या ठिकाण़ाहून येतात आणि आमच्यासमोर अवघड आव्हानं ठेवतात.

टीनएजर्सपैकी काही जण पहिल्यापासून आमच्याकडेच शिकलेले असतात. काहीजण मात्र इतर शाळांमधून आमच्याकडे आलेले असतात. अशा प्रकारे दुसऱ्या शाळेतून आलेली मुलं दोन गटात मोडतात. एक तर दुसरीकडे जी यशस्वी (ए ग्रेडची) असतात पण आनंदात नसतात आणि दुसरा प्रकार म्हणजे ज्यांनी आधीच्या शाळेशी युध्दच (ट्रबलमेकर्स) पुकारलेलं असतं. कधीकधी दोन्ही प्रकार एका मुलातच सापडायचे. काही बाहेरुन आलेली मुलं ए ग्रेड वाली असली तरी शिक्षकांना भयंकर सतावून आमच्याकडे आलेली असायची.

ए ग्रेड आणि ट्रबलमेकर्स यात तुम्ही कोणत्या गटातली मुलं निवडाल? याचं उत्तर आम्ही शोधायला लागल्यावर आलेल्या अनुभवांमधून आम्हाला काही वेगळेच धडे मिळाले. उदाहरणार्थ, सॅम सडबरीमध्ये आला तेव्हा १६ वर्षांचा होता. त्याचा जगाशी संबंध तुटलेला होता. सुमारे एक वर्ष तो सिगारेटच्या धुक्यात काहीच न करता बसलेला असायचा. त्याला पुढे कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल याची त्याला ओळखणाऱ्यांना चिंता वाटायची.

पण काही काळानंतर सॅम स्वतःच स्वतःचा शांत झाला आणि आयुष्याबद्दल विचार करायला लागला. दुसऱ्या वर्षाच्या शेवटी तो आमच्याकडे ग्रॅज्युएट होऊन दुसऱ्या कॉलेजमध्ये गेला. दुर्मिळ खड्यांची आयात करण्यापासून अनेक धाडसी प्रकार त्यानं केले. शेवटी चिरोप्रॅक्टिक मेडिसिनच्या कॉलेजमध्ये जाऊन तो आता एक प्रख्यात चिरोप्रॅक्टर म्हणून नाव कमावून आहे.

सडबरी व्हॅलीत येण्याआधी सॅम हा सगळ्या शाळांमध्ये बदनाम होता. मात्र आमच्यासोबत अगदी पहिल्या वर्षापासून तो चांगलं वागायचा. नंतर त्याच्या डोळ्यातली चमक त्याला परत लाभल्यानंतर त्यानं आमच्या शाळेत अनेक सुधारणा सुचवल्या. इतर विद्यार्थ्यांना मदत केली.

दुसरा १४ वर्षांचा रॉबर्ट हाही अतिशय बंडखोर म्हणून बदनाम होता. त्याला दारुचं व्यसन होतं आणि जगातल्या सर्व मोठ्या माणसांशी भांडण होतं. त्याला ओळखणारे सर्वजण त्याचं आयुष्य कठीण आहे आणि ते लवकरच संपेल याची ग्वाही देत असत.

त्यानं त्याचं आयुष्य घडवत आमच्याकडे चार वर्षं काढली. जसजशी वर्षं पुढे गेली तसतसा तो स्वतःला व्यक्त करायला आणि बोलायला शिकला. कधीकधी आश्चर्य वाटावं इतकावेळ तो स्वतःविषयी बोलत असे. मग तो हळूहळू वाचायला, खेळायला लागला. त्याला चांगलं वाटायला लागलं. त्याचं भविष्य उज्वल आहे असं त्याला वाटायला लागलं. मग स्वतःच्या शरीराचे हाल करणं कमी करुन त्यानं प्रकृतीस्वास्थ्य कमावलं. दारु सोडली.

रॉबर्ट आमच्याकडून सोडून पुढे गेला तोपर्यंत त्यानं एकूण लोकांना मदत करायचं आणि त्यासाठी पॅरामेडिकल क्षेत्रात काम करायचं हे आयुष्याचं ध्येय निश्चित केलं होतं. खूप शिकून तो पॅरामेडिक रेस्क्यू पथकाचा मुख्य बनला. नंतर मग तो एका नर्सिंग कॉलेजमध्ये जाऊन तो प्रशिक्षित नर्स बनला.

शाळेत रॉबर्ट कायम उल्हसित, मोकळाढाकळा असा असायचा. वर्षामागून वर्षं गेली तसा कोशातून बाहेर येऊन तो मैत्रीपूर्ण आणि मिळूनमिसळून वागणारा झाला. आमच्यासाठी तो कधीच त्रासदायक ठरला नाही.

वर्षं आली, वर्षं गेलीः समाजातली उपेक्षित, दुर्लक्षित, समाजानं ज्यांच्यात सुधारणा होणं शक्य नाही म्हणून टाकून दिलेली मुलं आमच्याकडे आली/गेली. कार चोरणारी, खोडकर, ड्रगचं व्यसन असलेली, शाळेची भीती असलेली, समाजाच्या चौकटीत न बसणारी, एकतर आधीच्या शाळेतून हाकललेली किंवा शाळेत जाणंच नाकारलेली असे मुलांचे सर्व प्रकार त्यात होते.

त्या सगळ्यांना सडबरी व्हॅलीमध्ये सारखीच वागणूक दिली जाई. त्यांना त्यांचं स्वातंत्र्य आणि स्वतःच्या आयुष्याची दिशा ठरवण्याची जबाबदारी पेलायची असे. ती त्या सर्वांनी आज-ना-उद्या घेतली. त्यातलं कोणीच आयुष्यात अयशस्वी ठरलं नाही.

लवकरच आमची ही कीर्ती सगळीकडे पसरली. स्वातंत्र्य, मोकळं वातावरण, मैत्रीपूर्ण वागणूक, सर्व वयाच्या लोकांनी एकत्र असणं यातून वास्तव जगाकडे मुलांची वाटचाल सोपी होत असे. शाळा सुरु झाली तेव्हाच्या काळात हे सगळं घडायला आणि लोकांपर्यंत ते पोचायला जरा वेळ लागला. पण एक दोन वर्षांनंतर आमच्याकडून बाहेर पडलेल्या टीनएजरच्या पिढ्याच आमच्याबद्दल बाहेर सांगायला लागल्या. नवीन मुलं त्यामुळे आमच्याकडे सहज येऊ लागली. मग त्यांची 'स्व'चा शोध घेण्याची प्रक्रिया त्यांच्या आयुष्यात लवकर चालू होऊन तिला भराभर गती मिळायला लागली.

याबाबतीतलं पराकोटीचं उदाहरण म्हणजे स्टेला. १४ वर्षांच्या स्टेलाला तिच्या आधीच्या शाळेतले लोक इतके वैतागले होते की सडबरी व्हॅली या शाळेत तिला पाठवल्यानंतर (राज्याच्या कायद्याविरुध्द जाऊन) आमच्याकडची

तिची फी भ़रायची देखील त्यांची तयारी होती. तिच्यापासून त्यांना त्वरित सुटका हवी होती. ती आमच्याकडे आल्यानंतरही शहरातून दरवर्षी एक समिती येऊन आम्ही अस्तित्वात आहोत का ? आणि स्टेला आमच्याच शाळेत येते का ? हे बघत असे.

स्टेलाला इतरांपेक्षा थोडा जास्त वेळ सावरायला लागला. पण मग तिला 'स्व'चा शोध लागला. आमच्याकडून जायची वेळ आली तेव्हा स्टेला मानसशास्त्रात एम.ए. करणार होती आणि ती उत्तम लेखिका बनली होती.

आमच्यासाठी रॉबर्टस्, सॅम आणि स्टेलासारखी मुलं हा एक नमुना होता. मला आठवतंय, सुरुवातीच्या काळातल्या एका मीटींगमध्ये ए ग्रेडवाली मुलं इतरांबद्दल खवचटपणे तक्रार करत होती. ट्रबलमेकर्स मुलांनी या शाळेत राहूच नये असं ए ग्रेडवाल्यांचं म्हणणं होतं. "आम्ही सगळ्या मीटींग्जना येतो, दुसऱ्यांना शक्य तितकी मदत करतो; आम्ही तुम्हाला हवी तशी मुलं आहोत. आणि ते इकडेतिकडे फिरतात; काडीचं काम करत नाहीत. तर ते कशाला हवेत ?" असं ए ग्रेड वाल्यांचं म्हणणं होतं. यावर मी एक दीर्घ श्वास घेऊन म्हणालो "त्या मुलांना शाळा म्हणजे काय ते तुमच्यापेक्षा जास्त प्रमाणात माहिती आहे. आत्ता त्यांच्या आयुष्याशीच त्यांचा झगडा चाललाय, तेच काम त्यांना पुरेसं आहे. बाकीची कामं सुचणं त्यांना शक्य नाही. 'स्व'च्या शोधातून एकदा ते तावूनसुलाखून बाहेर आले की त्यांना काहीच प्रॉब्लेम नाही. इकडे तुम्ही मात्र इतरांसाठी जगताय. तुम्ही अजून इतरांना खुष ठेवण्याच्याच प्रयत्नात आहात आणि 'स्व'चा शोध घेण्याची, तुम्हाला काय हवंय ते शोधण्याची, त्याप्रमाणे पावलं टाकण्याची प्रक्रिया तुमच्या बाबतीत अजून सुरु देखील झाली नाहीये हे लक्षात घ्या."

खरं तर सडबरी व्हॅलीमध्ये ट्रबलमेकर्स मुलं जर त्यांच्या पालकांचा पाठिंबा असेल तर एखाददुसरा अपवाद वगळता सुरेख वागायची. त्याचं कारण तसं सोपं होतं. ते ट्रबलमेकर होते म्हणजेच आयुष्याशी झुंजणं त्यांनी सोडलं नव्हतं. इतरांनी त्यांना त्यांच्या व्यक्तिमत्वापेक्षा वेगळं वागायला लावण्याचा, वाकवण्याचा, बदलण्याचा आणि सर्वसामान्य चौकटीत बसवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्यांनी 'स्व'साठीचा लढा सोडला नव्हता. झगडण्याची त्यांच्यात उर्मी होती. ही उर्मी आधी विनाशकारक गोष्टींकडे वळत होती. पण हीच उर्जा त्यांच्या आशाआकांक्षा दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या जगातून बाहेर आली तर त्यांचं आयुष्य उभं करण्याकडे वळत होती. स्वतःच्या आयुष्याला प्रयत्नपूर्वक दिशा देणाऱ्या लोकांच्या समुदायातूनच एक चांगला समाज उभा रहातो. ट्रबलमेकर्स समजल्या जाणाऱ्या या मुलांनी आमच्या शाळेतल्या सगळ्याच लोकांचं आयुष्य सुधारायला नंतर मोलाची मदत केली.

दुर्दैव म्हणजे ए ग्रेड विद्यार्थ्यांचं कठीण होतं. त्यांच्या शिक्षकांना खुष करण्यात ते इतके गुंतलेले असत. आज कोणाला खुष करावं ? असा त्यांना प्रश्न पडे. बऱ्याचदा याचं उत्तर त्यांच्या आधीच्या शाळेतल्या अनुभवावरुन स्टाफला खुष ठेवावं असंच मिळे. पण हे आमच्याकडे चालत नसे. इथला स्टाफ त्यांना चांगल्या वर्तणुकीला आणि चांगल्या अभ्यासाला स्टार देणारा नव्हता. मग ते कुठे जाणार होते ? हे त्यांना जड जाई. इतर सर्वचजण त्यांच्यासारखेच हुशार, चतुर आहेत हा शोध लागणं त्यांच्यासाठी सोपं नव्हतं. त्यांच्या आधीच्या शाळेसारखं वर्गाचा मॉनिटर होण्यासाठी प्रयत्न करणं याला सडबरी व्हॅलीमध्ये काहीच अर्थ नव्हता. आमच्याकडे ग्रेड, दर्जा, गुणवत्ता ठरवणं हे प्रकारच नव्हते. त्यामुळे ए ग्रेड वाल्यांना आमच्याकडे सुरुवातीला जड जात होतं.

तर ज्यांना ट्रबलमेकर्स म्हणलं जाई ती मुलं वस्तुतः समाजाचे बळी ठरलेली मुलं होती. बाहेरच्या जगातल्या अधिकारशाहीशी अनेक वर्षं झगडल्यामुळे हळूहळू त्यांचं स्वतःशी नातं तुटलेलं होतं. त्यांच्या डोळ्यातली चमक हरवली होती आणि ओठांवरचं हास्य लोप पावलं होतं. आता आयुष्य कसं सांधायचं तेही त्यांना कळत नव्हतं. त्यांच्यासाठी स्वातंत्र्य पेलणंही कठीण होतं. त्यांनी पुढे काय करावं हे सांगणारंही आजूबाजूला कोणी नव्हतं.

त्यांच्या या स्थितीवरचे उपचार अवघड होते आणि त्या उपचारांना फार वेळ लागणार होता. बरं त्यांच्यावर नेहमीचेच उपाय चालणार होते असंही नाही. यावरचं नेहमीचं एक औषध म्हणजे कंटाळवाण्या दिवसांचा एक प्रदीर्घ डोस ! हे विद्यार्थी बऱ्याचदा काहीही न करण्याच्या एका अवस्थेत जायचे. हा कंटाळा, काहीही न करता रहाणं त्यांना सहन होणार नाही असा एक दिवस मग उजाडायचा. पण तो कधी उजाडेल हे मात्र ठरलेलं नव्हतं. तो काहीच न करायचा कंटाळा संपला की काहीतरी करायच्या तीव्र इच्छेनं ते झपाटले जात. स्वतःच्या आयुष्याची चौकट आखायला लागत असत. ट्रबलमेकर्सच्या बाबत हे आज ना उद्या घडायचंच! त्यांच्या आयुष्याची आम्हाला चिंता नव्हती. गुड, ए ग्रेड वाली मुलं हे सगळं कधी शिकणार हा खरा प्रॉब्लेम होता.

सडबरी व्हॅलीमध्ये सुरुवातीपासून असलेली आणि आता टीनएजर्स झालेली मुलं ट्रबलमेकर्स आणि गुड किडस् या दोन्ही प्रकारात बसत नाहीत. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून ती मुलं भाग्यवान असल्याचं ताबडतोब कळतं. घरी आणि जगात सगळीकडे त्यांच्या आयुष्याच्या ध्येयावरचं लक्ष विचलित होऊ न देता ते आयुष्यातले चढउतार समर्थपणे पेलू शकतात.

सर्वांगीण विचार केला तर आमची ध्येयं गाठण्यात आम्ही यशस्वी झालो, ती लढाई जिंकलो असं कायम म्हणता येत नाही. एका बाजूला लोक आमच्या विद्यार्थ्यांकडे पाहून म्हणतात "तुम्ही उत्कृष्ट विद्यार्थी निवडले आहेत. त्यामुळे त्यांना अशा प्रकारे मिळालेलं स्वातंत्र्य चालतंय. सामान्य मुलांसाठी हे उपयोगी पडलं नसतं." दुसरीकडे आमच्याकडे सर्वांना मुक्त प्रवेश या तत्वाखाली प्रवेश घेतलेल्या मुलांकडे पाहून लोक म्हणतात "दुनियेनं नाकारलेली मुलं इथे येतात. हे सामान्य मुलांसाठी योग्य वातावरण नाही." आमच्याकडे हुशार, मध्यम, सामान्य अशी सर्व मुलं शिकत असतात. त्यामुळे आम्ही सतत जिंकू शकत नाही. पण तरीही सगळ्यांना समानतेनं वागवणं, त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या घ्यायला शिकवणं, त्यांचं ओझं पेलायला शिकवणं याबाबतीत आमची जीत होते. या सातत्यात काही रहस्य, विशिष्ट उपचारपध्दत, वेगळं तंत्र नाही. आयुष्य जगायला लागणारी उर्जा सगळ्यांकडे आतूनच आलेली आहे. सडबरी व्हॅलीमध्ये फक्त ती उर्जा शोधायचं आणि वापरायचं स्वातंत्र्य त्यांना मिळतं इतकंच!

## ३३ पॅरेंटस्

अनेक शाळांना पालक ही कटकट वाटते. पालक सारख्या तक्रारी करतात, टीका करतात, वेळ खातात आणि सर्वात वाईट म्हणजे मुलांच्या शिक्षणात लुडबूड करतात असं त्यांना वाटत असतं.

मात्र सडबरी व्हॅलीत सुरुवातीपासूनच पालक हे आमचा अविभाज्य भाग होता. आम्हाला सडबरी चालवण्यात यशस्वी व्हायचं असेल तर मुलांच्या कुटुंबांचं संपूर्ण सहकार्य आम्हाला मिळायलाच हवं असं आमचं मत होतं. मुलांच्या शिक्षणाची पहिली जबाबदारी ही पालकांचीच असते. ते मुलांना जन्म देतात, या जगात आणतात. मुलांना स्वतंत्र आणि आत्मनिर्भर व्हायला शिकवणं हे पालकांचंच कर्तव्य असतं. शाळांचं अस्तित्व पालकांना या कामात

मदत करण्यासाठी असावं. वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्व देणाऱ्या आमच्या (अमेरिका) देशात तरी कमीत कमी ते असंच असायला हवं असं आमचं ठाम मत होतं..

मुलांचं अंतर्मन जाणून घेऊन त्यांचे कुटुंबीय वागत असतील आणि पालक  त्यांना त्याच पध्दतीत स्वातंत्र्य देऊन वाढवत असतील तर मुलांचं एक एकसंध व्यक्तिमत्व तयार होतं. दोन पिढ्यांमधलं द्वंद्व मुलं आणि पालक यांच्यात असतंच पण तसं पहायला गेलं तर पालकांना जर कॅन्सर आणि हृदयरोग असेल तर तो सुध्दा मुलांच्या जन्मासोबत त्यांच्यात आलेला असतोच. त्यामुळे दोन पिढ्यांमधलं द्वंद्व असलं तरी पालकांनी मुलांना जाणून घेऊन त्यांच्याशी वागायला हवं.

या विचारसरणीत काही इतर गोष्टी देखील आहेत. पालक मुलांची शाळेची फी भरतात. १७७६ च्या अमेरिकन राज्यक्रांतीच्या दरम्यान सुरु झालेली आपल्याकडे एक म्हण आहे 'नो टॅक्सेशन विदाऊट रिप्रेझेंटेशन'! या म्हणीनुसार पालकांना आमच्या शाळेत फी भरण्यासोबत इतरही कामं करावी लागतात. उदाहरणार्थ,  पालक मुलांना रोज शाळेत जायचा आग्रह करतात. त्यामुळे आमच्या शाळेत मुलं फारशी अनुपस्थित रहात नाहीत. पालक नेहमीच आमच्या टीमचा एक भाग असावेत याच दृष्टिकोनातून आम्ही शाळेची सुरुवात केली.

सडबरी व्हॅली स्कूल मध्ये पालकदेखील (विद्यार्थी आणि स्टाफ यांच्याप्रमाणेच) मतदानासाठी सदस्य आहेत. सदस्य हा शब्द मी मुद्दाम वापरतोय कारण आमची ना नफा ना या तत्वावर चालणारी संस्था असल्यामुळे त्यात शेअरहोल्डर्स वगैरे प्रकार नाही. सगळे सद्स्य मिळून शाळा चालवतात.

या सगळ्या सदस्यांच्या एकत्र येण्याला असेंब्ली म्हणतात. असेंब्लीतले सदस्य वर्षातून एकदा भेटतात आणि महत्वाच्या योजनांना मंजूरी देतात. शाळेची फी, शाळेच्या बजेटला मंजुरी देणं हे सगळं त्यात येतं. वर्षाच्या सुरुवातीला एकदा हे महत्वाचे निर्णय झाल्यावर शाळेच्या वेळोवेळी मीटींग होतात त्यातून दैनंदिन काम चालत रहातं.

आमच्या शाळेत पालकांना पालक म्हणून असलेल्या कायदेशीर हक्कांपेक्षा जास्त हक्क आहेत. उदाहरणार्थ, पालक त्यांच्या मर्जीनुसार शाळेत कधीही येऊ शकतात; आम्हाला कोणत्याही सूचना देऊ शकतात; आमच्या कामात कधीही दखल देऊ शकतात. तसंच वर्षभरात पालक-स्टाफ-विद्यार्थी एकत्र येतील असे बरेचसे समारंभ आम्ही आयोजित करतो. जेवणं, पिकनिक, लिलाव, नाचगाणी आणि अशाच प्रकारचे इतर अनेक कार्यक्रम चालू सतत असतात.

शाळेत मुलाचा प्रवेश घेण्यापासून पालकांचं शाळेची नातं सुरु होतं. १८ वर्षाखालच्या सर्व मुलांच्या पालकांनी - शक्य झालं तर दोन्ही पालकांनी – पहिल्या इंटरव्ह्यूला यावं असा आम्ही आग्रह धरतो कारण त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा ते एक अविभाज्य भाग असावेत असा आमचा सदोदित प्रयत्न असतो.

खरं तर पालकांची समजूत पटणं हा इंटरव्ह्यूतलं महत्वाचं ध्येय असतं. मुलांना वेगवेगळ्या मार्गानं तावून सुलाखून घेणं हा आमचा इंटरव्ह्यूतला मूळ उद्देश नसतो. तर आमचं शाळेमागचं तत्वज्ञान, आमच्या पध्दती सांगणं, पालकांच्या प्रश्नांना उत्तरं देणं, मुख्यत्वे आमच्यातल्या नातेसंबंधांचा पाया घालणं – असं इंटरव्ह्यूमध्ये तासनतास चालतं.

आमच्या १२ मूळ संस्थापकांपैकी ६ जण आमच्या शाळेतल्या मुलांचे पालकच होते. सडबरीच्या इतिहासात आमच्या स्टाफमधली मुलं बाहेरच्या शाळांमध्ये आहेत असं फारच क्वचित घडतं. अनेक पालक सडबरी व्हॅलीमध्ये इतके गुंतत जातात की अखेरीस ते स्टाफ होण्यासाठी निवडणूकीला उभे रहातात.

एकूण़च शाळेला आकार देण्यात पालकांचा सहभाग फार महत्वाचा ठरला. आमच्या शाळेत पालक एकत्र आल्यामुळे मॅसॅच्युसेटसमध्ये आधी एकमेकांना अनोळखी असणारे लोक एकमेकांना माहिती होतात, त्यांच्यातल्या समान आवडीनिवडी पकडून ते एकमेकांच्या संगतीत आनंदात रहायला लागतात.

या अर्थानं सडबरी व्हॅलीमध्ये प्रत्येक दिवस हा फॅमिली डे असतो. तो आम्हाला वेगळा साजरा करावा लागत नाही!

३४ व्हिझिटर्स

आमच्याकडे प्रत्येक दिवस हा व्हिजिटर्स डे देखील असतो. निदान असं आम्हाला तरी बऱ्याचदा वाटतं.

१९६० मध्ये मी जेव्हा शाळांचा अभ्यास करायला लागलो तेव्हा शाळा चालू असताना तिथे बाहेरच्या लोकांनी जाणं किती मुष्किल आहे ते पाहून मला धक्काच बसला. माझा धक्का अर्थात माझ्या समजुतीतून आला होता. मला वाटायचं बाहेरच्या जगातल्या लोकांसाठी शिक्षणक्षेत्रात पायघड्या घालत असतील आणि प्रत्यक्षात खाजगी शाळा तर सोडाच मुक्त शिक्षण देणाऱ्या शाळांचेही दरवाजे बाहेरच्या जगाला बंदच होते.

सडबरी व्हॅली मात्र इतरांसाठी जितकी खुली ठेवता येईल तितकी ठेवायची याबाबत आम्ही प्रचंड आग्रही होतो. आम्ही काय करतो आहोत ते लोकांनी पहावं, आमच्याशी वादचर्चा करावी, त्यातून आमचे विचार समजून त्यावर विश्वास ठेवावा असं आम्हाला वाटायचं. आम्हाला आमच्या कोशात दडून 'अशा प्रकारची एकमेव शाळा' हे बिरुद मिरवण्यात काहीच स्वारस्य नव्हतं. आमच्यासारख्या जितक्या शाळा निघतील आणि त्यातून जितकी आमच्या शाळा चालवण्याच्या योजनांमध्ये चांगली भ़र पडेल तितका आम्हाला आनंदच होता.

आमच्यासाठी शाळेला भेट देणारी माणसं हा जनसंपर्क साधायचा उत्तम मार्ग होता. 'सीइंग इज बिलिव्हिंग' म्हणतात तसे आम्हाला आमच्यावर विश्वास असणारी माणसं तयार करायची होती.

पण यावरुन व्हिजिटर्सना आमच्या शाळेत काय वाटत असेल त्याबद्दल चुकीचं मत बनवून घेऊन नका बरं !सडबरी व्हॅली हा व्हिजिटर्ससाठी सोपा अनुभव नसतो.

एक तर, ही शाळा जरा वेगळी आहे असं त्यांनी ऐकलेलं असतं म्हणून व्हिजिटर्स शाळेला भेट देतात. ते 'वेगळं काहीतरी' पहायला मिळेल अशी त्यांची अपेक्षा असते.

यातली गोम अशी आहे की एकाच शब्दाचा अर्थ सगळ्यांच्या दृष्टिकोनातून सारखा नसतो. उदाहरणार्थ, आमच्यासाठी शाळा म्हणजे सडबरी व्हॅली. मात्र अनेक लोकांसाठी शाळा म्हणजे वर्ग, बाकं, शिक्षक आणि विद्यार्थी एका वर्गात बसलेली असणं, खाण्याची वेगळी जागा, घंटा, शिस्त, वेळापत्रक इ.इ. असतं.

या दृष्टिकोनातून विचार करणारे व्हिजिटर्स आले आणि शाळेच्या पार्किंगमध्ये गाडी लावायला लागले की त्यांना सगळीकडे मुलं विखुरलेली दिसतात. ती खेळण्यात, इकडेतिकडे धावण्यात मग्न असतात.

“आम्ही मधल्या सुट्टीत आलोय का?” ते  पहिला प्रश्न विचारतात.

मग नंतर ते इमारतीकडे जाऊन ऑफिस कुठे आहे ते विचारतात. दहापैकी नऊ वेळा चिमुरडी मुलचं आमच्या व्हिजिटर्सचं स्वागत करतात आणि त्यांना ऑफिस दाखवतात.

या वेगळ्या प्रकाराने भारावून जाऊन ते म्हणतात. “अद्भुत मुलगा आहे. वेगळा ! या शाळेतल्या स्पेशल मुलांपैकी एक असावा.”

ते ऑफिसमध्ये जातात तेव्हा तिथे कोणी मोठ्ठं माणूस असतंच असं नाही. तिथे लोक येत जात असतात. दहा वर्षांच्या आसपास वय असलेली मुलं टाईपरायटरवर कागदाशी खेळत काहीतरी टाईप करत  असतात.

“या वाया जाणाऱ्या कागदांवर कोणाचं लक्ष असेल ?” असा व्हिजिटर्सच्या मनात विचार येतो.

शेवटी अखेरीस इकडून तिकडे जाताना त्या दिवशी व्हिजिटर्सची देखभाल करणाऱ्या माणसापर्यंत ते पोचतात. त्यांच्याकडे लक्ष देणारं कोणीतरी आहे असं वाटून ते सुटकेचा निःश्वास सोडतात.

खरं सांगायचं तर पहिल्या फटक्यात सडबरी व्हॅली काय चीज आहे ते कळणं कठीण आहे. आपल्यातले अनेकजण ‘तिथे काय आहे’ हे पहाण्याऐवजी आपल्याला ‘काय दिसायला हवंय’ ते पहात असतात. सर्वसाधारणतः आपण अनोळखी वातावरणात असलो की दिसणाऱ्या गोष्टी आपल्या पूर्वानुभवानुसार आपल्या चौकटीत बसवायचा प्रयत्न करतो आणि जरा तसा अट्टाहासच धरतो. हे सगळं अपरिहार्यपणे घडतं.

एकदा व्हिजिटर्सना आमच्याकडे काय चालतं याची कल्पना दिल्यानंतर मग ते हवं तिथे नाक खुपसायला मोकळे असतात. कॉमनसेन्स आणि साधारण सभ्यपणा वापरुन त्यांनी आमच्या लोकांमध्ये मिसळावं अशी आमची अपेक्षा असते.

बरेचदा  व्हिजिटर्स हा सुखद अनुभव असला तरी काहीवेळा एखादा उर्मट, उध्दट व्हिजिटर येतो.

“तू कोणत्या इयत्तेत आहेस?” श्री. उध्दट एका ९ वर्षांच्या मुलाला विचारतात.

मग त्यांचा संवाद सुरु होतो.

“इथे इयत्ता वगैरे नाही.” मुलगा उत्तरतो.

“तू काय शिकतोस?” श्री. उध्दट सुरु करतात.

“काही नाही.” मुलगा सांगतो.

“तुला वाचता येतं का ?” श्री. उध्दट नेटानं विचारत रहातात.

“हो.. ” मुलगा जरासा वैतागून उत्तर देतो.

“तू समाजशास्त्र शिकायला हवं असं तुला वाटत नाही का ?” श्री.उध्दट आता फारच नाक खुपसायला लागतात.

वैतागून तो मुलगा गप्प बसतो.  मनात मात्र विचार असतात “कोण आहे हा टिक्कोजीराव ?”

“तू शिकला नाहीस तर कॉलेजमध्ये कसा जाशील ?” परत एक प्रश्न येतोच.

त्या नऊ वर्षांच्या मुलाकडे झटपट उत्तर तयार नसतं. मग श्री. उध्दट त्याला एक भाषण द्यायला सुरु करतात. मग तो मुलगा कंटाळतो, त्याच्या कामाला लागतो आणि या विक्षिप्त माणसाला कोणी शाळेत येऊ दिलं याचं मनोमन आश्चर्य व्यक्त करतो.

याबाबतीतले किस्से मी अनेक वेळा ऐकले आहेत. आधी आम्ही या सगळ्या प्रकारानं जरा वैतागायचो. पण आता वैतागत नाही. वैतागाची जागा आता जरा किंचित नाराजी आणि खांदे उडवणं यानं घेतली आहे.

काही व्हिजिटर्स मात्र शाळेत एक हवेची ताजी झुळूक घेऊन यायचे. शाळेत एकूण काय चाललं आहे ते त्यांच्या लवकर लक्षात यायचं, ते सगळ्यांशी सौहार्दानं वागायचे आणि स्वतःच्या मनाला हा अनुभव एंजॉय करायला परवानगी द्यायचे.

कधीकधी प्रवेशासाठीच्या इंटरव्ह्यूमध्ये खाली लिहिले आहेत तसे संवाद व्हायचे.

“तुम्ही आमच्या शाळेबद्दल प्रथम कधी ऐकलंत ?” आम्ही विचारायचो.

“हं.. शिक्षणक्षेत्रातला हा प्रयोग कसा चालतो ते बघायला मी अनेक वर्षांपूर्वी इथे व्हिजिटर म्हणून आलो होतो.”

“मधल्या काळात आमची शाळा तुमच्या लक्षात होती ?” आमचा प्रश्न असायचा. यावर

“तेव्हा माझा वेळ फार मजेत गेला. या जागेनं मला भुरळ घातली. माझा मुलगा शाळेच्या वयाचा झाला तेव्हा मी इथे येणं मनात निश्चित झालेलं होतं.”

काहीवेळा अशी माणसं आमच्याकडे स्वयंसवेक म्हणून किंवा स्टाफसाठी उमेदवार म्हणून येत.

ज्यांना स्टाफ बनण्यात रस असेल त्यांनी जर स्वतः तसं सुचवलं नाही तर आम्हीच त्यांना जरा जास्त वेळ आमच्याकडे व्हिजिटर म्हणून यायचं आमंत्रण देत असू. यात ते काही आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त काळ आमच्यासोबत रहात.

एखाद्या व्हिजिटरची एखादी व्हिजिट एका दिवसापेक्षा जास्त काळ चालणार असेल तर शाळेच्या मीटींगमध्ये पूर्वपरवानगी घ्यावी लागे. अशी परवानगी देणं हा प्रकार मीटींगमध्ये कायम चालायचा. जास्त काळ रहाणाऱ्या व्हिजिटर्सना शाळेच्या सदस्यांसारखीच वागणूक मिळत असे. ते आमच्याशी बोलत, मुलांशी खेळत, त्यांना शिकवत,

सल्लेही देत. आम्ही काय आहोत ते त्यांना कळायला किंवा ते काय आहेत ते आम्हाला कळायला फार वेळ लागत नसे.

सगळ्या स्टाफला या प्रक्रियेतून जावं लागे कारण या शाळेत रहाण्यासाठी जी कमिटमेंट लागते त्याबद्दल गंभीरपणे अनेकांनी विचार केलेला नसायचा. तसंच जास्त काळ रहाणारे व्हिजिटर्स कधी कधी वैतागही आणत. आफ्रिकेतल्या मजुरांच्या मध्यभागी उंची सूट घालून बसून चहा पिणाऱ्या ब्रिटिश वसाहतवाद्यांची मला अशा माणसांमुळे आठवण यायची.

"मी एक उत्तम शिक्षक आहे." शाळा पहायला आलेलं एक पात्र एकदा म्हणालं. "मी स्टाफ म्हणून आलो तर मुलांमध्ये प्रिय असेन. आजतागायत अनेक मुलांना मी प्रिय असतो. " त्यानं मग मुलांच्या मनोरंजनाच्या प्रकारांची यादीच सांगायला सुरुवात केली. तो प्रचंड उत्साहानं निथळत होता. तो मुलं 'घडवण्यावर' विश्वास ठेवणारा होता. आमच्याकडे मुलांना अशा प्रकारे वागणूक कधीच मिळत नसे. त्यामुळे मुलांना हा नवीनच अनुभव होता. आणि आमच्या दृष्टीने हा भलताच प्राणी आमच्या शाळेत आला होता.

काही मुलं त्या पात्राच्या पहिल्या सेशनला आली. "मी तुम्हाला एक नवीन गेम दाखवणार आहे." श्री. उत्साह सांगत होते. तो गेम अर्थातच शैक्षणिक प्रकारातलं काहीतरी – म्हणजे गणित - मुलांना शिकवण्यासाठी तयार केला होता. आमच्यापैकी काही स्टाफ सदस्य हा माणूस काही काळानंतर आमचा सहकारी असेल या विचारानं त्याच्याकडे भेदरुन पहात होते.

"मुलांना हे खचितच आवडेल. फक्त त्यांना असे गेम कसे खेळावेत माहिती नाही." तो सांगत होता.

एका आठवड्यानंतर वैतागून तो नाहीसा झाला. त्याचं कोणालाच कौतुक नव्हतं. मुलांना आपल्याला कशात गोवलं जातंय हे लगेचच कळलं होतं. माझ्या मोठ्या मुलासोबतचा एक प्रसंग मला आठवला. तो तेव्हा तीन वर्षांचा होता. त्याला गाजर खायला आवडेल अशी मला खात्रीच वाटत होती. मी एक गाजर उचलून हावरटासारखं खायला लागलो. ते मला आवडतंय असे उद्गार काढायला लागलो.

"फारच मस्त लागतंय वगैरे!"

"मला गाजर आवडत नाही." तो म्हणाला. तो मला धडा होता. मुलं आपण समजतो त्यापेक्षा फार हुशार असतात. आपण प्रौढ लोकांपेक्षा अनेक प्रकारे ती हुशार असतात. त्यांना काय शिकावं ते नीट कळत असतं.

या सगळ्या उदाहरणांवरुन सांगायचंय इतकंच की सडबरी व्हॅलीमध्ये मुलांना आत्मभान विकसित करायची संधी मिळाली. आमची मुलं कधीच भावनिक आणि शारीरिक दृष्ट्या कमकुवत राहिली नाहीत.

एकूण काय तर व्हिजिटर्स येत राहिले. आमच्या रोजच्या आयुष्यावर त्यांचा काय परिणाम होईल याबद्दलची आमची चिंता संपली. उध्दट लोकांना आम्ही जायला सांगायचो. काही चांगले होते ते रहायचे. बस्, मामला खतम!

## ३५ वुईथ लिबर्टी अँड जस्टिस फॉर ऑल

समाजात न्याय्य अशी वागणूक मिळणं अवघड असतं. शाळांमध्ये तर ते अशक्यच असतं.

मी ११ वर्षांचा असतानाचा एक प्रसंग माझ्या चांगलाच लक्षात आहे. मी अंकगणिताच्या वर्गात कंटाळलेल्या, झोपाळलेल्या अवस्थेत बसलो होतो. झोप घालवण्यासाठी मी आळोखेपिळोखे देत हात वर केला. माझ्या दुर्दैवाने एक रागीट शिक्षक वर्गात तेव्हा स्वयंसेवक व्हायला कोण शहाणा मुलगा आहे? असं ओरडून विचारत होते. माझा वर झालेला हात पाहून त्यांना वाटलं मी स्वयंसेवक व्हायला तयार आहे. तीन दिवस मला स्वयंसेवकगिरी करावी लागली. अधिकारशाहीचा तो पहिला अनुभव होता.

आपल्यापैकी बऱ्याचजणांना असे अनुभव आलेले असतात. शाळेतल्या १२ वर्षात मी सतत शिक्षक आणि व्यवस्थापकांच्या अधिकारशाहीला कंटाळलो होतो. त्यात मला आवडणारे शिक्षक फारच कमी होते. सडबरी व्हॅली यापेक्षा वेगळी असेल याच्याबद्दल आम्ही फार दक्ष होतो.

आणि तशी ती होतीही!

शाळा सुरु झाल्यावर सर्वांना न्याय मिळेल अशी व्यवस्था आम्ही काय करणार आहोत हे कुणालाच माहिती नव्हतं. या समस्येवर तोडगा काढणारी ए.एस.नील यांनी चालवलेली 'समरहिल' ही एकमेव शाळा आम्हाला माहिती होती. त्यांच्या कम्युनिटी मीटींगमध्ये यावर वादही झाल्याचं ऐकिवात होतं.

मग आम्ही शाळेच्या मीटींगमध्ये सगळ्यांना न्याय मिळेल अशी व्यवस्था करायचं ठरवलं. यानंतर तक्रारींवर तोडगा शोधायचा सेशन सुरु झाला.

जसजसे आठवडे गेले तसतसे तक्रार-न्याय देणं हे सेशन्स जास्त वेळ चालायला लागले. तीन-चार तासांच्या दर आठवड्याला दोन-तीन मीटींग्ज व्हायला लागल्या. त्यानं इतर कामांवर परिणाम व्हायला लागला. त्यात बराच वेळ या विद्यार्थ्यानं काय केलं, तो काय म्हणाला असं ऐकण्यातच जायचा. सगळ्यांना न्याय देण्याची आमची इच्छा होती हे कबूल, पण आम्ही त्यात यशस्वी होत होतो का? निवाडा करण्याच्या सेशन्समध्ये आरोप-प्रत्यारोप चालायचे. बऱ्याचदा ते भावनिक आणि घटनेच्या अवाजवी वर्णनांनी भरलेले असायचे. यातून आम्ही वैतागाच्या पलीकडे गेलो.

एखाद्या गोष्टीवर प्रचंड वेळ घालवल्याशिवाय त्याच्या मुळाशी आम्ही पोचलोय असंही फारसं घडत नव्हतं. पहिल्या वर्षीच शाळा स्थापन होतानाच आमच्या शाळेला आग लागली. त्या प्रसंगानं तर सगळ्यावर कळसच चढवला. आग कशी लागली ? यावर तीन दिवस वादचर्चा चालल्यावर ते प्रकरण मिटलं. काहीवेळा काय करावं तेच कळेनासं व्हायचं. सर्वांना न्याय मिळावा यासाठी आम्ही एखादी क्लृप्ती शोधायचा प्रयत्न करायचो. पण एकूण समाधानकारक मॉडेल सापडत नव्हतं.

मग आमच्या लक्षात आलं आमची जी समस्या आहे तीच मानवजातीची हजारो वर्षं समस्या आहे. त्यांना इतक्या वर्षात ती सोडवता आलेली नाही. मग वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये न्यायनिवाडा करण्याच्या वेगवेगळ्या पध्दती विकसित झाल्या आहेत. आम्हीही अभ्यास करुन आमच्या देशाच्या परंपरेतल्या न्यायदानासंदर्भात वेगवेगळ्या गोष्टी शिकलो. लवकरच शाळेच्या न्यायव्यवस्थेसाठी आम्हाला मुद्दे सुचले.

साधारणतः न्यायदानात पाळायच्या गोष्टी साध्यासुध्या असतात. सर्व आरोपांची खोलवर आणि न्याय्य तपासणी व्हायला हवी; कोणता नियम मोडला आहे त्याची न्यायाधीशांसमोर नीट सुनावणी व्हायला हवी; पुरावा, आरोपी, विरुध्द बाजू हे नीट लक्षात घेतलं जावं आणि शिक्षा ठोठावताना नि:पक्षपातीपणे ठोठावायला हवी असे ते मुद्दे असतात. अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टानं घटनेत जरी लहान मुलांना हे हक्क दिले नसले तरी अमेरिकन नागरिकाला जे हक्क मिळतात ते आमच्या शाळेत मुलांना मिळायला हवेत असं आम्हाला वाटत होतं.

मग पहिल्या वर्षाच्या हिवाळ्यात ही न्यायव्यवस्था लागली. शाळेच्या मीटींगकडे या व्यवस्थेचं नियंत्रण होतं. वर्षं उलटत गेली तसे त्या मुद्यांमध्ये बदल होत गेले पण मूळ मुद्दे तसेच राहिले.

आता सडबरी व्हॅलीतली न्यायव्यवस्था हा आमच्या अभिमानाचा आणि आनंदाचा विषय आहे. ती अडथळे न येता चालते. आजकाल वर्षभरात सुमारे १०० तक्रारी येतात. काही वेळा आठवड्यालाच १०/२० तक्रारी येतात. पण एकूण सगळं पार पाडून शाळा सुरळितपणे चालते. शाळेत सुनावणीतल्या पक्षपाताबद्दल फार क्वचित टीका होते.

या सगळ्या पध्दतीचा गाभा म्हणजे तपासणी करणारा गट! त्यांना ज्युडिशिअल कमिटी किंवा नुसतंच जेसी म्हणलं जातं. यात सर्व वयाची मुलं क्रमाक्रमानं निवडली जातात. वर्षातून चार वेळा या कमिटीचा कारकून शाळेच्या मीटींगमध्ये निवडला जातो. जेसीचे सदस्य एकमेकांना आठवड्याभरात अनेक वेळा भेटतात. एखादा नियम तोडल्याची कोणी तक्रार केल्यावर त्यांचं काम सुरु होतं. मग शक्य असेल त्या सर्व मार्गानं जेसी त्या तक्रारीचा छडा लावण्याचा प्रयत्न करते. ते साक्षीपुरावे गोळा करतात, मुद्द्यांची छाननी करुन काय घडलं असेल या सत्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतात.

सगळेजणच या प्रक्रियेचा भाग असल्यामुळे सडबरी व्हॅलीमध्ये प्रत्येकाला न्याय मिळतो. याचे परिणाम रोजच दिसतात. उदाहरणार्थ, जेसीशी सहसा कोणी खोटं बोलत नाही. मात्र काय घडलं ते वेगवेगळ्या दृष्टिकोनातून सांगितलं जातं. अनेकवेळा सगळेजण सहकार्यच करतात.

यातलं वैशिष्ट्य म्हणजे मुलं वैयक्तिक नियम आणि समाजात पाळायला हवेत असे नियम यातला फरक ओळखायला शिकतात. शाळेच्या मीटींगमध्ये संमत झालेले नियम पाळले तर शाळेचं कामकाज नीट चालेल असं सगळ्यांना माहिती असतं त्यामुळे ते नियम पाळले जातात. नियम पाळले जातील असं सर्वांनीच पहायला हवं, अगदी त्यात आपला मित्र असला तरी नियम तो नियम हे तत्व पाळायला हवं असं सर्व मुलांना मान्य असतं.

कधी कधी यामुळे दोन मित्रांमध्ये काही कारणानं जेसी आली तरी एकदा कायदेशीर प्रक्रिया संपल्यानंतर परत वैयक्तिक पातळी डोकं वर काढते. मग त्या मुलांची मैत्री पूर्वीप्रमाणे काही घडलंच नाही अशा थाटात चालू होते.

जिवलग दोस्तांमध्ये जेसीच्या निमित्तानं ताणतणाव निर्माण झालेले मी अनेकदा पाहिलेत. ते तणाव संपल्यानंतर परत ते एकमेकांच्या गळ्यात गळे घालतात. इतर शाळांमधून सडबरी व्हॅलीत आलेल्या नवीन मुलांना इथला हा प्रकार फार जड जातो. 'आम्ही विरुध्द ते' असं एकदा ठरलं की तेच कायम ! अशा प्रवृत्तीतून ते आलेले असतात. तिथे एखाद्या प्रसंगात एखाद्याच्या विरुध्द साक्ष देणारा सरळ शत्रू या पक्षात जातो. त्यामुळे सुरुवातीला या मुलांना आमच्या शाळेत जमवून घ्यायला वेळ लागला तरी नंतर ते जमवून घेतात.

जेसीमध्ये तक्रार नोंदवण्याच्या प्रक्रियेला शाळेच्या भाषेत 'ब्रिंगिंग समवन अप' असं म्हणलं जातं. हा वाक्प्रचार कसा सुरु झाला ते आम्हाला कोणालाच आठवत नाही. पण त्याबद्दल अनेक दंतकथा आहेत. काहीजणांना वाटतं की सुरुवातीच्या काळात जेसी एकमेकांना दुसऱ्या मजल्यावर भेटायचे तेव्हा आरोपींना त्यांच्यासमोर म्हणजे वर आणलं जायचं म्हणून हा वाक्प्रचार सुरु झाला असावा.

जेसीचा परिणाम म्हणून पाच वर्षांचा एखाद्या चिमुरड्यानं "तू ते थांबवलं नाहीस तर मी तुला वर खेचेन" असं म्हणायची सुरुवात व्हायला मग फार वेळ लागला नाही. "मग मी खाली येईन .. " दुसरीकडून तात्काळ उत्तर यायचं. ज्या मुलांना लिहिता येत नसेल त्यांनी त्यांच्या तक्रारी लिहायला लेखनिक नेमावा असा नियम होता. साधारणपणे मोठी मुलं लहान मुलांना तक्रार लिहायला मदत करतच असत आणि स्टाफ तर कायम उपलब्ध असे.

कधीकधी एखादा मुलगा कायद्याचा गैरवापर वैयक्तिक फायद्यासाठी करण्याचा प्रयत्न करत असे. कोणाविरुध्द तरी अनेक तक्रारी लिहिल्या जात – तो त्या मुलाचा छळच असे. अर्थात हे काय चाललंय ते कळायला जेसीला फार वेळ लागत नसे. एखाद्या विद्यार्थ्याला परतपरत वर आणलं जाण्यामागे प्रामुख्यानं दोन कारणं असत. एकतर तो मुलगा खरोखरच सतत त्रास देत असे किंवा चुकीची तक्रार नोंदवीन इतरजण त्याचा छळ करत असत. असा सहकाऱ्यांचा छळ करणाऱ्या विद्यार्थ्यांचा जेसी नीट समाचार घेत असे.

कधीकधी वादावादी झाल्यावर रागाच्या भरात मुलं तक्रार नोंदवत असत. मग प्रत्यक्ष तपासणी सुरु होईपर्यंत सगळे शांत झालेले असत. त्या खटल्यात जेसीला फार काम रहात नसे. बऱ्याचदा तक्रार लिहून पूर्ण व्हायच्या आतच मामला थंडावलेला असे. मी एका अशाच फाडलेल्या तक्रारीची नोंद करुन ठेवलीय:

***व्हेन यू वेअर यंग***

*(सत्यघटनेवर आधारित)*

*" आम्हाला तक्रार लिहायला मदत करणार का ?" ऑफिसबाहेच्या एका कोचावर बसलो असताना हा प्रश्न आल्यावर मी जरा चमकलोच. माझ्यासमोर अ‍ॅव्हरी (वय वर्ष ९) आणि शेरॉन ( वय वर्ष ७) अशी दोन मुलं जरा घुटमळत मला हा प्रश्न विचारत होती. " आपण मार्जला शोधूयात का ? " असं त्यांनी विचारल्यावर मी एक क्षण त्यांच्याकडे पाहिलं आणि विचारलं " कशासाठी ? " " स्किप (वय वर्ष १३) आणि मायकेल (वय वर्ष ८) आमच्या खोलीत आम्ही जे करतोय त्यात मधे मधे येतायत. " हे उत्तर आलं. मी अशी तक्रार लिहून द्यावी का ? अशा विचारात मी त्यांना म्हणालो.. " हो, नक्कीच" आणि आम्ही ऑफिसमध्ये गेलो. ऑफिस रिकामं होतं.*

*तेव्हा दीड वाजला होता. सर्वजण नव्यानं फर्निचर वगैरे केलेल्या स्टीरिओ रुममध्ये गेले होते. त्या खोलीचा कसा उपयोग करायचा यासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांसोबत तिथे ११ पासून चर्चा चालू होती.*

*माझं हे तक्रार लिहून घेण्याचं काम त्यामानानं किरकोळ होतं. तरीही मी ते काम गंभीर वाटावं यासाठी टेबलासमोर बसलो, हातात पेन घेतलं. दोघंही माझ्या प्रत्येक हालचालीकडे पहात होते. प्रत्येक शब्दाकडे पहात होते. त्यांच्यासाठी हा फारच गंभीर मामला होता.*

*माझ्यासमोर तक्रारीचं स्वरुप आलं. मी अॅव्हरीला म्हणालो*

*" मला सुरुवातीपासून, अगदी सुरुवातीपासून सगळं नीट सांग बरं"*

*" मी त्यांची नावं सांगायला नको होतं. ते चुकलंच." अॅव्हरी म्हणाला.*

*" सुरुवातीपासून सांग. काय घडलं ? "*

*" जिम (वय वर्ष ८) आणि मी बार्नमध्ये खेळत होतो. स्किप आणि मायकेल येऊन डेनिसला चिडवायला लागले. "*

*" डेनिस तिथेच होता का ? " मी विचारलं.*

*" तो आला. मग ते दोघं आले. डेनिसला वाचवायला मी त्यांना नावं विचारली. मी डेनिसला मदत करण्याच्या हेतूनेच ते केलं. "*

*डेनिसला अॅव्हरीची मदत का लागतीय याचं मला आश्चर्य वाटत होतं. पण मी त्यांना गोष्ट पुढे सांगायची खूण केली.*

*" मग त्यांनी आमचा पाठलाग केला. स्किप माझी हॅट घेऊन बार्नबाहेर पळाला. डॅनियल (वय वर्ष ७), जिम आणि मी पळालो. "*

*माझ्या डोक्यात आता गोंधळ सुरु झाला. मी विचारलं*

*" डॅनियल पण तिथे होता ? " आणि सगळी रामकथा परत लिहायला लागलो.*

*" डेनिस, मायकेल आणि स्किप आमचा पाठलाग करत होते. मी पळालो, माझी हॅट मिळवली.. मग स्किपनं मला उचललं. परत बार्नमध्ये नेलं. पण आम्ही सगळे पळालो."*

*" एक मिनिट. ". मी मधेच त्यांना थांबवलं. काय घडलंय ते कळणं आता माझ्या आवाक्याबाहेर चाललं होतं.*

*" जर तू त्याला मदत करत होतास तर डेनिस तुझा पाठलाग का करत होता ? "*

*" मला नाही माहित.. " अॅव्हरी हसून म्हणाला. आता त्याच्या तोंडातून पटापट शब्द बाहेर येत होते. त्याचे डोळे चमकत होते. तो थांबतच नव्हता.*

*" मग आम्ही मुख्य इमारतीच्या दिशेने धावलो. त्यांनी जिमला कपाटात कोंडलं. डॅनियलनं पळत येऊन मला ते सांगितल्यावर मी जिमला सोडवायला निघालो. मी खरं तर त्याला सोडवायला गेलो पण मी त्याला कोंडायलाच मदत करतोय असं चित्र निर्माण झालं. पण तो पळाला. मी कोंडला गेलो पण मीही कशीबशी सुटका करुन घेतली."*

*अॅव्हरी हे सांगत असतानाच जिम शांतपणे शेरॉनशेजारी येऊन उभा राहिला. आत्ताच एका भयंकर प्रसंगातून गुदरल्यासारखा वगैरे त्याचा चेहरा बिल्कुल नव्हता. मग माझ्या लक्षात आलं की ही मुलं माझी टर उडवतायत.*

*अ‍ॅव्हरी कडे पाहून मी विचारलं, “ तुझा वेळ मजेत गेला का ?” तो मनमुराद हसून म्हणाला “ हो ” जिमलाही मी विचारलं. ” तोही म्हणाला.. “ हो, मला तक्रार नोंदवायची नाहीये. ”*

*“ पण त्यांनी आम्ही जे करत होतो त्यात मधे मधे केलं. ” अ‍ॅव्हरी तक्रारीच्या सुरात म्हणाला.*

*“ तुम्ही काय करत होतात ? ” मी विचारलं.*

*“ द मॅजिक शो.. ”*

*त्या दिवशी मॅजिक शो आहे वगैरे मी काही ऐकलं नव्हतं. मी पण मग त्यांच्या गमतीत सामील व्हायचं ठरवून विचारलं, “ कोणता मॅजिक शो ? ”*

*“ शेरॉन आणि सिंडी यांचा ! ” अ‍ॅव्हरी उत्तरला.*

*हसतमुखानं डॅनियलही तोपर्यंत आमच्यात सामील झाला होता. शेरॉन या सगळ्यात आत्तापर्यंत स्तब्ध होती. ती तिचं नाव आल्यावर पुढे आली. “ आम्ही त्यांना खोलीबाहेर हाकलत होतो पण ते गेले नाहीत. ” ती आवेशात सांगत होती. “ मग आम्ही त्यांना ढकललं”. यावर अ‍ॅव्हरी म्हणाली “ आम्ही त्यांना जायला भागच पाडलं. ” यावर डॅनियल हसत होता. जिम मजेत होता.*

*“ तक्रार फाडून टाकू का ? ” जिमनं विचारलं.*

*यावर शेरॉननं स्मितहास्य केलं. डॅनियलही हसला. मी अ‍ॅव्हरीला विचारलं. “ तक्रार तशीच ठेवली तर काय होईल ?”*

*जेसीवरच्या प्रचंड विश्वासानं तो म्हणाला, “ मुलं मॅजिक शो करणं थांबवतील. ”*

*“ तुला तो थांबायला हवाय का ?” मी विचारलं.*

*“ नाही.. ” तो दिलखुलासपणे हसून म्हणाला.*

*जिमनं तक्रार फाडली. त्याचं समाधान झालं. मग अ‍ॅव्हरी निघतानिघता माझ्याकडे वळून एक रुंद हास्य करत म्हणाला “ तुम्ही लहान असताना अशीच धमाल करत होता का ?”*

असं हे जेसी प्रकरण ! आमच्याकडे जेसीची सुरुवात झाल्यापासून वाईट वागल्याबद्दल फक्त एकदाच एका विद्यार्थ्याला शाळेतून काढावं लागलं. या आकड्यांवरुनच ती पध्दत यशस्वी झाल्याचं दिसून येतं. खरोखरच सडबरी व्हॅलीमध्ये प्रत्येकाला समानतेनं वागवलं जातं. कोणत्याही मुलाला अधिकारशाही, मोठी माणसं, शिक्षक कोणाचीच भीती वाटत नाही. शाळेत सगळे समान असल्यानं सर्वजण एकमेकांच्या नजरेला नजर भिडवून बोलतात. इतलं स्वातंत्र्य वय, लिंग किंवा स्टेटसनुसार बदलत नाही. ते राखलं जातं यावर सगळ्यांचा विश्वास आहे. या शाळेचा मी एक भाग आहे याबद्दलचा सर्वात जास्त अभिमान मला या गोष्टीसाठी वाटतो!

सडबरीबद्दल खूप काही सांगून झाल्यावर, ते सगळे शब्द लोकांनी वाचल्यावर आणि आमच्या शाळेचे फोटो पाहिल्यावरही लोकांना एक प्रश्न उरतोच. सडबरी व्हॅली म्हणजे काय आहे? तिथे कसं वाटतं? नक्की काय चालतं?

सांगायचंच झालं तर एक म्हणजे सहज पहाणाऱ्याला देखील पहिल्या नजरेत बऱ्याच वेगळ्या गोष्टी प्रकर्षानं जाणवतात. सडबरीत सगळीकडे मुलं विखुरलेली असतात. त्यामुळे ते येतात तेव्हा मधली सुट्टी असावी असं लोकांना वाटणं आम्हाला आता सवयीचं झालंय. मुलं मोकळेपणानं, आरडाओरडा करत, उत्साहानं बागडत असतात.

नंतर परत ते साधारण अशीच दृश्यं पहातात. शाळा एका जुन्या इस्टेटच्या मैदानात आहे. ती अमेरिकन सिव्हिल वॉरच्या काळात बांधली आहे. सुरुवातीला बांधलेलीच इमारत अजून टिकून आहे. ग्रॅनाईटच्या भिंती आहेत. त्यातला ग्रॅनाईटचा दगड हा तिथल्याच सालेम रोडवरच्या फार्मिंगहॅमच्या खाणीतून खोदलेला आहे. खाण कधीच बंद झाली. त्या भागात आता ग्रॅनाईटच्या इमारती दुर्मिळ आहेत. त्याचा बघणाऱ्याच्या मनावर वेगळाच प्रभाव पडतो. शाळेचं वेगळंच व्यक्तिमत्व त्यामुळे त्याच्या मनात तयार होतं.

त्याला हिरवळ, झाडंझुडपं, फुलं, तळं, तबेला, मिलहाऊस, गोठा आणि तबेला यामुळं प्राचीन सौंदर्याचा एक नमुना पहायला मिळतो.

फार्मिंगहॅम हे शेवटी एक गजबजलेलं शहर आहे. उद्योगधंदे, बँका, शॉपिंग मॉल्स, घरं, मोठे रस्ते हे शहर आणि उपनगराचे द्योतक आहेत. हे काँक्रिटचं जग शाळेला चहुबाजूंनी वेढलेलं असलं तरी शाळा नैसर्गिक सौंदर्याच्या कुशीत विसावलेली आहे. शहरातली एक बाग शाळेजवळ आहे. ती जागा पर्यावरणाच्या रक्षणासाठी एका ट्रस्टनं आरक्षित केलेली आहे. यामुळे शाळेच्या नैसर्गिक सौंदर्यात भरच पडते.

पण एक लक्षात घ्या.. आम्ही इंग्लंडमधली गढी किंवा न्यूपोर्ट मॅन्शन नाही. इमारत नीट जपून ठेवून उच्चभ्रू लोकांनी मांडलेलं संपत्तीचं ओंगळवाणं प्रदर्शन करणारी आमची वास्तू नव्हे. नाथानिल बाऊडिच हा मॅसॅच्युसेटस् मधला दर्यावर्दी होता. ज्यानं तयार केलेली मॅन्युअल्स अजूनही खलाशी वापरतात. इतका प्रसिध्द माणूस प्रचंड साधा होता. त्याच्या इस्टेटीवरही असं प्रदर्शन नव्हतं. तिथे नीट कामकाज चालायचं. ती जागा जुनी झाली. पण साध्यासुध्या कामगारासारखी जुनी झाली .. एखाद्या राजपुत्रासारखी नव्हे. त्या वास्तूत डागडुजीच्या, भिंतींना गिलावा दिल्याच्या अनेक खुणा आहेत. म्हाताऱ्या माणसाच्या त्वचेवरच्या सुरकुत्यांसारख्या त्या खुणा आहेत. आमचीही इमारत इतमामात जुनी झाली असली तरी ती जुनी झालीच आहे. खऱ्याखुऱ्या माणसांनी खऱ्याखुऱ्या ज्गात वावरल्याच्या खुणा इमारतीच्या अंगाखांद्यावर खेळतायत.

इमारतीप्रमाणेच टेबल, खुर्च्या, सोफे या सगळ्यांमुळे शाळेबद्दलचा प्रभाव वाढतो. सगळं फर्निचर साधं आणि घरात असतं तसं आहे. फर्निचर जमवताना आम्हाला जुनं फर्निचर कोणी तरी दिलं किंवा आम्ही सेकंड हँड विकत घेतलं. त्यामुळे तेही जुनं झालंय. माणसांनी वापरल्याच्या खुणा त्याच्यावरही आहेत. या सगळ्याचा परिणाम म्हणून आमच्यासारखे शाळेत वेळ घालवणाऱ्या लोकांमध्ये प्रामुख्यानं दोन भावना निर्माण होतात. सहजता – रोजच्या वापराच्या वस्तू वापरताना वाटावं तसं आम्हाला तिथे वावरताना आरामदायक वाटतं. दुसरं म्हणजे मुलांना समजावून

घेणं ही भावना आमच्याकडे प्रचंड आहे. आम्ही मुलांना किती समजावून घेतो यावरच आमचा सततचा आनंद अवलंबून असतो.

सहजता आणि मुलांची काळजी घेणं या सडबरी व्हॅलीच्या द्योतक आहेत. लोक इथे आरामात असतात. त्यांना काळजी, घाई नसते. भिवया उंचावलेल्या नसतात. डोळे स्वच्छ असतात, गढूळलेले नसतात. लोक लक्ष न देता निघून जात नाहीत. सगळेजण एकमेकांची काळजी करतात. सगळेजण मदत करायला तत्पर असतात. शाळा चैतन्यपूर्ण असावी याची सगळेजण काळजी घेतात.

शाळेत असणाऱ्या सर्वांमध्येच या भावना असतात. त्या सगळीकडे दिसतात आणि तुमचं लक्ष वेधून घेतात.

इथे सगळ्यापेक्षा जास्त लक्षात येणारी गोष्ट म्हणजे काळ थांबल्यासारखा वाटतो. कामं संपवण्यासाठी लोक प्रयत्नांची पराकाष्ठा करतात पण कोणी गडबड करत नाही. शाळेत फार कमी घड्याळं आहेत. निघून जाणाऱ्या तासांची जाणीव मुलांना सतत करुन दिली जात नाही.

सर्वचजण त्यांना हवं तेव्हा येतात आणि जातात – लवकर किंवा उशीरा. कोणीच नसताना जर एखाद्याला यायचं असेल तर त्याला शाळेची किल्ली दिली जाते. आमच्या मते ही जागा त्यांचीच आहे अशा भावनेच्या खजिन्याची ती किल्ली असते. अशा प्रत्येक किल्लीमागे किती विश्वास दडलेला असतो याची कदर करायला एरवी कुणालाच वेळ नसतो.

इथे ठायीठायी विश्वास दिसतो. तसा तो दिसणं अपेक्षितही आहे. वस्तूं कुलपात ठेवल्या जात नाहीत. दारं सदैव उघडी असतात. सर्व साधनं सहज सगळ्यांना उपलब्ध होतात. लोकांना वाटतं, काय ही विचित्र वास्तू आहे!! आमची सडबरी व्हॅली! मुक्त प्रवेश असलेली.. सगळयांना सामावून घेणारी. मग भेट द्यायला आलेले शाळेत फिरताना इथल्या उबदार आणि विश्वासू वातावरणाचा लगोलग एक भाग बनतात.

बोर्डिंग स्कूल नसली किंवा ओळखीच्या लोकांनी एकत्र येऊन सुरु केलेली नसली तरी बऱ्याच प्रकारानं आमची शाळा ही एक कम्युनिटीच आहे. शाळेत कुठूनकुठून लोक येतात आणि मित्रत्वाने रहातात. आमच्याकडून फार प्रोत्साहन वगैरे न मिळताही पालक हळूहळू एकमेकांची ओळख करुन घेतात. त्यांच्यात मैत्री निर्माण होते. मुलं शाळेबाहेरही एकमेकांना भेटतात. त्यांच्यात आयुष्यभराचं नातं तयार होतं.

आमची शाळा ही एखाद्या खेडेगावासारखी आहे. तिथे नाती सहज जुळतात. सगळे इकडेतिकडे फिरत असले तरी मुळं एकमेकांत रुजलेली असतात. या मुळांवर नात्यांची झाडं बहरत रहातात. पदवी घेऊन मुलं पाच, दहा, पंधरा वर्षांनंतरही परत येतात. त्यांना घरी आल्यासारखं वाटतं. इथे त्यांचं नेहमीच स्वागत होतं. त्यांना या शाळेचाच एक कायमचा हिस्सा व्हायचा असतं आणि ते तसा एक हिस्सा असावेत असं आम्हालाही वाटतं. हे अजिबात विचित्र नाहीये. मुलांच्या मनात शाळा हा एक हिस्सा असावाच!

इथे शाळेच्या वातावरणात भूत, वर्तमान आणि भविष्यकाळ विरघळून एक झालेला असतो. मुलं भूतकाळातल्या गोष्टी ऐकतात. आणि मग एक दिवस कोणीतरी येतं, त्याला ती म्हणतात, “तू अमुकतमुक ना.. मार्ज आम्हाला तुझ्या किती गोष्टी सांगत असते.” ते आजीमाजी विद्यार्थी मग एकत्र बसतात. भूतकाळातल्या कथांच्या बदल्यात

एकमेकांना नवीन गोष्टी ऐकवल्या जातात. मग काही दिवसांसाठी आलेला माजी विद्यार्थी निसर्गनियमाप्रमाणे पण भरल्या अंत:करणाने परत त्याच्या जगात जातो.

पण आमच्या शाळेचा भाग असणाऱ्या वैशिष्ट्यातलं एकही त्याच्या व्यक्तिमत्वानं मधल्या काळात गमावलेलं नसतं. इथे आम्ही मुलांकडून निष्ठा, वचनं काही मागत नाही. स्वत;च्या स्वप्नांचा सार्वजनिक गरजांसाठी बळी देणं आम्हाला मंजूर नाही. मुक्त लोकांना एकमेकांशी मुक्तपणे वागून जर सहकाऱ्यांकडून आदर आणि मदत मिळाली तर त्यांना स्वत:ची ध्येयं ओळखण्याची संधी मिळते. मग त्यांच्यात निष्ठा आणि मैत्रीचं फार दृढ नातं तयार होतं याचं सडबरी व्हॅली हे एक जिवंत उदाहरण आहे. असं वातावरण कसं तयार होतं याची पाककृती फार साधी आहे; एक भाग स्वातंत्र्य, एक भाग आत्मसन्मान, एक भाग जबाबदारी, एक भाग सहाय्य हे एकत्र करायचं आणि पदार्थ तयार होईपर्यंत शांतपणे वाट पहायची. कोणताही स्वयंपाकी याची नक्कल करुन तितकंच यश मिळवू शकेल.

शाळेचा आतातरी तुम्हाला अंदाज आला का ?

निरोप

द प्रूफ ऑफ पुडिंग

आमच्याकडच्या सगळ्याच मुलांच्या आयुष्यात सडबरी व्हॅली सोडून बाहेरच्या स्वत:च्या जगात जायची वेळ येतेच. त्यांच्या नंतरच्या आयुष्यात काय घडतं ते शाळेचा किती परिणाम आहे याचं निदर्शक असतं.

अनेक विद्यार्थ्यांना शाळा सोडायच्या आधी हायस्कूल संपल्याचा डिप्लोमा हवा असतो. हा डिप्लोमा कसा द्यावा यावर विचार करण्यात आमचं एक वर्ष गेलं.

आमचा डिप्लोमा नेहमीच्याच बाहेरच्या जगात लावतात तशा निकषांवर आधारित असणं शक्य नव्हतं. ग्रेड, तो काय शिकला, अनेकवर्षं कशात प्रावीण्य मिळवलं वगैरे..! अशा ्प्रकारची शालेय कामगिरी आमच्याकडे अपेक्षित नव्हतीच. शाळा किंवा विद्यार्थी दोघंही कोणतीच मूल्यव्यवस्था मानत नव्हते.

ड्प्लिोमाची कल्पना आमच्या आदर्शांमध्ये बसत नव्हती. डिप्लोमा म्हणजे शाळेचं औपचारिक प्रशस्तिपत्रक. त्यात मुलाचं मूल्यमापन आलं. तेच आम्ही टाळत नव्हतो का ?

शेवटी एक समाधानकारक तोडगा निघाला. त्यातली मध्यवर्ती कल्पना साधी होती : बाहेरच्या खुल्या जगातल्या आव्हानांचा जबाबदारीनं सामना करु शकतील असे विद्यार्थी बाहेरच्या जगात पाठवण्याचं आमचं ध्येय होतं. डिप्लोमासाठी आम्ही हे ध्येय शब्दात मांडलं.

ज्या विद्यार्थ्यांना औपचारिकरीत्या प्रमाणपत्र हवंच असेल त्यांनी शाळेच्या कम्युनिटीसमोर उभं राहून जबाबदार नागरिक बनू शकतील हे सिध्द करायचं असं ठरलं. त्यांच्या सहकाऱ्यांना पटेल असं एक सादरीकरण त्यांनी तयार करुन मांडायचं. हे कसं करायचं याबद्दल ते कोणाचीही कितीही मदत घेऊ शकत होते.

असं सादरीकरण बनवल्यानंर एका मीटींगसमोर जायच्या आव्हानाला ते सामोरं जायचे. मग वादचर्चा व्हायच्या. सेशन संपल्यावर आपलं सादरीकरण बरोबर होतं अशी जर त्या विद्यार्थ्याची खात्री असेल तर तो डिप्लोमासाठी अर्ज करु शकायचा.

एकदा त्या मुलाला कशात सादरीकरण करायचंय ते ठरवून घ्यावं लागे आणि तो विषय आम्हाला मान्य असावा लागे. शाळेनं ते सादरीकरण मंजूर करणं गरजेचं होतं. डिप्लोमाची कार्यपध्दत अवघड होती. पहिल्या काही केसेसनंतर स्टाफचे सदस्य एकमेकांत म्हणायचे.. “मला या सगळ्यातून जावं लागलं नाही हेच बरंय. मी आनंदात आहे.” काही सोळा वर्षांची मुलं हा प्रयत्न करायची. पण जास्त करुन सतरा अठरा वर्षांची मुलं या सादरीकरणाच्या प्रयत्नात असायची. इतक्या वर्षात एकाच मुलानं सादरीकरणाच्या ्दरम्यान खोटं बोलायचा प्रयत्न केला. शाळेला ते पचलं नाही आणि त्याला डिप्लोमा नाकारला. मात्र आमच्याकडून बाहेर पडल्यानंतर १० वर्षांनी त्यानं त्या सादरीकरणाच्या वेळी आम्ही त्याला फसवू दिलं नाही आणि त्याचा डिप्लोमा नाकारला यासाठी आमचे आभार मानले!

अनेक जण बाहेरच्या जगात डिप्लोमाशिवायच जातात. आम्हाला फारसा फरक पडत नाही. बाहेरच्या जगात एक अर्थपूर्ण आयुष्य जगण्यासाठी त्यांनी जे काय आंतरिक पातळीवर जमवलेलं असेल ते महत्वाचं!

अर्थातच आत्तापर्यंत माजी विद्यार्थ्यांचं एक रेकॉर्ड शाळेकडे जमा झालेलं आहेच.

अनेकजण कॉलेजमध्ये आणि इतर प्रकारच्या उच्च शिक्षणाच्या दिशेला गेले. कॉलेजला जायची इच्छा असलेला आमच्याकडचा एकही विद्यार्थी आजपर्यंत अयशस्वी झालेला नाही. बऱ्याचदा त्यांना हव्या त्या कॉलेजला प्रवेश मिळतो. कॉलेजप्रवेशासाठी आमच्या विचारांवर आधारलेलं त्यांचं शिक्षण ही त्यांच्यासाठी लायबलिटी न बनता ॲसेट बनते. मुलांकडे डिप्लोमा असला-नसला तरी असंच घडतं.

इतरजण शाळा संपल्यानंतर थेट व्यवसायाकडे वळतात. तशी आमच्याकडची काही मुलं  निरनिराळ्या क्षेत्रात गेली. मेकॅनिक, संगीतकार, शिल्पकार, सेल्समन, तंत्रज्ञ, डिझायनर हे त्यापैकी काही उद्योग. पुढे उच्चशिक्षण घेतलेलेही त्यांचा विषय सोडून विविध क्षेत्रात गेले. आम्हाला त्याचं अजिबात आश्चर्य वाटत नाही.

आमच्याकडून गेल्यानंतर लँडस्केपमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या एखाद्या पदवीधारकाला शाळेत किंवा घरी कामाला बोलावताना किंवा एखाद्या डॉक्टरची वेळ ठरवून घेताना मनाला समाधान असतं. कदाचित प्रेतयात्रेची व्यवस्था पहाणाऱ्या एखाद्यालादेखील बोलावण्याची वेळ येईलच.!

शाळेच्या माजी विद्यार्थ्यांमधला समान गुणधर्म म्हणजे त्यांच्यात आयुष्य जगताना नसलेला उद्दामपणा! कामांची श्रेणीबध्द रचना शाळेनं कायमच टाळलीय. व्यवसाय करणं कमी दर्जाचं आहे, किंवा कॉलेजशिक्षण घेणं वरच्या दर्जाचं आहे असं या शाळेत कधीच शिकवलं गेलं नाही. त्यामुळे आमच्याकडची मुलं कायम लीन राहून आपापलं काम करतात. त्यांना लहान-मोठा हा भेदभाव करताच येत नाही.

स्वतःच्या इच्छेनं कोणीही न लादता निवडलेला मार्ग हा मोलाचा असतो ही आमची धारणा शाळेच्या प्रत्येक बाबतीत दिसून येते.

आमच्या तत्वांप्रमाणे वरवरच्या आवडीनिवडी आणि आतून मनःपूर्वक आलेली निवड यात आम्ही निवाडा करत होतो. योग्य किंवा अयोग्य यातून नव्हे! यामुळे शाळेत कोणीही काहीही करत असला तरी सर्वजण एकजुटीनं रहात असत आणि हीच पध्दत नंतर प्रत्यक्ष जीवनातही असे. त्यामुळे ते कोणत्याही माणसाशी सहजतेनं वागू शकत.

आमच्या माजी विद्यार्थ्यांवर अनेकांनी अभ्यास केला आहे आणि जसजशी वर्षं जातील तसा तो होत राहिल. आमचे विद्यार्थी हे संपूर्ण, स्वतंत्र आणि एकसंध व्यक्तिमत्वाचे आहेत आणि स्वतःबद्दलच्या योग्य जाणीवेमुळे त्यांच्या आयुष्यातला अर्थ त्यांना कळलाय.

पण आम्हा सर्वांना बांधणारा समान धागा म्हणजे त्यांची वाढीची वर्षं त्यांच्यापासून हिरावून घेतली गेली नाहीत. सडबरी व्हॅलीमध्ये त्यांना त्यांचं शैशव हवं तितकं आणि फक्त लहान मुलांनाच सुचतील अशा धमाल गमतीजमती करुन उपभोगायला मिळालेलं असतं. आम्ही त्यांना दिलेलं मोठं बक्षीस म्हणजे - त्यांना ते 'स्वतः' असू देणं! त्यांच्याकडचं फक्त त्यांचंच असलेलं असं काहीही आम्ही कधीच हिरावून घेतलं नाही/घेत नाही. मुलांना सदोदित मदत करायला उत्सुक असणाऱ्या त्यांच्या भोवतालच्या लोकांच्या फौजांनी त्यांना दिलं असतं त्यापेक्षा आम्ही त्यांना खूप जास्त काही दिलं.

किशोरवयातली जी मुलं आमच्याकडे येतात त्या सर्वांसाठी आम्ही हा वारसा चालवतो.

नोट

सर्वांचं खाजगी आयुष्य जपण्यासाठी सडबरी व्हॅलीतल्या ज्या मुलांची नावं यात वापरली आहेत ती बदललेली आहेत.

**समाप्त**

**To Add Footnotes for following**

हॉटहाऊसिंग

न्यू इंग्लंडच्या टाऊन मीटींगमध्ये

राजाचे नवीन कपडे या दंतकथे

एकधिकारशाही कशी वाढत जाते असं सांगणारा पार्किनसन लॉ आमच्याकडे नव्हता!

'झिरो बेस्ड बजेटिंग'

पॉन्स द लिऑन'नं स्वतःचं आयुष्य उगाचच 'फाऊंटन ऑफ यूथ'

'नो टॅक्सेशन विदाऊट रिप्रेझेंटेशन'